कारवाई करने के आपको अधिकार है, हम यह अधिकार आपको देते है। मा.महापौरजी, जब आदमी अहंकार के जाल मे अंधा हो जाता है, तब उसको कानुन नही दिखता, और मैंने इसलिये वाचन करने के लिये कहां मा.महापौरजी, लिखो २६५ व २६५ अ इस ॲक्ट के अनुरुप उन इमारतो का बांधकाम करते समय हमने निर्देशो का पालन किया है क्या ? और इस ॲक्ट के अनुरुप क्या कारवाई होनी चाहिये, कारण इसमे लिखा है कि यह बिल्डींग मालक की जबाबदारी है, बिल्डींग मालक अगर महानगरपालिका है तो इसके कस्टोडियन निगम आयुक्त है इस गलती के बारे मे भी आयुक्त अपने भाषण मे प्रकाश डाले या माफी मांगे। मा.महापौरजी, बडा गंभीर प्रश्न है, कल कोई ठेकेदार कार्यादेश के अनुरुप अगर कोर्ट मे अपने पेमेंट के लिये जाता है और कोर्ट उसको ब्याज के साथ मे उसकी रक्कम देने को कहता है तो यह पैसे देने की जिम्मेदारी किसकी होंगी, उस समय आयुक्त यहा होते कि नही होते और वह पैसे कौन देंगा इस बात का भी उल्लेख आयुक्त के भाषण मे आना चाहिये। मा.महापौरजी, अभी जो पांच हॉस्पिटल चल रहे है इन पांचो हॉस्पिटल को लेकर मा.आयुक्तजी ने एक प्रेस ली, मा.आयुक्त महोदय ने जो काम किया उस काम को करते समय महाराष्ट्र सरकार का ई-टेंडर बंद था, इसलिये आयुक्त महोदय ने मॅन्युअली टेंडर बुलाकर के इस काम को किया, मा.महापौरजी, इस टेंडर की फाईले यहां पर रखी हुई है, मेरे बाजु मे रखी हुई है, इसका सखोल विश्लेषन मैंने किया है, मैं पढने के लिये कहुंगा तो कहां जायेगा कि, चर्चा हो रही है इसलिये मै पढने के लिये नही कहुंगा यह बात आयुक्त साहब ने अपने वक्तव्य मे बताना चाहिये। मेरे जानकारी है कि, ९ तारीख को आयुक्त ने हस्ताक्षर किये कि इस काम के टेंडर पब्लिश किये जाये, और ९ तारीख को हस्ताक्षर करने के बाद १२ तारीख को टेंडर सब्मीशन की तारीख रखी गयी। मा.महापौरजी, टेंडर सब्मिशन के लिये अमाउंट के अनुरुप अतिआवश्यक काम के लिये मिनीमम अमाउंट के हिसाब से कितने दिन का समय होना चाहिये, इसका उल्लेख आयुक्त महोदय अपने भाषण मे करे, इसलिये करे कि, एक फाईल ९८ लाख की है और दुसरी फाईल ३९ लाख की है, तीसरी फाईल ३६ लाख की है, चौथी फाईल ३६ लाख की है, और पांचवी फाईल १२ लाख रुपये की है। अमाउंट के हिसाब से किसी भी टेंडर को सब्मीशन करने के लिये कितने दिन का समय देना चाहिये, ऐसे शासन के नियमो के अंतर्गत क्या निर्देश है। उस निर्देश के वाचन के साथ उसका पालन हुआ है या नही इस बात को भी सभागृह मे रखे। मा.महापौरजी, मैं फिर आपसे निवेदन करना चाहुंगा कि, आप डॉ प्रविण गंटावार के फोन की डिटेल्स बुलवाईये, जिस आदमी को टेंडर दिया गया उस आदमी को गंटावार का फोन गया, और उस आदमी ने आकर के टेंडर भरा, अगर एक ही आदमी टेंडर भर रहा है तो उसमे रेट समान होने चाहिये बडे अमाउंट का टेंडर १० प्रतिशत बिलो भरा गया और छोटे अमाउंट का टेंडर पांच प्रतिशत बिलो भरा गया, क्या कारण है। मा.महापौरजी, जब एक ही प्रकार का काम है, मटेरीअल एक है, लेबर एक है, स्थिती एक है, काम एक है, समय एक है तो एक जगह पांच प्रतिशत और दुसरी जगह १० प्रतिशत बिलो जाने का क्या कारण है। उसका भी कोई उत्तर नही है, टेंडर मे रेट बड रहे थे, एक टेंडर मे तो बिलो मे दुसरे का नाम लिखा हुआ था, और कार्यादेश दुसरे को दिया गया है और बाद मे उसमे सुधार किया गया है। यह क्या है मा.महापौरजी, यह सारी जानकारी फाईल मे दर्ज है। मैं आयुक्त के इमानदारी पर शक नही करता, बिल्कुल शक नही करता लेकिन प्रक्रिया पर तो शक किया जासकता है, नियम के विपरीत काम करने के लिये आयुक्त नही आये, सभागृह मे आयुक्त कैसे काम करेगें इस बात का उल्लेख ॲक्ट मे नही है ऐसा विधी अधिकारीने बताया। मैंने बताया कि, विधी अधिकारी बोलकाबावला है, जो दिशानिर्देश है, उसके

अनुरुप यह काम हुऐ है क्या ? इन सारी बातो का विशेष उल्लेख मा.आयुक्त महोदय अपने वक्तव्य मे करे । मा.महापौरजी, निगम आयुक्त वारंवार कहते है कि मुझे ज्याअर्थी त्या अर्थी मिळालेल्या अधिकारानुसार मी काम करीत आहे. मी कोणत्याही प्रकारचे काम नियमाच्या विपरीत जावुन या काळात घेवु शकतो. मा.महापौरजी, उनका वक्तव्य सुनने के बाद मैंने उस ॲक्ट की कॉपी निकाली, इसमे स्पष्ट रुप से लिखा हुआ है, मैंने जो शासन के निर्देश बताये थे, कोरोना से बचाव करने के लिये उसमे थ्री टीयर व्यवस्था बताई गयी है, एक सीसीसी, एक डीसीएचसी, और एक डीसीएच यह तीनो का नियोजन करने की जिम्मेदारी आयुक्त की थी, और उसके अंतर्गत कोविड केअर सेंटर का निर्माण करना था, आयुक्त को कोविड केअर सेंटर निर्माण करने के लिये इस ॲक्ट मे अधिकार दिये गये है, महानगर के अंतर्गत महाराष्ट्र सरकार के दिशानिर्देशो के अनुरुप नोंदणीकृत किसी भी दवाखाने को अधिग्रहित करके कोविड केअर सेंटर के रुप मे आयुक्त इस्तेमाल कर सकते है । यह अधिकार आयुक्त को मिलने के बाद आयुक्त ने यह काम न करते हुऐ जबरदस्ती इस प्रकार की हरकत नियमबाहय तरीको को अंजाम देते हुऐ क्यो की इस बात का भी उल्लेख आयुक्त महोदय अपने भाषण मे करे, दुसरी बात आयुक्त महोदय ने कहा कि मुझे इस ॲक्ट के अंतर्गत अधिकार है, वहां युजर कुछ भी हो, मैं कही पर भी कुछ भी काम कर सकता हुँ, इसमे स्पष्ट रुप से है कि यह काम तात्पुरता स्वरुप मे रहेगा यह मोबाईल फॅसालिटी उपलब्ध करवाने की जिम्मेगदारी है, मा.महापौरजी, जब शहर मे बडे बडे दवाखाने बन करके तयार है और आयुक्त को अधिकार थे तो अनावश्यक तरीके से गर्व्हमेंट फंड क्यो खर्च किया गया, इसकी भी जानकारी सभागृह मे दी जाये । मा.महापौरजी, मैं मा.आयुक्त से आपके माध्यम से पुछना चाहता हुँ कि, जब महाटेंडर बंद था ठिक है, क्या रेट काँट्रक्ट महाराष्ट्र सरकारने मेडिकल सप्लॉय के लिये किये थे इस बात की जानकारी आयुक्त दे, क्या रेट काँट्रक्ट की यादी उन्होने तपासी, आयुक्त साहब ने जीएमसी और आयजीएमसी से जहां वर्तमान मे साल देढ साल पहले काम हुऐ है, और नयी नयी सुविधाऐ उपलब्ध हुई है क्या आयुक्त ने उनसे पुछा कि आपने किस रेट पर कौनसे सामुग्री ली है । मा.महापौरजी, मेरी जानकारी है १२ तारीख को जब टेंडर भरने के लिये आदमी वहां पहुंचा तो BOQ तयार नही था, और मा.महापौरजी, यह सब करने की जिम्मेदारी किसको दी गयी थी, मालुम है क्या ? डॉ.गंटावार को, मा.महापौरजी, यह ढाई करोड रुपयो के काम है, मा.महापौरजी, ग्रेट नाग रोड पर गंटावार का प्लॉट है, वहां बहोत बडी डॅब्रिस लगी हुई थी, वह डॅब्रिस तीन दिन पहले साफ हो गयी, यह दोनो मे क्या कनेक्शन है इसकी तहकिकात होना नितांत आवश्यक है । और यह तो केवल ऑक्सिजन सप्लॉय की बात मैं कर रहा हुं इसमे बेड की खरीदी अलग है, बहोत सारी चिजे है, इसलिये इन सारी चिजो के ऊपर मे सभागृह की एक समिती बनाई जाये और इसकी चौकशी की जाये मैं यह नही कहता, मैं बिल्कुली नही कहता, मा.महापौजी, मुझे आयुक्त की नियत पर बिल्कुल शक नही है, लेकिन कानुन कहता है कि सॅक्शन ३९१ (२) के अंतर्गत इस काम की जानकारी सभागृह मे देना चाहिये लेकिन सभागृह मे जानकारी नही आयी । अगर मा.सदस्यो ने २० तारीख को यह प्रश्न सभागृह के समक्ष उपस्थित किया है तो ओर २६ तारीख तक आयुक्त सभागृह के पटल पर उसको रखने को तैयार नही है तब संदेह होता है कि दाल मे कुछ काला है, या दाल काली है । मा.महापौरजी, संदेह को जन्म आयुक्त जी दे रहे है मैं तो बहोत इमादारी से प्रश्न पुछ रहा हुँ, जो लोग कामचोर है, अपना काम पुर्ण नही करते, मैं आयुक्त को बताना चाहता हुँ कि, उनपर जिम्मेदारी फिक्स होना चाहिये । उनका काम है इस्टीमेट बनाना, उनका काम है कि आयुक्त को बताना लेकिन वह अपना काम नही करते ।

इसलिये मा.महापौरजी, उनकी भी जिम्मेदारी फिक्स होना चाहियें, ३१९ के अंतर्गत सभागृह के सूचना के बावजूद आयुक्त महोदय ने सभागृह के सामने छ: दिन बाद भी वह दस्तावेज नही रखे है तो सभागृह के आदेशो के पालन न करने के कारण आयुक्त को क्या निर्देश दिये जासकते है, उनपर क्या कारवाई की जासकती है। किसको इसकी सूचना देनी चाहिये, यह जानकारी सभागृह के सामने रखी जाये। मा.महापौरजी, आयुक्त महोदय कहते है कि, वह नियम के अनुरुप काम करते है, मैं आयुक्त महोदय से पुछना चाहुंगा कि, आयुक्त महोदय जब नागपूर से बाहर छुटटी लेकर के गये वह कितने दिन की छुटटी लेकर के गये इसकी अनुमती लेने के लिये महानगरपालिका के नियमो मे अधिकार किसे प्रदान किये गये है, किसको सूचना देकर के आयुक्त ने छुटटी पर जाना चाहिये, इसके कुछ नियम है क्या ? अगर नियम है तो उसका वाचन किया जाये।

विधी अधिकारी (श्री.कपले) :- मा.महापौरजी, कलम ३८ आयुक्तांची अनुपस्थित रजा देणे व भत्ता राज्य सरकार वेळोवेळी स्थायी समितीच्या वतीने योग्य वाटेल असा कालावधीसाठी आयुक्ताला अनुपस्थित रजा देता येईल.

श्री दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी, इसी के साथ साथ ३९ (अ) २ चे वाचन कर ले।

विधी अधिकारी (श्री.कपले) :- (वाचले)

श्री दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी, मैं आपके माध्यम से प्रश्न पुछना चाहता हुँ कि, निगम आयुक्त और अपर आयुक्त इन्होने अपने अनुपस्थिती की अनुमती स्थायी समिती से आज तक ली है क्या ? इस बात की जानकारी दी जाये।

महापौर :- सचिवांनी माहिती द्यावी.

निगम सचिव :- मा.महापौरजी, सचिवालयात तसा रेकॉर्ड नाही.

श्री दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी, रेकॉर्ड केव्हा असते जेव्हा क्रश झाला नाही, आवश्यकता समझली नाही. कानुनची पायमल्ली मा.आयुक्तांनी केली, आयुक्त व अपर आयुक्त हे दोन्ही नियमाची पायमल्ली करीत आहे. निर्वाचित प्रतिनिधीना झंडू समजुन काम करण्याची मानसिकता हया अधिका-यांची आहे. जर झंडू हा शब्द असंसदीय वाटत असेल तर हया ठिकाणी दो कौडी का आदमी यह समझा जाये

श्री प्रफुल गुडधे :- मा.महापौरजी, मला दो कौडीचा अर्थ नाही समजला. कौडी का अर्थ म्हणजे काय ?

श्री दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी, ज्याला दोन तास बाहेर थांबवावे लागते अश्या माणसाला परिभाषेत दोन कौडीचा माणुस म्हणतात. मा.महापौरजी, यह नियम के विरोध मे महानगरपालिका चल रही है यह इसका प्रमाण है, मा.महापौरजी, मैं आपके समक्ष बताना चाहुंगा कि, सॅक्शन ५७ मे लिखा है कि, सहा.आयुक्त, म्हणजे असिसटेंट कमिश्नर, उप अभियंता या सर्व व्यक्तिना सुटटीची अनुमती स्थायी समितीकडुन घ्यावी लागेल. हे सर्व सुटटी सॅक्शन करण्याचे काम आयुक्त करीत आहे. म्हणजे आमचे अधिकार आयुक्त हिसकावुन राहिले आहे. या सर्व नियमाची पायमल्ली आयुक्त का करीत आहे. ३८, ५७, ३९ (अ) ची पायमल्ली आयुक्त का करीत आहे. ही सर्व माहिती आयुक्तांनी त्यांच्या उत्तरामध्ये द्यावी. मा.महापौरजी, कुछ लोगो को लग रहा है कि अतिरेक हो रहा है इसलिये शांत हो जाना आवश्यक है, मैं केवल अपने भाषण को संक्षिप्त मे रखुंगा। मा.महापौरजी, पंचतंत्र की एक कहानी है, और उसका उल्लेख मैं आपके समक्ष करना चाहुंगा। मा.महापौरजी, एक बार जंगल मे चुनाव हुऐ और सारे लोगो ने तय किया कि, शेर बहोत अत्याचार करता है इसलिये

उसको राजा के पद से हटाना चाहिये, और राजा के पद से हटाना है तो क्या किया जाये तो ऐसा किया जाये कि, सबसे ज्यादा जंगल मे दौड धुप का काम अगर कोई करता है तो वह बंदर है, तो बंदर को राजा बना दिया जाये, अब सबने तय किया कि, बंदर को राजा बनाना है, चुनाव हुऐ और चुनाव मे बंदर जीत गया और शेर हार गया, एक दिन शेर को भूख लगी तो उसने एक बकरी के बच्चे को दबोच लिया, अपने जबडे मे बकरी के बच्चे को शेर ने दबोच लिया, तो बकरी दौडते दौडते बंदर के पास गयी और बंदर को बोली कि, राजा, राजा मेरे बच्चे को शेर ने अपने मुंह मे दबा लिया है, मेरे बच्चे को बचाओ, अब बंदर शेर के पास गया, शेर के पास जाकर वह एक डंगाल से दुसरे डंगाल पर, ओर एक पेड से दुसरे पेड पर चढ रहा था, तीसरे पेड से चौथे पेड पर वह दौडते रहा, और अपने दरबार मे आ गया तो बकरी ने पुछा कि, मेरे बच्चे का क्या हुआ तो वह बोला कि, प्रयास करना मेरा काम था, मैंने प्रयास मे कोई कमी नही की यश नही मिला इसमे मेरा क्या दोष । मा.महापौरजी, महानगरपालिका का कर्मचारी २३ लाख लोगो की तपासणी वैज्ञानिक पध्दतीसे अपनी जान धोके मे डालकर करता है, और महानगरपालिका एक भी इंडेक्स पेशंट को नही खोज पाती है,मा.महापौरजी, मैं आरोप कर रहा हुॅ कि, महानगरपालिका के सर्व्हे मे इस शहर मे कोरोना की सबसे पहली चैन को फैलाने वाला तोतवाणी परिवार है, मेरे पास कागद मौजूद है जिस कागज पर लिखा हुआ है कि, महानगरपालिका के सर्व्हे की टिम जब तोतवाणी के घर गयी तो उनको खाँसी थी, सर्दी थी, महानगरपालिका की टिम ने उन्हे तुरंत डॉक्टर के पास ले जाकर के ॲडमिट करवाना था, लेकिन महानगरपालिका के टिम ने ऐसा कुछ नही किया उन्होने तोतवाणीजी से कहां कि आप डॉक्टर से इलाज करवा लिजीये । तब तोतवाणी जी मोहल्ले के डॉक्टर के पास इलाज के लिये गये, और जब आराम नही लगा तो वह आयजीएमसी गये तो वहां जाकर के वह पॉझीटीव्ह निकले और वह पॉझीटीव्ह निकले, इसलिये पता चला कि दिल्ली की ट्रेन से आनेवाले लोग पॉझीटीव्ह हो रहे है । कारण एम्प्रेस मॉल मे रहनेवाला एक व्यक्ति १८ तारीख को तेलंगाणा एक्सप्रेस से आया था, यह व्यक्ति भी दिल्ली से तेलंगाणा एक्सप्रेस से आया था इसलिये तेलंगाणा एक्प्रेस यह तेलंगाणा एक्सप्रेस नही यह कोरोना एक्सप्रेस है यह आयजीएमसी ने निश्चित किया, यह बात आयजीएमसी ने बताई, जिसके कारण महानगपालिका दिल्ली से आये लोगो की जानकारी लेने के लिये प्रयत्न कर रही थी । मा.महापौरजी, महानगरपालिका के ध्यान मे आने के बावजूद महानगरपालिकाने उस व्यक्ति को कोरंटाईन नही किया, यह महानगरपालिका की चूक है, इसे दर्ज किया जाये । मा.महापौरजी, अगर उस व्यक्ति को उसी दिन हॉस्पिटल मे पहुंचा दिया गया होता तो शायद १२ लोगो तक तोतवाणी परिवार व्दारा जो कोरोना की पहिली चैन फैली, वह चैन नही फैलती । लेकिन हमने ऐसा नही किया, हम वैज्ञानिक पध्दतीसे ध्यान दे रहे है । मा.महापौरजी, गुडधेजी ने कहां कि, आप आयुक्त के विरोध मे अविश्वास प्रस्ताव क्यों नही लाते, मैंने पहले ही दिन कहां था कि, अविश्वास प्रस्ताव लाने के कोई आवश्यकता नही है, आयुक्त महोदय ने निर्वाचित प्रतिनिधीयो को साथ मे लेकर के काम करना चाहिये । और जब दोनो को मिलकर के काम करना है तो एक दुसरे पर अविश्वास व्यक्त करने की आवश्यकता नही है, उस दिन आयुक्त महोदय सभागृह से उठकर के बाहर चले गये, लेकिन आपने उनपर विश्वास करते हुऐ उनको स्वयं फोन किया, इसलिये हमतो काम करने वाले लोग है अविश्वास व्यक्त करके संबंध तोडनेवाले नही, हमारे मॅथालॉजी मे कहां जाता है कि सात जन्मो का सात आयुक्त तो कायम हमारे आयुक्त रहे हमको कोई अडचण नही है,उनकी जो गलतीया है वह बताने के लिये सभागृह है, आयुक्त से मेरी कोई दुशमनी नही है,

व्यक्तिगत तौर पर मेरी आयुक्त से  कोई दुशमनी नही है, जो मुझे गलत लगा वह बात मैंने सभागृह मे कही, कोरोना को लेकर के मैंने जितनी बाते सभागृह मे कही, उसमे से एक शब्द भी मैंने प्रेस मे नही कहां, बहोत सारी बाते मैंने यहां नही कही, फेसबुक पर भी नही दिखेगा, वॉटसअप पर भी नही दिखेगा, और मैंने यह सारी चिजे सभागृह के पटल पर कही कारण कि, हम एक परिवार के रुप मे बैठे है, और परिवार का काम होता है कि, एक दुसरे के पास मे एक दुसरे की गलती बताना, कमरे के अंदर मीडीया मे नही जहां बर्तन होते है वहां बर्तन बजते है, लेकिन बर्तन बजते है इसलिये बर्तनो को बाहर निकाल देना ऐसा काम हम नही कर सकते। हम आपस मे चर्चा करके समाधान निकालने का प्रयास कर रहे है। और बाते कर रहे है मा.महापौरजी, उसका कारण है कि, हमे लगता है कि, इतने दिनो से बाते नही हुई, सभागृह नही होने के कारण यह सारी चिजे हुई इसलिये हम चर्चा कर रहे है, महाराष्ट्र सरकारने निर्देश दिये कि, सभागृह ले सकते है, इसलिये यह सारी बाते सामने आरही है। मैं एक बात का उल्लेख मा.आयुक्त महोदय से करना चाहता हुॅ, आयुक्त महोदय, इस शहर मे टी. चंद्रशेखर नाम के एक व्यक्ति म.न.पा. आयुक्त थे, उनके खिलाफ अविश्वास प्रस्ताव इस सभागृह ने पारीत किया था और उस वक्त मैंने छे घंटे १० मिनिट का भाषण दिया था, मैं आपको बताना चाहता हुॅ कि, जिसकी चलती है उसका हेला भी दुध होता है। उनके बारे मे छे घंटे विरोध मे भाषण देने के बावजूद चंद्रशेखरजी से हमारे कभी संबंध खराब नही हुऐ चंद्रशेखर ने किसी भी काम की फाईल को कभी रोका नही, चंद्रशेखर ने किसी भी नगरसेवक से कभी व्देष की भावना रखी नही। मा.महापौरजी, चंद्रशेख्रर ने जो कुछ किया उसे राजनैतिक तौर पर शासन ने करने को मजबुर किया, मा.महापौरजी, जिस दिन चंद्रशेखर साहब का ट्रांस्फर हुआ, मैं सामान्य नगरसेवक था, चंद्रशेखर साहब के पी.ए. थे, मि.जाधव उनका मुझे फोन आया और उन्होने कहां कि साहब आपसे बात करना चाहते है मैंने कहां कि, फोन दिजीये, चंद्रशेखर ने कहां कि, दयाशंकर मेरे फेरवेल के कार्यक्रम मे तुम्हे मेरे बारे मे दो शब्द बोलना है, मैंने कहां कि मैं जब सभागृह मे खडा होता हुॅ तो आपके विरोध मे  ही बोलता हुॅ, आप मुझसे क्यों कह रहे है कि, मैं आपके फेरवेल मे दो शब्द बोलु. उन्होने कहां कि दयाशंकर मुझे विश्वास है कि, तु दो शब्द मेरे बारे मे बोलेंगा तो वह बाकी के १०० शब्दो से ज्यादा होंगे, मैंने कहां कि महानगरपालिका मे महापौर को, उपमहापौर को, अध्यक्ष, स्थायी  समिती को, विरोधी पक्ष नेता को बोलने के अधिकार है, मैं तो सामान्य नगरसेवक हुॅ, मुझे यह अधिकार नही है, उन्होने कहां कि मै रिक्वेस्ट करुंगा कि, कर्मचारीयो के प्रतिनिधी के रुप मे दयाशंकर को बोलने दिया जाये। मा.महापौरजी, चंद्रशेखर के विरोध मे छे घंटे सभागृह मे बोलने वाला व्यक्ति, चंद्रशेखर को सभागृह मे अडचण मे लाने वाला व्यक्ति को सभागृह के बाहर सेंडाप मे भाषण देने के लिये बुलवाया गया।  मा.महापौरजी, बहोत सारे लोग वहां मौजुद थे, भालचंद्र जोशी उस कार्यक्रम मे थे, कार्यक्रम के बाद भालचंद्र जोशी मुझसे मिले और मुझ् से कहते है कि, प्रभाकरराव दटके के बाद तुम पहले आदमी हो जो मंच पर हजार लोगो के बिच सच बोलते हो, मैंने कहां कि, हमारा व्यक्ति से कोई व्देष नही है, उसकी कार्यप्रणाली से हमारा बैर हो सकता है, हम किसी व्यक्तिविशेष से बैर नही रखते।  मा.महापौरजी, हमारा किसी व्यक्ति से उसके काम करने की कार्यप्रणाली के कारण झगडा हो सकता है, हमे निर्वाचित कर के दी गयी जनता के लिये हम झगडा कर रहे है। मैं आयुक्त महोदय से निवेदन करना चाहता हुॅ कि, इस सभागृह मे जो कुछ भी हो रहा है, जो कुछ इसमे सुधार की आवश्यकता यह सभागृह महसुस करती है उसके लिये आप भी कदम से कदम मिलाकर के साथ मे काम करने की कोशिश करे। मा.महापौरजी, कल बीबीसी मराठी को इंटरव्हीयुव देते समय आयुक्त

महोदय से पुछा गया कि, आप कार्यवाही मे नगरसेवको का साथ क्यों नही दे रहे है। मा.आयुक्त ने इंटरव्हीयुव मे कहां कि मैं किस नगरसेवक का साथ दु, जिनके मोहल्ले मे मैं कोरंटाईन सेंटर बनाने के लिये जाता हुँ वहा के नगरसेवक मुझ से कहते है कि मेरे मोहल्ले मे कोरंटाईन सेंटर मत बनाओ, जिन एरीओ को मैं सील करने के लिये जाता हुँ, वहा का नगरसेवक कहता है कि, मेरे घर को सील नही करना बाकी का मोहल्ला सील करदो, मैं किस नगरसेवक का साथ दु। यह बात आयुक्त महोदय ने ऑन रेकार्ड कही है, मा.महापौरजी, आयुक्त महोदय अपने उदबोधन मे यह बात बताये वह कौनसा नगरसेवक है जिसने कहा कि, मेरे घर के बाजु मे कोरंटाईन सेंटर नही खोलना, वह कौनसा नगरसेवक है जिसने कहां कि, बॅरेकेटींग करते समय मेरे घर को सील नही करना, मैं आज तक प्रतिबंधीत क्षेत्र मे रह रहा हुँ । मा.महापौरजी, नितीनजी साठवणे के घर मे १० साल के बाद संतान हो रही थी, वह अपनी पत्नी को डिलेव्हरी के लिये ले जारहे थे वहा १२ फिट की टिन लगी हुई थी, आनेजाने के लिये मरीजो के लिये बाजु से जगह रखने की आवश्यकता थी या नही थी, पोलिस अपना काम कर रही थी उनका काम था किसी को आने जाने नही देना, किसी गर्भवती महिलो को बॅरीकेड से निकाल कर बाहर ले जाना कितना मुश्किल है, किसी परिवार मे १० साल के बाद खुशीया आये और उस गर्भवती महिला को त्रासदी के समय बांस के निचे से झुंक कर के जाना पडे तो उस त्रासदी की संकल्पना किसी महिला से पुछो तो वही बता सकती है। और उसकी जिम्मेदारी कौन लेता है, मा.महापौरजी, स्मार्ट सिटी के गडडे मे डुब करके एक व्यक्ति मर गया, उसकी जिम्मेदारी कौन लेगा, स्मार्ट सिटी से प्रभावित होने वाले लोगो को पैसे देने का काम आयुक्त महोदय ने रोक दिया, इसकी जिम्मदारी कौन लेगा, मा.महापौरजी, भाषण और आगे दिया जा कसता है लेकिन उसकी आवश्यकता नही, इतना ही आज के लिये काफी है। आयुक्त जब उत्तर देंगे तो उसमे हस्तक्षेप करने का अधिकार तो है हमे, उस समय हम प्रश्न उत्तर कर लेगें। मा.महापौरजी, मैं आपके माध्यम से यह निवेदन करना चाहता हुँ कि, यह बहोत गंभीर विषय है, मैंने मेरे भाषण मे कई बार बताया कि मा.आयुक्त का महानगरपालिका के कर्मचारीयो के प्रति व्यवहार बरोबर नही है, वह कमर के निचे की भाषा का उपयोग करके हमारे कर्मचारीयो से बात करते है ऐसे अनेक कर्मचारीयो ने व्यक्तिगत तौर पर आकर के शिकायत की है, वह आयुक्त के सामने नही बोलते, आयुक्त महोदय ने अपनी इस भाषा को बदलना चाहिये,इस प्रकार के निर्देश भी आप सभागृह मे उन्हे दे। कल मैंने आपके सामने उदाहरण के साथ मे कहां एक महिला की मॅटरनिटी लिव्ह को मना करना, महिला के शोषण का व्यवहार है, और एक महिला को उसके पद से हटा देना एक निकम्मे व्यक्ति को लाकर के वहां पर पद पर बैठाना यह भी एक महिला का अपमान है। वह महिला भी आदिवासी समाज की है, तीन दलित समाज के कर्मचारीयो को अपशब्द कह कर बाहर निकालना यह भी बरोबर नही है, अगर हम उनका माननीय कहकर सम्मान करते है तो आयुक्त महोदय ने भी अपनी भाषा मे परिवर्तन करना चाहिये, और मुझे गंभीरता के साथ इनके खिलाफ बोलना पड रहा है आज सुबह एक सज्जन मेरे पास एक कागज लेकर के आये, उनकी पत्नी के साथ आयुक्त महोदय ने दुर्यव्यवहार किया इस प्रकार का उन्होने कोर्ट मे केस डाला है जब वह नागपूर जिल्हा परिषद मे कार्यरत थे। मा.महापौरजी, महिलाओ को परेशान करने का इनका रेकार्ड तो नही है, ऐसा प्रश्न खडा होता है, मैं उनके चरित्र पर लांछन नही लगाना चाहता, लेकिन नागपूर जिल्हा परिषद की एक महिला कर्मचारी केस डालती है, नागपूर महानगरपालिका की एक महिला की मॅट्रनिटी लिव्ह रद्य की जाती है, नागपूर महानगरपालिका की एक महिला सिनिअर होने के बावजूद उसको पद से इसलिये निकाला जाता है

कि वह केवल महिला है, यह सारी चिजे महिलाओ के प्रति उनके देखने की दृष्टी की हिन भावना है। महिला समुपदेशन केंद्र, जहाँ महिला समूपदेशन केंद्र मे आकर समुपदेशन लेती है, साल मे १२०० (एक हजार दोनशे) महिलाऐ समुपदेशन लेती है, इस महिला समुपदेशन केंद्र का ९३ प्रतिशत रिझल्ट है कि, उन्होने परिवार को टूटने से बचाया, जिसका क्रॉस व्हेरीफिकेशन हमारे अधिकारीयो ने किया महाराष्ट्र सरकार का भरोसा सेल आकर के देखता है कि, हमारा महिला सेल कैसे चल रहा है, उस महिला समुपदेशन केंद्र को बंद करने का निर्णय यह लेते है। लाडली लक्ष्मी योजना जिस घर मे बेटी पैदा होती है, उसके सम्मान मे वह योजना महानगरपालिका ने शुरु की, जिस जनवरी महिने से मा.आयुक्त महोदय आये है, उस जनवरी माह से उसका भी एक भी केस नही किया गया है, इसका मतलब पैदा होते हुई बेटीयो से लेकर बडी बेटीयो का पतन मा.आयुक्त कर रहे है, जैसी नगरसेवको के प्रति उनके मन मे दुर्भावना है, ऐसी महिलाओ की प्रति भी क्यों है। इसमे भी सुधार करने की आवश्यकता है, मा.महापौरजी, मैं यही आपसे निवेदन करना चाहता हुं, और आयुक्त महोदय के लिये केवल इतना ही कहना चाहता हुॅ कि,

देखा है जिसे जख्मे जिगर सीते हुऐ देखा है।
देखा है जिसे खुने जिगर पीते हुऐ देखा।
कल तक जो रोते थे मरने वालो के नाम पर।
आज वह रो रहे है जब किसी को जीते हुऐ देखा है।
जब किसी को जीते हुऐ देखा है।

श्री.तानाजी वनवे :- सन्माननीय महापौरजी, सन्माननीय सभागृह, सर्व अधिकारी वर्ग आणि पत्रकार बंधू. या नागपूर महानगरपालिकेच्या या सभागृहाची एक परंपरा राहिलेली आहे. फार मोठी परंपरा आहे आणि याचा फार मोठा इतिहास आहे. या ठिकाणी अत्यंत विद्वान अत्यंत अभ्यासू आणि स्वातंत्र सेनानी आणि ज्यांनी पुर्ण आयुष्य देशासाठी वाहून घेतले अशा मोठमोठया व्यक्ति या सभागृहात महापौर राहिलेल्या आहेत. त्याच्या मध्ये पहिले महापौर म्हणून सन्माननीय स्वर्गीय बॅरिस्टर वानखेडे याचा उल्लेख होतो. त्यांच्या नावाने मुंबईला वानखेडे स्टेडिअम आहे. त्यांचा पुतळा नागपूर महानगरपालिकेच्या कार्यालयामध्ये लागलेला आहे. अनेक बॅरिस्टर, उच्च शिक्षित लोक या महानगरपालिकेचे महापौर, उपमहापौर स्वर्गीय सदानंदजी फुलझेले यांचा मुद्दामूहून उल्लेख करतो ज्यांनी या नागपूर शहरात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या दिक्षाभूमीची जबाबदारी सर्वश्री आपल्यावर घेतली आणि या सभागृहाचे ते उप महापौर होते आणि नुकताच काही दिवसापूर्वी त्यांचे निधन झाले. या ठिकाणी हिंमतरावजी सरायकर असो, अटलबहाद्दूर सिंग असो, पहिल्या महिला महापौर कुंदाताई विजयकर असो, प्रभाकरराव दटके असो, नानाजी शामकुळे असो, सखारामजी मेश्राम असो. मोठमोठया मंडळींनी या ठिकाणी बरेच मोठया लोकांसोबत ज्या वेळेस १९८५ मध्ये काम करण्याचा योग आला. योगायोगाने मला माझ्या पक्षामध्ये बॅरिस्टर अंतुलेसाहेब सोबत, एस.के.पाटलांसोबत, प्रमिलाताई चव्हान सोबत,बॅरिस्टर रामराव आदिकांसोबत अशा मोठया मंडळीसोबत कॉग्रेसपक्षामध्ये काम करण्याचा योग आला. मंत्रिमंडळामध्ये स्विय सहा.म्हणून अनेक मोठया व्यक्तिसोबत काम करण्याची संधी मिळाली. १९८५ मध्ये या महानगरपालिकेचा मा.सदस्य म्हणून आलो. या वेळेला मी तरुण होतो. मी सखाराम चौधरी चे नाव विसरलो ते स्वातंत्र्य सेनानी होते, कमी शिक्षित होते परंतु त्यांना मोठा मान होता. या सभागृहाने त्यांना लंडनला पाठविले. लंडनला जावून ते आणि बाबा त्र्यलोकसिंग ते दोन्ही या ठिकाणी नाही. या मोठमोठया व्यक्तिंनी या सभागृहाला भुषविले आहे. त्यांच्या नेतृत्वामध्ये या नागपूर शहरामध्ये जे काही काम झालीत या नागपूर शहराचा इतिहास आहे त्यांच्या नेतृत्वात शहीद माहल्ले सभागृह त्या ठिकाणी एक चांगली लायब्रेरी एक स्वातंत्र्य सैनिकांचा इतिहास या ठिकाणी लिखीत त्यांनी त्या सभागृहात केलेला आहे. या ठिकाणी मा.वसंतदादा पाटील महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते ते हसनबागला एका कार्यक्रमासाठी माझ्या घराच्या जवळ आले आवर्जुन कुणी तरी सांगितले त्यांचे स्विय सहा. धापे म्हणून होते त्यांनी सांगितले तानाजी बाजूला राहतात. त्यांनी मला बोलावून घेतले व म्हणाले मी तुमच्या घराजवळ आलेला आहे. त्या वेळेला आरोग्य शिबीर सुरु होते त्यावेळला ललीताराव आरोग्य मंत्री होत्या. त्यांनी विचारले तानाजीचे शिक्षण काय आहे. मा.वसंतदादा पाटील बोलले, तानाजीने जनता युनिर्व्हसिटीतून पीएचडी केली आहे. अशाप्रकारचा उल्लेख वसंतदादा पाटील चार वर्ग शिकलेले होते. मा.विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वात अतिशय जवळून काम करण्याची संधी मला मिळाली. त्यांच्या नेतृत्वात मी काम केले. या शहरात माजी पालकमंत्री सतिश चर्तुवैदी यांचा सहकारी मित्र म्हणून अनेक वर्ष मला काम करण्याची संधी मिळाली. या ठिकाणी या सभागृहात या महाराष्ट्र राज्यामध्ये अनेक लोकांच्या सोबत काम करण्याचा योग आला. या नागपूर महानगरपालिकेची एक परंपरा, एक इतिहास राहिलेला आहे. या महानगरपालिकेचे हे सर्वोच्च सभागृह आहे. याच्यामध्ये मा.महापौरांच्या नेतृत्वामध्ये या सभागृहाची एक परंपरा आणि कामकाज सुरळीत सुरु असते. येवून नाही तर चांगले निर्णय होवून या शहराला दिशा देण्याचे काम सर्व मा. महापौरजी आणि आपल्या नेतृत्वामध्ये झाले आहे. मा. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांचे मनापासून धन्यवाद करतो आणि आभार मानतो त्यांनी या

करोना सारख्या महामारीपासून सांभाळण्याकरिता एक दिवसाचे लॉकडाऊन झाल्यानंतर आणि त्यानंतर महाराष्ट्रामध्ये एक प्रकारचे भितीचे वातावरण निर्माण झाले. हा लॉकडाऊन कशासाठी, गेल्या दोन-तीन दिवसात देश लॉकडाऊन झाला. पहिल्यांदा करोना सारखी महामारी या देशात आल्यामुळे लोकांमध्ये भितीचे वातावरण होते. आमच्या या कालखंडामध्ये पहिल्यांदा अशी कोणती बिमारी आली ती लोकांना माहीत नव्हती. मा.पंतप्रधांनांनी देशाच्या सुरक्षिततेसाठी लॉकडाऊन केले. या देशात लॉकडाऊन करीत असतांना काही गोष्टींचा शासन कर्त्यांना विसर पडला. जे विदेशातून काही मंडळी जे देशात उच्चपदावर असणारी होती  किंवा बाहेरुन जी सरकारी मंडंळी जेव्हा विमानाने येथे आली. त्या वेळेला त्यांना कोरंटाईन करुन दिले असते आणि घरी जावू दिले नसते तर ही बिमारी नागपूर शहरामध्ये आली नसतीआणि या महाराष्ट्रामध्ये आली नसती. त्या वेळेला त्यांना कां कळले नाही हे माहीत नाही. जे मजूर होते. त्यांना लॉकडाऊन करण्यापूर्वी त्यांना आपल्या घरी जाण्यासाठी अनुमती दिली असती तर ते आपल्या खर्चाने जावू शकले असते. आणि त्यामुळे शासनावर भार आला नसता आणि महामारीचा प्रश्न आला नसता. मजुरांचे ॲक्सीडेंट झाले नसते त्यांचे अशा प्रकारचे हाल झाले नसते. त्या प्रक्रियेत केंद्र सरकार चुकले आहे  आणि त्यामुळे या मजुरांचे हाल झाले आणि त्याचेमुळे ही महामारी पसरली आणि ही महामारी आमच्या नागपूर शहरात आली. लॉकडाऊन झाल्यानंतर आठवडयाभरानंतर त्या लोकांच्या घरी धान्य नाही, तेल नाही, काम नाही की कोणतीही व्यवस्था नाही असे झाले. पहिला आठवडा कसातरी निघाला. मी महानगरपालिकेच्या आयुक्तांचे आणि त्यांच्या चमूचे मनापासून धन्यवाद करतो त्यांनी या करोनाच्या संकट काळामध्ये लोकांना जेवण देण्याचे काम केले. या ठिकाणी  मी त्या एनजीओचे धन्यवाद करतो, मा.महापौरजी यांनी सुध्दा आपआपल्या एनजीओ मार्फत ठिकठिकाणी काम केले मी त्यांचे सुध्दा धन्यवाद करतो. मी सर्व नगरसेवकांचे धन्यवाद करतो की त्यांनी आपआपल्या प्रभागामध्ये धान्य वाटप करण्याचे काम आणि लोकांना सांभाळण्याचे काम या कठीण परिस्थितीमध्ये त्यांची मदत करण्याचे काम केले त्यांचे बद्दल सर्व नगरसेवकांचे अभिनंदन करतो. विशेष करुन मिलींद मेश्राम साहेबांचे अभिनंदन करतो त्यांनी अन्न पुरवठा करण्याचे काम ठिकठिकाणी केले. सर्वांना मिळाले नसेल, निश्चित काही ठिकाणी निश्चितरुपाने  माझे सहकारी मित्र नितीन साठवणे यांच्यापर्यंत काही साधनसामुग्री गेली नाही. दोन-तीन लोकांसाठी अन्न मागण्याची त्यांनी मला वॉटस्अपवर मला विनंती केली. सतरंजीपु-यामध्ये त्यांच्यापर्यंत कोणत्याही प्रकारची व्यवस्था गेली नाही ही गंभीर बाब आहे आपण त्याची दखल घ्यावी. एवढे करीत असतांना नितीन साठवणेपर्यंत कशी काय व्यवस्था पोहचलेली नाही. ही महामारी सुरु झाली ,लोकांना कोरंटाईन करण्यात आले. लॉकडाऊन करण्यात आला. त्या वेळेस नियम वेगळे होते, परिस्थिती वेगळी होती. लोकांमध्ये भयाचे वातावरण होते. अनेक लोक, जेष्ठ नागरिक आमच्या घरी यायचे, आमचे कसे होईल, आमच्या मुलांचे कसे होईल, मुलीचे कसे होईल, आम्ही जिवंत राहू की नाही असे विचारायचे. अशी एकप्रकारची भिती या महामारीमध्ये लोकांमध्ये पसरलेली होती. पहिला लॉकडाऊन झाला, दुसरा लॉकडाऊन झाला, लोकांच्या घरचे अन्न सर्व संपले. अत्यंत कठीण परिस्थिती होती. माझ्या परिसरातील दहा हजार लोक माझ्या घरी येवून गेले. या पिरेडमध्ये जी जी मदत करण्यासारखी होती ती निश्चित आम्ही केली आहे. परंतु वॉटस्अप, फेसबुकवर त्याचा उल्लेख केला नाही. शेवटी लोकांना मदत करावयाची असते. मदत करीत असतांना मदतीचा प्रोपोगंडा करण्याची गरज नाही. नगरसेवकांच्या बाबतीमध्ये वॉटस्अप, फेसबुक वर जी काही पोस्ट आलेली ती गंभीर पोस्ट आहे. मा. महापौरजी आपण या संदर्भात नोंद घ्यावी. ती

पोस्ट मला नितीन साठवणे आणि अनेक लोकांनी दाखविली आहे. निश्चितरुपाने अशा लोकांवर गंभीर गुन्हा दाखल करण्याचा आदेश आपण सभागृहाला दयावा. मी पोलीस आयुक्तांचे मनापासून अभिनंदन करतो आणि त्यांच्या पोलीस चमुचे मनापासून अभिनंदन करतो. या करोनाच्या काळात मेयोचे डॉक्टर आणि त्यांचा सगळा स्टॉफ तसेच मेडीकलचे डॉक्टर आणि त्यांचा पुर्ण स्टॉफ डीन मित्रा आणि गावंडे आणि त्यांची चमू यांचे मनापासून अभिनंदन करतो. एम्सचे डॉक्टर आणि त्यांची चमू यांचे मनापासून अभिनंदन करतो. ज्या ज्या लोकांनी करोनाच्या काळामध्ये या लोकांना मदत केली असेल त्या सर्वांचे , सर्व अधिका-यांचे मनापासून स्वागत करतो. या शहरामध्ये जे काही सुरु आहे. आयुक्तांचे चांगल्या कामाचे आम्ही स्वागत केले आहे. ज्या काही उणिवा आहेत त्या आयुक्तांनी दुरुस्त कराव्यात अशा प्रकारची आपल्या माध्यमातून विनंती करतो. या सभागृहामध्ये जे नगरसेवक बसलेले आहेत ते कोणत्याही पक्षाचे असोत. हे काम जे आहेत ते लोकांची कामे आहेत. कोणत्याही नगरसेवकाचे व्यैयक्तिक काम नाही. म्हणून ज्या ज्या गोष्टीचे कार्यदेश झालेले आहे ते आता तालेवारांना सांगतांना थरकाप सुटला होता. परंतु जी गोष्ट सत्य आहे ती आहे. तळहाताने काही सुर्य लपविता येत नाही. त्याचप्रमाणे सत्य लपविल्या जावू शकत नाही. मी आपल्याला विनंती करतो की या ठिकाणी रस्त्याची कामे असोत, पाईपलाईनची कामे असोत, गडरलाईनची कामे असोत, इमारतीची कामे असोत. आवश्यक जी काही कामे असतील, पावसाळी नालीची कामे असोत. या सगळया कामांचा एक आढावा घेवून जी अतिआवश्यक कामे असतील त्या कामाला मंजूरी प्राप्त करुन ताबडतोब ती कामे  सुरु केली पाहिजे. या ठिकाणी मा. महापौरजी, एक या ठिकाणी सोशल मिडीयावर ॲपच्या माध्यमातून जी काही कामे ॲपवर सुचविली गेली त्याला प्रथम प्राधान्य देण्यात येते असे अनेक मा.सदस्य आणि अनेक प्रतिनिधी बोलले. ही जर वस्तुस्थिती असेल तर हे बरोबर नाही. कारण नगरसेवक हे लोकप्रतिनिधी आहेत. नगरसेवकांनी सुचविलेली अतिआवश्यक कामे ती आपण केलीच पाहिजे. कारण या सभागृहामध्ये नगरसेवक स्वत:चे काम वैयक्तिकरित्या सांगायला येत नाही. आमचा कुठला कंत्राटदार लागलेला नाही. आमचे काही टॅन्कर लागलेले नाही. आम्ही महानगरपालिकेत एकही टॅन्कर लावलेला नाही. या ठिकाणी जे कंत्राट घेत असतील तो त्यांचा भाग आहे. आम्ही वैयक्तिक काम कुणाला सांगत नाही. वैयक्तिक काम घेवून मी आजपर्यंत आयुक्तांपर्यंत गेलो नाही. मा.आयुक्त आहेत मी यांच्याकडे कधीही वैयक्तिक काम घेवून गेलेलो नाही. केवळ लोकांचे जे प्रश्न असतील त्या प्रश्नाला वाचा फोडण्याचे काम करीत असतो.  माझ्या घराच्या बाजूला एक नाला आहे त्या नाल्यावर बीआरओ, बॉडर सेक्युरिटी फोर्सचे ऑफीस होते ते आता निघुन गेले आहे. त्या  ठिकाणी मोठी इमारत आहे  त्या इमारतीत प्रधानमंत्री आवास योजनेची स्किम आहे. एक सन्माननीय नागरिकांनी साधा वॉटस्अपवर तक्रार केली. त्या ठिकाणी आयुक्त, अपर आयुक्त ही सर्व मंडळी त्या ठिकाणी आली, जोशी साहेबांपासून सर्व त्या ठिकाणी आले. रात्री ८.३० वाजता त्या लोकांना नोटीस दिली. त्यांनी ती भिंत बांधलेली नाही. मा. उप महापौरजी प्रभाग आपलाच आहे. मी त्या ठिकाणी राहतो. मी आपला मतदाता आहे. आपण त्या ठिकाणी जावून पाहिले की नाही पाहिले माहीत नाही. परंतु त्या ठिकाणी रात्री लोक माझ्या घरी आले. एवढेच वाटते तर प्रशासनाने वॉटस्अप आणि फेसबुकवर तक्रार देतात त्यावर सुध्दा अशीच कार्यवाही झाली पाहिजे.  मला एक उत्तर पाहिजे आहे की रात्री ८.३० वाजता कोणतेही बांधकाम तोडण्याची नोटीस देवू शकतो  काय ?

उप महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

श्री. संदीप जाधव:- मा.महापौरजी, सभागृहात मागे बसलेल अधिकारी कुठे गेले आहेत त्यांच्यासाठी काही जेवणाची व्यवस्था केलेली आहे काय? एकही जबाबदारी अधिकारी येथे बसलेला नाही

श्री.तानाजी वनवे:-सन्माननीय महापौरजी,दहा मिनीटांकरिता ही सभा स्थगित ठेवावी.

उप महापौर:- सर्व अधिका-यांना सभागृहात येण्याकरिता सांगण्यात यावे. मा. विरोधी पक्ष नेत्यांचे उत्तर लवकर देण्यात यावे.

सहा.आयुक्त(नेहरुनेगर झोन):-मा.महापौरजी, मा.सदन. दर्शनी कॉलनीचा तो नाला आहे. आपण दुपारपासूनच त्या नाल्याची पाहणी करीत होतो.

श्री.तानाजी वनवे:- मी ते नाही म्हणत आहे. रात्री ८.३० वाजता नोटीस लोकांना देता येते काय? आपल्या कायद्यात काय नमुद आहे.

सहा.आयुक्त(नेहरुनेगर झोन):-मा.महापौरजी, नाल्यावरती भिंत असेल तर आपण विदाऊट नोटीस कार्यवाही करु शकतो.

श्री.तानाजी वनवे:- नागपूर महानगरपालिकेच्या कायद्यामध्ये आहे काय? रात्री ८.३० वाजता लोकांना नोटीस देवू शकतो काय? आपण सांभाळून मला उत्तर दयावे. मी जेवढे विचारले आहे तेवढेच उत्तर दया. मला सगळे कायदे माहीत आहेत.

उप महापौर:- मोरोणे साहेबांनी उत्तर दयावे.

श्री.मोरोणे(सहा.आयुक्त,अतिक्रमण):- मा.महापौरजी, दर्शनकॉलनी येथे काही घराच्या मागे नाल्यावरती स्लॅब टाकून तो नाला बंद केला असल्याची तशी तक्रार प्राप्त झाली. त्या दिवशी पाऊस आल्यामुळे....

श्री.तानाजी वनवे:-पाईंट ऑफ आर्डर, त्या नाल्यावर स्लॅब कुणी टाकली.

श्री.मोरोणे(सहा.आयुक्त,अतिक्रमण):- स्लॅब कुणी टाकली याची माहिती प्राप्त नाही.

श्री.तानाजी वनवे:- मा.महापौरजी, आपला रेकार्ड तापासा तो स्लॅब माजी महापौर पुष्पाताई घोडे यांच्या कारकिर्दीत त्या नाल्यावर स्लॅब टाकली गेली आहे. त्या ठिकाणी बीआरओ भिंत बनविते आणि  नागरिकांना आपण नोटीस देता. रात्री ८.३० वाजता आपण नोटीस देवू शकतो काय याचे उत्तर मला आधी देण्यात यावे.

श्री.मोरोणे(सहा.आयुक्त,अतिक्रमण):- मा.महापौरजी, इमरजन्सी असेल तर आपण नोटीस देवू शकतो.

श्री.प्रविण दटके:-मा.महापौरजी, रात्री ८.३० वाजता नोटीस देण्याची काय इमरजन्सी राहू शकते.

श्री.मोरोणे(सहा.आयुक्त,अतिक्रमण):- मा.महापौरजी, दर्शन कॉलनीचा जो मुख्य रस्ता आहे त्या वर एक छोटा ब्रीज आहे. ब्रीजचा आधीचा नाला ओपन आहे परंतु ब्रीजच्या नंतरची पाण्याची जी लेवलपर्यंत त्याच्या जवळच स्लॅब टाकलेली आहे. त्या दिवशी पाऊस आला आणि त्यामुळे तेथे दोन-तीन घरापर्यंत पाणी शिरलेले होते.

श्री.प्रविण दटके:-मा.महापौरजी, त्या दिवशी पर्जन्य विभागाने असे सांगितले होते काय? की खुप पर्जन्य येईल, जिल्हाधिकारी कार्यालयाकडून असे काही सांगण्यात आले होते काय? की नागपूर शहर रेड झोनमध्ये आहे. तशाप्रकारची सुचना प्राप्त झाली होती काय?

श्री.मोरोणे(सहा.आयुक्त,अतिक्रमण):- मा.महापौरजी, तशा प्रकारची सुचना प्राप्त झाली

नव्हती. ज्या दिवशी साईड व्हिजीट केली त्या दिवशी पाऊस जास्त पडला होता.

श्री.तानाजी वनवे:-पाईट ऑफ आर्डर, अशाच प्रकारचा वॉटस् अप मा.आयुक्तांना केला होता. नंदनवन कॉलनी येथे सर्व उच्चस्तरीय लोक त्या ठिकाणी राहतात त्या कॉलनीमध्ये प्रत्येक घरी एक-एक माणुस पाणी घरात शिरले होते. त्या दिवशी मा.आयुक्त, मा. सहा.आयुक्त यांना याबाबत सांगितले परंतु ॲक्शन झाली नाही. त्या ठिकाणी इमरजंसीमध्ये कुठलेही काम करण्यात आले नाही. केवळ एखादयाने लिहिले मी आयुक्तांचा समर्थक आहे म्हणून त्या ठिकाणी ही ताबडतोब कार्यवाही झालेली आहे. मा.महापौरजी, ज्यांच्या विरोधामध्ये ताबडतोब चौकशी समिती नियुक्त करावी आणि ज्या लोकांनी रात्रीच्या वेळी या लोकांना नोटीस दिलेली आहे त्यांना निलंबित करावे अशी मागणी मी या निमित्ताने करतो. हे बरोबर उत्तर देत नाही. ज्या ठिकाणी लोक मरत असतील तर त्या ठिकाणी आपले माणसे जात नाही. मोठ मोठ खड्डे पडले आहेत, लोक नाल्यामध्ये वाहून जात आहे त्या ठिकाणी जगनाडे चौकातील नाल्यामध्ये मेश्रामांचा  मुलगा वाहून मृत पावलेला आहे. रात्री ८.३० वाजता आपण नोटीस देवू शकतो काय याचे उत्तर मला आधी देण्यात यावे.

श्री.मोरोणे(सहा.आयुक्त,अतिक्रमण):- मा.महापौरजी, मी पुन्हा एकदा सांगू इच्छितो की इमरजंसी असेल तर नोटीस देण्याला बंधन नाही.

श्री.तानाजी वनवे :- मा.महापौरजी, कुठल्या कायद्यात रात्री नोटीस देवू शकतो ते लिहिलेले आहे ते वाचून दाखवा.

उप महापौर:- कुठल्या कायद्यात रात्री नोटीस देण्यात येते ते विधी अधिका-यांनी या ठिकाणी वाचून दाखवावे.

श्री.मोरोणे(सहा.आयुक्त,अतिक्रमण):- मा.महापौरजी, महानगरपालिकेची इमरजन्सी सर्विस आहे ती २४ बाय ७ असते त्यामुळे सायंकाळी किंवा रात्री नोटीस देण्यास काही गैर नाही असे माझे नम्र निवेदन आहे.

श्री.तानाजी वनवे:-मा.महापौरजी, मला निवेदन नाही, मला ॲक्ट वाचून दाखवा. माझ्या माहितीप्रमाणे रात्री ६वाजेनंतर कोणाला नोटीस देता येत नाही. या ठिकाणी नागरिकांचा संबध नाही त्यांनी भिंत टाकलेली नाही. ती स्लॅब सुध्दा टाकलेली नाही. ती स्लॅब कुणी टाकली हेच तर तुम्हांला माहीत नाही. ती महानगरपालिकेने स्व:त स्लॅब टाकली आहे आणि महानगरपालिकाच स्व:तच स्लॅब तोडण्यासाठी नोटीस देते केवढे आश्‍चर्य आहे. तो महानगरपालिकेचा कर्मचारी ज्याला नोटीस दिली आहे त्याला सर्व कायद्या माहीत आहे.

श्री.मोरोणे(सहा.आयुक्त,अतिक्रमण):- मा.महापौरजी, मी नम्रपणे निवेदन करतो. ज्या दिवशी साईडवरती व्हिजीट केल्यानंतर आणि जी परिस्थिती दिसली. त्या नंतर त्वरित कार्यवाही करणे आवश्यक होते. याचे अतिक्रमण काढण्यासाठी मला असे वाटते आदेशाची आवश्यकता नाही.

श्री.प्रविण दटके:-पाईंट ऑफ आर्डर, मा.विरोधी पक्ष नेता जबाबदारीने बोलत आहेत आणि आपण माझ्या म्हणण्यानुसार, मला असे वाटतेअसे विधान करणे बरोबर नाही.  अतिक्रमण काढले पाहिजे हे बरोबर आहे. मी एक घटना सांगतो, महाल रोग निदान केंद्राच्या समोर एक दुकानाला आग लागली, ५०० लोक रांगेत उभे होते, सर्टीफीकेट घ्यायला ते उभे होते. मी अतिक्रमण विभागाला फोन केला, आयुक्तांना सुध्दा फोन केला. अतिक्रमण काढणे अतिआवश्यक आहे असे सांगितले तरी आजपर्यंत निघाले नाही. महाल रोग निदान केंद्राच्या आतमध्ये मोठा नाला आहे. दोन-दोन फुट पानी साचते हे इमरजंसी काम नाही काय? मा.विरोधी पक्षाच्या प्रभागातील अतिक्रमण काढायचे आहे ठीक

आहे. आपण त्यांना सांगू तर शकता की हे अतिक्रमण काढणे आवश्यक आहे. अति तातडीचे काम आहे. परंतु त्यांच्या कानावर टाकण्याची प्रशासनाची इच्छा नाही. त्या ठिकाणी मा.उप महापौरजी राहतात त्यांच्याही कानावर टाकण्याची यांना काही आवश्यकता वाटली नाही. ते काही तुमच्या कामात अडथळा निर्माण करणार होते काय? मग सद्सदविवेकबुध्दी तेथेच कां वापरली. शहरात अजून गरज नाही का अतिक्रमण काढण्याची, मी आणखी एक उदाहरण सांगतो, येथे जयदेव साहेब बसले आहेत, भिवगडे साहेब बसले आहेत, पाटील साहेब बसले आहेत. सुरेश भट सभागृहाच्या थोडया समोर गेले तर एनआयटी सोसायटीची एक जागा आहे. त्या जागेच्या बाजूला झोन कार्यालयाचे कच-याचे डॅम्पींग करण्यासाठी डम्पींग सेंटर आहे. त्या ठिकाणी दोन गोष्टी उभ्या आहेत. दोन्ही अतिक्रमणाच्या साईड आहेत. परमश्रध्देय सहा.आयुक्त भिवगडे साहेब, जयदेव साहेब आणि पाटील साहेब आणि अपर आयुक्त राम जोशी आहेत. आपल्या महानगरपालिकेच्या जागेवर अतिक्रमण केलेले आहे आजपर्यंत कार्यवाही केली नाही. त्या जागेवर नर्सरी आहे, कार वाशिंग सेंटर आहे. त्या ठिकाणी सद्सदविवेकबुध्दी वापरण्यात आली नाही.

श्री.तानाजी वनवे:-मा.महापौरजी, हे एकच उदाहरण नाही. या सारख्या अनेक ठिकाणी असे झाले आहे. आता प्रविणजी बोलले, नागनगदीच्या पुलासमोर एक नर्सरी आहे, कार वॉशिंग सेंटर आहे. याविषयी मोरोणे साहेबांना मी सांगितलेले आहे ती जागा कार वॉशिंग सेंटरवाला महानगरपालिकेनेच ती जागा त्याला अलॉट केलेली आहे अशा पध्दतीचे ते काम करीत आहे. मी शहरात अनेक ठिकाणी फिरलो, अनेक ठिकाणी नाल्याच्या भिंती तुटलेल्या आहेत, अनेक ठिकाणी नाला वाहून चाललेलेआहे. त्यामुळेअनेक नागरिकांच्या घरात पानी शिरते. अनेक ठिकाणी खड्डे पडलेले आहे. माझ्या प्रभागात निलम पान मंदीर चौकामध्ये एक-एक माणुस पानी जमा होते. नागपूर शहरातील आमच्या सर्व मा.नगरसेवकांची हीच समस्या आहे. पावसाळा सुरु झालेला आहे. मी पावसाळयापूर्वी मा. महापौरजी आपल्याला पत्र दिले होते. मा. आयुक्तांना सुध्दा पत्र दिले होते की पावसाळयापूर्वी आपण सर्व नाल्याची, गडरची टाके असतील त्यांची दुरुस्ती आणि साफसफाईची कामे इमरजन्सीमध्ये करावी. कोणतेही एक काम झाले नाही. आणि जेथे आवश्यकता नाही. ज्या नाल्यावरची भिंत महानगरपालिकेने बांधते, ज्या नाल्यावरती महानगरपालिकेने स्लॅब बांधते, बीआरओच्या ऑफीसवाल्यांनी भिंत बांधते यांच्या निदर्शनास येत नाही. त्यांनी कबुल केले ही स्लॅब कुणी टाकली माहीत नाही. एवढया वर्षापासून तुम्ही सहा.आयुक्त आणि आयुक्त या पदावर काम करीत आहात. केवळ एक वॉटस् अपवरती आयुक्तांना मॅसेज आला आणि त्या मॅसेजवरती कार्यवाही झाली. मोरोणेसाहेबांनी सांगितले आयुक्तांचा आदेश आहे. आम्हांला तोडावे लागते याच्यामध्ये आम्ही काही करु शकत नाही. या शहरामध्ये या पध्दतीचे अनेक नाले आहेत. अनेक ठिकाणी नाल्यावरती भिंती वाहून गेल्या आहेत, नाल्यावरती स्लॅब टाकलेल्या आहेत त्या ठिकाणी तोडणार आहे की काय कार्यवाही करणार आहे याचे उत्तर आयुक्तांनी दयावे. असे ज्या ज्या ठिकाणी अशा प्रकारचे झाले असेल, मग चेंबरचा प्रश्न असो. आताच पिंटू झलके यांनी सांगितले. अनेक ठिकाणी गडर लाईन वाहून गेलेल्या आहेत. नागरिक नगरसेवकांच्या घरावर येतात, आणिआम्हांला आई, बहिणी नाहीत, आमची काही इज्जत नाही. कुणी काहीही बोलले तरी आम्ही उत्तर देत नाही. शेवटी आम्ही लोकप्रतिनिधी आहोत. आम्ही त्यांच्या मतावर निवडून आलेलो आहेत. लोकांचे ऐकणे आमचे काम आहे. आता वॉटस् अप आणि फेसबुकवरती जे सर्व सुरु झाले आहे. याच्यामध्ये ज्या लोकांनी वॉटस् अप फेसबुकवरुन आम्ही आयुक्तांचे समर्थक आहोत म्हणून लिहिले त्यांचे

काम पहिले होत असेल तर या गोष्टीचा मी निषेध करतो. कारण येथे जनप्रतिनिधी आहेत. आयुक्तांनी चांगले काम केले त्याची तारीफ केलेली आहे. त्यांनी कोव्हीडमध्ये चांगले काम केल्याबद्दल त्यांचे आणि त्यांचे चमूची तारीफ केलेली आहे. परंतु हे जनतेचे छोटे छोटे काम आहेत. इमरजन्सी वर्क आहे. इमरजन्सी वर्क मध्ये पैसा नसेल तर मी गर्व्हमेंटमध्ये काम केले आहे. मला कायद्या कानुन माहीत आहे. मी मा. मुख्यमंत्र्यांसोबत काम केले आहे. मी स्विय सहा.म्हणून काम केलेले आहे. मंत्रालयाचे प्रशासन मला माहीत आहे. मला कायद्या सांगण्याची गरज नाही. जसे या ठिकाणी संबंधितसहा.आयुक्त मोरोणे आणि सहा.आयुक्त नेहरुनगर खोटे बोललेले आहेत. तसा कायद्या मला सांगावा, तसा कायद्या मला दाखवून दयावा. रात्री लोकांना नोटीस देवू शकतो काय? येथे चायनाने हमला केला होता काय? की अशी कुठली इमरजन्सी घटना घडली होती. तर अशी कुठलीही घटना घडली नाही. परंतु केवळ एक व्यक्ती वॉटस् अप वर मॅसेज टाकतो, आयुक्तांना टव्हीट करतो आणि ते रात्री ताबडतोब त्या  ठिकाणी येतात. असे तर कुणीही काहीही करु शकतो. त्या ठिकाणी वस्तुस्थिती जावून बघावी. मी आपल्या माध्यमातून सहा.आयुक्तांना विचारतो, ती स्लॅब तोडली काय?

उप महापौर:- सहा.आयुक्तांनी उत्तर दयावे.

सहा.आयुक्त(नेहरुनगर झोन):-मा.महापौरजी, दर्शन कॉलनी येथील नाल्याची भिंत आपण तोडण्याचे काम केले. स्लॅबचा काही भाग जो डीमच्या जवळचा भाग होता तो तोडलेला आहे. पुर्ण स्लॅब तोडण्याची आवश्यकता नाही असे अभियंत्याचे मत होते.

श्री.तानाजी वनवे :- मा.महापौरजी,  ज्या स्लॅबमुळे पानी अडते तर भिंतीमुळे पानी अडत नाही. ती स्लॅब अजूनही तोडलेली नाही. कोणत्या अभियंत्यांने सांगितले ,आधी स्लॅब तोडायला पाहिजे होती आणि नंतर भिंत तोडायला पाहिजे. स्लॅबमुळे पुर्ण नाल्याचे पाणी लोकांच्या घरी जावून त्या ठिकाणी प्राणहानी होवू शकत होती. ज्या  प्रभागात मी राहतो तो आपला प्रभाग आहेआणि मी त्या प्रभागाचा रहिवासी आहे आणि माझ्या घराजवळ आहे. लोक माझ्याकडे आले आणि त्यांनी मला सांगितले, मला त्यांच्याकडून माहिती मिळाली. तो स्लॅब आपण तोडलेला नाही, तो स्लॅब आपण कां तोडलेला नाही. कोणत्या इंजिनिअरने चुकीची माहिती दिली ते विचारण्यात यावे.

उप महापौर:- कोणत्या इंजिनिअर चुकीची माहिती दिली ते सांगण्यात यावे.

सहा.आयुक्त(नेहरुनगर झोन):-मा.महापौरजी, स्लॅब एकसाथ तोडले तर पुर्ण नाला खचून जाईल. म्हणून हे अभियंत्याचे मत आहे. टेक्निकली ही बाब आहे.

श्री.तानाजी वनवे:-मा.महापौरजी, जे पावसाचे पानी नागरिकांच्या घरी जात आहे. सांप, विंचु पाण्यामुळे लोकांच्या घरात जात आहे. त्यांना कुठले काम कधी करावे हे माहीत नाही. कुठल्या इंजिनिअरने त्यांना सांगितले त्याला बोलविण्यात यावे.

उप महापौर:- कोणत्या अभियंत्यांने चुकीची माहिती दिली त्याला बोलविण्यात यावे. ते अभियंते उपस्थित आहेत किंवा नाहीत. त्यांचे नाव सांगा आणि तुम्ही उत्तर दया.

श्री.धर्मपाल मेश्राम:-मा. महापौरजी, ते अभियंता या सभागृहात उपस्थित नसतील तर हा विषय पुढे न्यावा. सभागृह पुढे नेण्याची अत्यंत आवश्यकता आहे. तो अभियंता उपस्थित नसेल व तात्काळ उपस्थित होवू शकत नसतील तर हा विषय विरोधी पक्ष नेत्यांनी तोपर्यंत स्थगित ठेवावा अशी मी आपल्या माध्यमातून विनंती करतो आाणि सभागृह पुढे न्यावे.

उप महापौर:- अभियंता उपस्थित नसेल तर त्यांना उपस्थित राहण्याविषयी कळविण्यात यावे.

ए.सी. साहेबांनी या ठिकाणी उत्तर दयावे. ही चर्चा पुढे सुरु ठेवावी.

श्री.संदीप जाधव:- मा.महापौरजी, १० मिनिटे झालीत तेव्हापासून एकही अधिकारी या ठिकाणी बसलेला दिसत नाही.

श्री.तालेवार(अधिक्षक अभियंता):-मा.महापौरजी, दर्शनकॉलनी येथील जो नाला आहे. ज्या दिवशी पाऊस आला होता त्या दिवशी पाहणी केली असता असे निदर्शनास आले नाल्याची स्लॅब आहे त्यावर बॅरेटचे बांधकाम होते ते नाल्याच्या एका बाजूला खाली भिंत ढासळल्यासारखी वाटत होती. त्यावेळी नाल्यावर बॅरेटचे जे बांधकाम होते त्यानंतर तीच भिंत पुढे गेली होती. तेथपर्यत आम्हांला इन्स्पेक्शन करणे शक्य नव्हते त्या नंतर नाल्यावर रस्त्याच्या बाजूला भिंती होत्या तेथेही इन्स्पेक्शन करणे शक्य नव्हते. म्हणून त्या भिंत काढण्याचे काम करण्यात आले.

श्री.तानाजी वनवे:-मा.महापौरजी, मी काय विचारले, ती भिंत कुणी टाकली ही सुध्दा आपल्याजवळ माहिती नाही. कुणी भिंत टाकली ते मी सांगितले. श्रीमती पुष्पा घोडे माजी महापौर होत्या त्यांच्या कारकिर्दीमध्ये त्या नाल्यावर भिंत टाकली. त्याला महानगरपालिकेने मंजूरी दिली, त्यावेळेस आयुक्तांनी मंजूरी दिली होती. तेव्हा ती भिंत होती हे माहीत नव्हते काय? आजूबाजूला भिंत होती ती कुणाची होती. नागरिकांनी बांधलेली ती भिंत नव्हती.

श्री.तालेवार(अधिक्षक अभियंता):-मा.महापौरजी, ती नाल्यावर स्लॅब टाकली होती ती भिंत होती. ती त्यांच्या प्रायव्हेट प्रिमायसेस मध्ये पुढे गेलेली भिंत होती.

श्री.तानाजी वनवे:-मा.महापौरजी, बीआरओ बार्डर सेक्युरिटीचे जे ऑफीस होते. त्या ठिकाणी प्रधानमंत्री आवास योजनेची जी स्किम होती त्या बीआरओच्या ऑफीसवाल्यांनी टाकलेली भिंत होती. भिंत टाकते बीआरओ, नाल्यावरती स्लॅब टाकते महानगरपालिका, नाल्याची भिंत बांधते महानगरपालिका आणि नोटीस देतात एक्स.वाय.झेडलोकांना ज्या नागरिकांचा दोष नाही अशा नागरिकांना रात्रीच्या वेळी नोटीस देवून त्यांची मानहानी करण्याचे काम, त्यांना त्रास देण्याचे काम, त्यांना मानसिक त्रास देण्याचे काम महानगरपालिकेच्या वतीने होत आहे. म्हणून जे जे जबाबदार असतील त्यांसाठी चौकशी समिती गठीत करुन नागरिकांचे बयान घेवून अशा प्रकारचे अतिक्रमण पुर्ण शहरात आहे. या शहरामधून अतिक्रमण कां काढण्यात आले नाही. याची माहिती सुपरिटेंडन्ट इंजिनिअर यांनी दयावे. याच्यात चौकशी बसवावी यात जे दोषी असतील त्यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी. त्यांनी कबुल केले नाल्यावरती स्लॅब कुणी टाकले आम्हांला माहीत नाही. नाल्यावर भिंत कुणी बांधली आम्हांला माहीत नाही. एवढया वर्षापासून नोकरी करीत आहेत, मग काय करीत आहे. संबंधितांवर कार्यवाही केली पाहिजे. कारण नागरिकांच्या इज्जतीचा प्रश्न आहे. त्या प्रकरणामध्ये लोकांची मानहानी करण्याचा यांना कुणाला अधिकार नाही.

श्री.मोरोणे(सहा.आयुक्त,अतिक्रमण):- मा.महापौरजी, ज्या अतिक्रमणाबाबत माहिती प्राप्त होते त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

श्री.तानाजी वनवे:-मा.महापौरजी, पाईंट ऑफ आर्डर, नागनदीच्या बाजुला नर्सरी आणि कार वॉशिंग सेंटर बांधलेले आहे. त्याला अनेक वर्ष झाली त्या ठिकाणी एक नर्सरी सुरु आहे. नागपूर शहरात अनेक ठिकाणी अशा नर्स-या सुरु आहेत. डोळयांनी दिसून सुध्दा आपण कां कार्यवाही करीत नाही. एक गरीब माणुस आपल्या मेहनतीने घर बांधत असेल तर त्याला काही कारण नसतांना नोटीस देण्याचे काम कां करता. त्या लोकांना रात्री नोटीस कां दिली. रात्री नोटीस देता येते काय? विधी अधिका-याने तो ॲक्ट वाचून दाखविण्याविषयी सांगण्यात यावे.

उप महापौर:- विधी अधिका-याने तो कायद्या वाचून दाखववावा. तुमच्या जवळ काही माहिती आहे किंवा नाही आहे.

विधी अधिकारी(श्री.कपले):-मा.महापौरजी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमच्या कलम ३८८ मध्ये प्रवेश केल्याचा १ मध्ये उल्लेख केला आहे. एक असा म्हणतो कोणतीही प्रवेश सुर्यादयापासून सुर्यास्तापर्यंत करता येणार नाही. परंतु ज्या बाबत या अधिनियमाअंतर्गत स्पष्टपणे तरतूद करण्यात आली की अशा कोणत्याही बाबतीत दिवसा किंवा रात्री असा प्रवास करता येईल.

श्री.तानाजी वनवे:-मा.महापौरजी, रात्री नोटीस देता येते काय? ज्या लोकांचा भिंत बांधण्यापासून काही संबंध नाही अशा व्यक्तिंना नोटीस देता येईल काय?

विधी अधिकारी(श्री.कपले):-मा.महापौरजी, नोटीस देण्याचा उल्लेख आहे. नोटीस देण्याच्या वेळेचा असा कोणतेही प्रावधान करण्यात आले नाही. नोटीस देण्यासाठी कुणी अडथळा निर्माण केला तर आपण जावून त्या घराला नोटीस चिपकवू शकतो.

श्री.तानाजी वनवे:-मा.महापौरजी, ते वेगळया परिस्थितीत आपण चिपकवितो तो महानगरपालिकेच्या अधिकारात आहे. परंतु रात्रीच्या वेळी ज्यांचा या घटनेशी काही संबंध नाही त्या लोकांना नोटीस देता येते काय? हे मी विचारलो. हे माझे घर नाही आणि त्या ठिकाणी एक्स.वाय.झेडचे घर आहे तर त्याला आपल्याला नोटीस देता येते काय?

श्री.संदीप जाधव:-मा.महापौरजी, मा. विरोधी पक्ष नेत्यांनी जो प्रश्न याठिकाणी उपस्थित केला त्यावर कोणताही अधिका-याला उत्तर देता आले नाही. महा.महापौरजी, मी विनंती करतो याबाबत ३ मा.सदस्यांची एक समिती स्थापन करुन चौकशी समिती आणि त्याचाअहवाल १५ दिवसाच्या आंत पुढच्या सभागृहाच्या पटलावर ठेवण्याचे निर्देश आपण दयावे.

श्री.तानाजी वनवे:- मा.महापौरजी,कोव्हीड-१९ वर प्रतिबंध करण्याकरिता या जिल्हयाचे मा.पालकमंत्री नितीन राऊत, मा. सुनिल केदार, माजी मंत्री सतिश चतुर्वेदी आणि आमच्या सर्व पक्षाचे नगरसेवक यांची एक बैठक विभागीय आयुक्त कार्यालयात बोलविण्यात आली होती. त्या ठिकाणी नितीन साठवणे बैठकीला उपस्थित होते. त्या ठिकाणी सर्व नगरसेवकांनी कोव्हीडच्या स्थितीबद्दल माहिती त्यांना दिली. ज्या ज्या अडचणी होत्या, आम्ही लॉकडाऊनच्या विरोधात नाही, कोरंटाईनच्या विरोधात नाही. जे काम प्रशासन आणि आयुक्त करतात. आयुक्तांनी केलेल्या चांगल्या कामाबद्दल आम्ही सोबत आहे. परंतु ज्या कामामध्ये त्रुटया आहेत. त्याच्यामध्ये विषय असा आहे, लॉकडाऊन करीत असतांना ज्या ठिकाणी लॉकडाऊन झाला, नियमानुसार असावे. नियमानुसार आयुक्तांनी कार्यवाही करावी त्यात आम्ही कोणताही हस्तक्षेप करीत नाही. परंतु त्या ठिकाणी अन्न मिळाले पाहिजे, त्या ठिकाणी धान्य मिळाले पाहिजे, त्या ठिकाणी लहान मुले आहेत तेथे दुध मिळाले पाहिजे, त्या ठिकाणी आजारी जर कुणी असतील तर त्या व्यक्तीला हॉस्पीटलमध्ये जाण्याची परवानगी मिळाली पाहिजे. एखादी आमची भगिनी असेल तिच्या डिलव्हरीचा पिरेड असेल तिला हॉस्पीटलमध्ये जाण्यासाठी कुठलीही अडचण निर्माण होवू नये. कोरंटाईनचा झाल्यानंतर ज्या दिवशी तो पेशंट सुधारतो, निगेटिव्ह येतो त्या दिवसापासूनचा पिरेड आहे तो २८ दिवसाचा आहे. आणि २८ दिवस आणि १४ दिवस म्हणजे तो दीड महिन्याचा तो पिरेड आहे. त्या दिड महिन्यामध्ये त्याच्या घरी खायला आहे किंवा नाही. त्या दीड महिन्यामध्ये त्याला भाजी घ्यायची आहे. लॉकडाऊन एरियामध्ये कुणाला जावू देत नाही. मा.महापौरजी, आपल्या माध्यमातून आयुक्तांना विनंती आहे. त्या ठिकाणी भाजीची व्यवस्था आहे, अन्नधान्याची व्यवस्था आहे. कारण आपला आणि त्या

भागातील संवाद तुटून जातो. म्हणून कुठला असा अधिकारी असला पाहिजे किंवा पोलीस विभागाचा अधिकारी असला पाहिजे. त्यांना रोज अनाऊंस करावयाचे की या लॉकडाऊनच्या एरियामध्ये कुणाला भाजी पाहिजे, कुणाला दुध पाहिजे, कुणाला कणीक पाहिजे आहे. ज्या जीवनावश्यक वस्तु आहेत त्याची व्यवस्थित माहिती नागरिकांकडून घेवून जर त्या ठिकाणी आपण त्यांना पोहचत्या केल्या तर त्याच्यामुळे लोकांमध्ये भितीचे वातावरण आहे ते दूर होईल. लोकांमध्ये भिती आहे आम्ही लॉकडाऊन झालो, आम्ही दीड महिन्याकरिता जेलमध्ये गेलो या सारखे वातावरण आहे. आता आमच्या नंदनवन परिसरामधले उदाहरण आहे. एकच लाईन लॉकडाऊन झाली, संजय नगर, हसनबाग येथे एक म्हातारी कुठूनतरी आली. मेडीकलमध्ये ती तीन-चार दिवस ॲडमीट होती. ती पॉझीटीव्ह निघाली. ती नुकतीच त्या वस्तीमध्ये नव्याने आली. आपण ती गल्लीच लॉकडाऊन केली. आधी पुर्ण वस्ती लॉकडाऊन व्हायची आता एकच गल्ली झाली. त्या गल्लीमध्ये कोणाचाही संपर्कात आली नाही. तेथील लोक कोरंटाईन केल्या गेले. मला तेथून फोन येणे सुरु झाले. आम्ही कसे करायचे. धान्य नाही, अन्न नाही वगैर वगैरे, आपण त्यांना अनुमती दयायची की १५ दिवस लॉकडाऊन राहील, मग २८ दिवस लॉकडाऊन राहील.

श्री.विजय झलके:-मा.महापौरजी, पाईंट ऑफ इन्फोमशन, एक माझी विनंती या विषयाच्या अनुषंगाने आपल्या निदर्शनास आणून देणे अनिवार्य आहे की, ज्या लोकांना कोरंटाईन केले, माझ्या प्रभागातील एका बाजूच्या लोकांना कोरंटाईन केले होते आणि आता ते कंटोनमेंट झाले आहे. आणि आता १४ दिवस ते आपल्या नोकरीवर जावू न शकल्यामुळे त्यांना त्यांच्या प्रायव्हेट कंपनीने नोटीसेस बजावल्या आहेतकी आपण १४ दिवस कामावर येवू शकले नाही. मी आपणांस एक महत्वाची सुचना देवू इच्छितो, अशाप्रकारे लोकांची नोकरी जाण्याची स्थिती निर्माण झाली आहे. लोक बेरोजगार होण्याची स्थिती निर्माण झाली आहे. प्रशासनाच्या वतीने असे काही पत्र त्यांना उपलब्ध होणार आहे काय की आपण १४ दिवस कोरंटाईन असल्यामुळे त्यांचा जो पगार आहे किंवा त्यांना नोकरीवरुन काढून टाकण्याचा जो नोटीस मिळाला आहे त्यात प्रशासनाच्या वतीने काही उपाययोजना आहेत काय? मा.आयुक्तांनी आपल्या निवेदनात ती माहिती दयावी अशी विनंती आहे. धन्यवाद.

श्री.तानाजी वनवे:- मा.महापौरजी, त्या ठिकाणी पोलीस डिपार्टमेंट, सेक्युरिटी डिपार्टमेंटचे लोक आहेत त्यांना उद्या बाहेर निघता येईल काय? कारण त्या भागात आलेला पेशंट हा बाहेरुन आलेला आहे. तो तिथला नाही आहे. तो आल्या आल्या मेडीकलमध्ये ॲडमिट झाला. ठीक आहे, आपल्या नियमानुसार जे आहे ते करावे परंतु तेथे राहणा-या लोकांच्या बाबतीत जे नोकरीवर आहेत त्यांच्या बाबतीतील सुचना त्यांच्या त्यांच्या विभागाला कळविले गेले पाहिजे की आमच्या गल्लीमध्ये पॉझिटीव्ह पेशंट मिळाला म्हणून कामावर येता येणार नाही. म्हणून माझी सुचना आहे त्या लोकांच्या ऑफीसपर्यंत पोहचविण्याचे काम आपण या माध्यमातून केले पाहिजे. नागपूर महानगरपालिकेची आर्थिक स्थिती १९८५ पासून पाहतो. त्यावेळेला १ लाख रुपये वार्ड निधी मिळायचा. आता जशी ३ लाखाची फाईल बनते त्याप्रमाणे त्या वेळेला ३ हजाराची फाईल तयार होत असे. मुरुम टाकण्याची, बोल्डर टाकण्याची किंवा रस्ता तयार करण्याची फाईल तयार होत असे. परंतु त्याही वेळी अडचण असे. त्या वेळेलाही कामाच्या अडचणी होत्या. लिमिटेड बजेट राहायचे त्यावेळेला आमच्या कडे ऑक्ट्राय असल्यामुळे रोजची आवक होती. रोजचा पैसा यायचा त्यामुळे त्याही वेळेला आर्थिक स्थिती खुप चांगली नव्हती. येथे मेश्रामजी बसले आहेत ते ऑक्ट्रायशी संबंधित होते. त्याच्यानंतर

ऑक्ट्राय संपला, एलबीटी आली. एलबीटी कायम राहिली असती तर आज आम्ही दोन हजार कोटीच्या जवळ जवळ गेलो असतो. आम्हांला कुणावर अवलंबून राहण्याची गरज राहिली नसती. परंतु एलबीटी संपली आणि आता जीएसटी आली. मी अनेकदा आपल्या भाषणामध्ये म्हटले आहे की आपण मा.मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या कुबडयावर जीवन जगण्याचे काम करतो आहे.मा.मुख्यमंत्र्यांनी उद्या जर पैसे दिले नाही तर आपण या ठिकाणी पगार सुध्दा देवू शकत नाही. अशा प्रकारची परिस्थिती महानगरपालिकेची आहे. महानगरपालिकेमध्ये देवेंद्र फडणवीसांचे या ठिकाणी मी अभिनंदन करतो. त्यांनी त्यावेळेला नागपूर महानगरपालिकेला अधिक निधी दिला. त्यांनी निधी वाढवून दिली कारण त्या वेळेला मी शिष्टमंडळामध्ये मी होतो. कारण कुठल्या व्यक्तिने चांगले काम केले असेल तर त्याची तारीफ करणे काही वाईट नाही. त्या व्यक्तिने काम केले नसेल तर त्याची निंदा करणेही काही वाईट नाही. नागपूर महानगरपालिकेमध्ये कालपर्यंत ज्याप्रमाणे सत्तापक्षाचे काम सुरु होते. ते कालपर्यंत मतदानाने, बहुमताने ठराव पास करायचे. परंतु आता मुंढे साहेब आल्यापासून थोडीशी त्यांची अडचण झाली आहे. त्यामुळे ते कोणत्याही बैठकीचे पत्रही सुध्दा पाठवित नव्हते. कारण या शहरामध्ये वन मॅन आर्मी सुरु होती. परंतु आता या ठिकाणी सर्व कामच बंद झाले आहे. सर्वाचे कामच बंद झाले आहे. याच्यामुळे रस्त्याचे असो, नालीचे असो, गडरचे असो, प्रोजेक्टचे काम असो, स्मार्टसिटीचे काम असो. स्मार्ट सिटीच्या संदर्भामध्ये जेव्हा कधी वेळप्रसंग येईल तेव्हा चर्चा करु. परंतु आजची जी आर्थिक स्थिती आहे, ती स्थिती एवढी काही खराब आहे असे मला वाटत नाही असे माझे मत आहे. मुंढे साहेब आले आणि पैसा संपला असा काही भाग नाही. परंतु महानगरपालिकेत जुने देणे हे कित्येक वर्षापासून सुरु आहे. याच्यात काही कमी जास्त झाले आहे त्या निश्चितपणे आयुक्तांनी चौकशी करावी. याच्यामध्ये जे नगरसेवक व जे पदाधिकारी दोषी असतील त्यांच्यावर कार्यवाही करावी परंतु सर्वसकट सर्वांचे काम बंद करु नये अशी आपल्या माध्यमातून आयुक्तांना विनंती आहे. जो अत्यावश्यक काम आहे आणि वॉटस् अप आणि फेसबुकचा जो पुर आला आहे. आपण जे ॲप टाकलेले आहे की एका दिवशी एक लाख शिकायती देवू शकतो. जर प्रत्येक नगरसेवकाने एक लाख शिकायती पाठवायला सुरुवात केल्या तर आपण ॲप बंद करुन टाकाल. कारण विषय असा आहे. या शहरामध्ये एखादया व्यक्तिने नगरसेवकांच्या विरोधात वॉटस् अप वर पोस्ट टाकावी आणि त्याचे काम ताबडतोब व्हावे हे आम्ही बिलकुल सहन करणार नाही. या संबंधी गुन्हा दाखल करायला जावे लागले तरी चालेल कारण मी स्पष्ट बोलणारा व्यक्ति आहे. कारण मला जे पटते ते मी बोलतो आणि जे पटत नाही ते मी बोलत नाही आणि जे बोलायचे आहे त्याला बोलण्यासाठी कुणाची परवाहही करीत नाही. याच्यामुळे नगरसेवकांवर अन्याय होत असेल, नितीन साठवणेच्या संदर्भात जे महान डॉक्टर जे गंटावार आहेत. ज्या फुके ताई आहेत त्यांनी सांगितले. आजपर्यंत मी या गंटावाराचे नाव ही ऐकले नव्हते आणि कधी बघितले सुध्दा नव्हते. मी कोणत्याही व्यक्तिच्या विरोधात नाही. मी आधीच सांगितले, कोव्हीडमध्ये आयुक्तांसोबत ज्या ज्या व्यक्तिने कामे केलीत त्यांचे अभिनंदन केले आहे परंतु कोव्हीडमध्ये काम करीत असतांना कोरंटाईन भागातील लोकांना अन्न मिळत नसेल, दुध मिळत नसेल, आवश्यक साधनसामुग्री मिळत नसेल, लोकांना डिलीवरीला जायला गाडी मिळत नसेल आणि जर कां नगरसेवकांने खर सांगण्याचा प्रयत्न केला तर त्याच्यावर गुन्हे दाखल होत असतील तर ही निश्चितरुपाने गंभीर बाब आहे. कारण लोकप्रतिनिधी नितीन साठवणे माझ्या संपर्कात होते. मी रोज सवाई साहेबांना फोन करीत असे, सवाई साहेबांनी मी माहिती देत होतो आणि त्यांच्याकडून माहिती

घेवून पुर्ण अपडेट करीत असे. मला गंटावारचे नाव ही माहित नव्हते. परंतु कार्यालयाच्या काही चुकां मुळे जर नितीन साठवणे वर जर गुन्हा दाखल होत असेल तर निश्चितरुपाने त्याची चौकशी करुन त्याचा पुर्नविचार करावा. मा.महापौरजी , मी आपल्याला विनंती आहे. काही ठिकाणी सोशल मिडीया वर फार वाईट पोस्ट टाकल्या आहेत. आपल्याही बाबतीत आहेत आणि नगरसेवकांच्याही बाबतीतील आहेत. याचा ठिकाणी उल्लेखही करता येत नाही. त्या लोकांच्या विरोधामध्ये आपण त्यांच्या बाबतीत पोलीस आयुक्तांना बोलवून गंभीर ॲक्शन घेण्यासारखे हे गुन्हे आहेत. निश्चितपणाने ते आपण केले पाहिजे. महानगरपालिकेमध्ये मी शासनाचे अभिनंदन या ठिकाणी करेल मंत्रीमंडळाने सुध्दा करेल. काल आमचे पेठेजी आणि अनेक लोकांनी सलुन उघडण्याच्या बाबतीत मागणी केली होती. २८ तारखेपासून सलुन उघडण्याचा निर्णय महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळाने घेतलेला आहे. म्हणून मी त्यांचे मनापासून या सभागृहामध्ये अभिनंदन करतो. या ठिकाणी महिला सेलचा उल्लेख करण्यात आला. महिला सेल चालविणारी जी काही एनजीओ असतील. कुणाची असतील, काय असतील यात मला जायचे नाही. परंतु जे चांगले काम करीत असतील त्यांचेसाठी मा.महापौरजी, ३० तारीख ही त्यांची कंत्राट संपण्याची शेवटची तारीख आहे. निश्चितरुपाने तो आपल्याला अधिकार आहे, प्रशासनाला अधिकार आहे. समुपदेशन केंद्र बंद ठेवायचे की सुरु ठेवायचे. माझी या सभागृहाला आणि आपल्याला विनंती आहे की जे चांगले काम करीत असतात त्यांना निश्चितरुपाने ते केंद्र सुरु ठेवण्यात यावे. त्याच्यामुळे महिलांवर होणारे अत्याचार त्या ठिकाणी घरोघरी छोटे मोठे जे तंटे होते ते सामोपचाराने दूर करण्याचे आणि त्यांचे तंटे सोडविण्याचे काम ही कार्यरत समुपदेशन केंद्रातील मंडळी करीत असतात. हे केंद्र कार्यरत ठेवावे. नागपूर शहरामध्ये अनेक सेवा सुरु झाल्या आहेत.कोव्हीड-१९ मध्ये सोशल डिस्टींगचे पालन करुन हळूहळू अनेक सेवा सुरु होत आहेत. परंतू नागपूर शहरातील बस सेवा अजून सुध्दा सुरु झाली नाही. त्यादृष्टीने सुध्दा आपण या ठिकाणी काही प्रमाणात बरेच नागरिक माझ्याकडे दोन-तीन आठवडयापूर्वी शिष्टमंडळ घेवून आले आणि म्हणाले ही बस सेवा सुरु करावी अशा प्रकारची मागणी आहे. या संबंधात आपण निर्णय घ्यावा. एक माहिती मला हवी आहे. जी कामे सुरु होती वार्ड फंडाची किंवा कोणत्याही फंडाचे असो. ज्यांचे कार्यदेश झाले, कार्यादेश होवू ती कामे सुरु झाली. परंतु कोव्हीड-१९ आल्यामुळे अनेक जी काही अशी कामे आहेत ती बंद झाली त्याची माहिती मला देण्यात यावी.

उपमहापौर:- तालेवार यांनी माहिती दयावी.

श्री.तालेवार(अधिक्षक अभियंता):-मा.महापौरजी, सुरु असलेल्या महसुली आणि भांडवाली कामांची संख्या ८१७ आहे. लॉकडाऊनच्या काळामध्ये मजूर वर्ग नसल्यामुळे निश्चितपणे काही कामे बंद होती. आता मजूर वर्ग उपलब्ध होईल त्याप्रमाणे कामे सुरु करण्यात येतील.

श्री.तानाजी वनवे:- मा.महापौरजी, माझी आपल्या माध्यमातून विनंती आहे. लॉकडाऊन उघडल्यानंतर आपण ठेकेदारांना पत्र देणार आहे काय? आपली कामे अर्धवट राहिलेली आहेत सुरु करण्यासाठी आपल्याला पत्र दयावे लागेल. मजूर कुठुन आणायचे हा त्यांचा प्रश्न आहे.

श्री.तालेवार(अधिक्षक अभियंता):-मा.महापौरजी, पत्र देण्याचे काही कारण नाही. कारण लॉकडाऊन उघडल्यानंतर त्यांची कामे त्यांना पुर्ण करावयाची आहेत.

श्री.तानाजी वनवे:- मा.महापौरजी, अनेक कॉन्ट्रक्टरशी माझी चर्चा झाली आहे. आम्हांला कुठलेही पत्र मिळाले नाही असे ठेकेदार म्हणत आहे. त्यांचा कालावधी वाढवून त्यांना पत्र दयावे लागेल. या कोव्हीड-१९ मध्ये जे जेवण दिले जात होते त्या अन्नामध्ये अनेक ठिकाणी अळया आल्या

आहेत. तर त्यांनी त्या जेवणामध्ये दुरुस्ती केलेली आहे काय? कोण कंत्राटदार आहे, कोण व्यवस्था बघतो त्यांनी उत्तर दयावे.

श्री.तालेवार(अधिक्षक अभियंता):-मा.महापौरजी, आता कोरंटाईन सेंटर आहेत त्या ठिकाणी जे जेवण उपलब्ध होत आहे ते राधास्वामी सत्संग संस्थेकडून उपलब्ध होत आहे.

श्री.तानाजी वनवे:- मा.महापौरजी, मला हे नाही म्हणावयाचे, तुम्ही राधास्वामी सत्संग मधून घ्या किंवा आर्यभवनामधून घ्या आम्हांला काही करायचे नाही. परंतु जे जेवणामध्ये कॉकरेच निघत आहे, अळया निघत आहे हे कधीपर्यंत बंद होणार आहे.

श्री.तालेवार(अधिक्षक अभियंता):-मा.महापौरजी,१६.०६ ला वॉटस् अप फोटो आला होता. त्याची शहानिशा करण्यात आली. दुसरे जे कोरंटाईन कमान्डर आहेत त्यांच्याकडे अशा प्रकारची कोणतीही तक्रार आली नव्हती. पाचपावलीचे इन्सर्ट कमान्डर आहेत. ७ दिवसाने आपले कमान्डर बदलतात. पी.डब्लू.डी., एन.आय.टी. आणि इतर सर्व शासकीय विभागाचे कर्मचारी आणि अधिकारी त्या ठिकाणी नियुक्त केले आहेत.

श्री.तानाजी वनवे:- मा.महापौरजी, पावसाळा सुरु झाला आहे आणि शहरात खुप खड्डे पडलेले आहेत. या शहरातील किती खड्डे बुजविण्यात आले आहे याची माहिती दयावी.

श्री.तालेवार(अधिक्षक अभियंता):-मा.महापौरजी, खड्डे बुजविण्यात आले याची माहिती माझ्याकडे नाही. मी माहिती घेवून मी सांगतो,

महापौर:- ३ दिवसात उपलब्ध करुन दयावी.

श्री.जितेंद्र कुकडे:-मा.महापौरजी, वनवे काका माझ्या प्रभागात राहतात. मी एक बघितले मा.महापौरजी, रस्त्यावरील खड्डे दुरुस्त होत नाही. आम्हांला माहिती देत नाही. विरोधी पक्ष नेत्यांना माहिती देत नाही. ॲपवर टाकली तर २४ तासात खड्डे बुजवितात.

श्री.तानाजी वनवे:- मा.महापौरजी, आतपर्यंत किती खड्डे बुजविले याची माहिती विचारलेली आहे.

श्री.तालेवार(अधिक्षक अभियंता):-मा.महापौरजी, सध्या माझ्याकडे माहिती नाही. मी माहिती उपलब्ध करुन सांगतो.

श्री.तानाजी वनवे:- मा.महापौरजी, ॲपवर तक्रार टाकली तर किती खड्डे बुजविले. अशी दोन्ही माहिती दयावी.

महापौर:- ३ दिवसांत सर्व माहिती दयावी.

श्री.तानाजी वनवे:- मा.महापौरजी, या लॉकडाऊनच्या काळामध्ये बरेच लोक आपल्या परिवारापासून, रोजगार नसल्यामुळे हालअपेष्ठेचे जीवन जगत आहेत. जे फेरीवाले आहेत, फुटपाथवर मासोळी विकतात, कुणाचे मटनाचे दुकाने आहेत, कुणी भाजीपाला विकतात आणि इतर धंदे फेरीवाले लोक करीत आहे त्या ठिकाणी मी आपल्याला एन.डी.एस.च्या संदर्भात सांगतो, मागच्या वेळेस मी बोललो होतो, एन.डी.एस. नावाचे जे भूत आहे त्याचे या ठिकाणी घर करु नका. या पूर्वीच्या लोकांना फार वाईट अनुभव आला आहे. महानगरपालिकेचा कर्मचारी चांगला वागतो परंतु हे एन.डी.एस. चे लोक जे मिलीटरीमधून रिटायर्ड झालेले लोक आहेत त्यांचा आम्ही आदर करतो. जे जेष्ठ आहेत त्यांचा सुध्दा आम्ही आदर करतो परंतु ते नागरिकांशी वागतांना अत्यंत वाईट वागतात. माझ्या प्रभागामध्ये मासोळी विकणा-या लोकांना दंड करण्याचा काम, त्यांच्याकडून पैसे मागण्याचे काम, पैसे दिले नाही तर चालन करण्याचे काम हे मोठया पध्दतीने सुरु आहे. हे संपुर्ण शहरात सुरु आहे आणि लोक नगरसेवकांना सांगतात, नगरसेवकांनी त्यांना सांगितल्यावरही ते

ऐकत नाही. असे जे लोक असतील.

श्रीमती वंदना भुरे :- मा.महापौरजी, विरोधी पक्ष नेता ज्या जागेची गोष्ट करीत आहे तो माझ्या प्रभागातील जगनाडे चौक आहे. त्यांचे म्हणणे आहे ते फाईन ठोकतात. मला एक विचारावयाचे आहे की ज्यांची ३५ वर्षापासूनची दुकानदारी आहे, मटन मार्केट आहे त्यांना अतिक्रमण हटविण्यासाठी नोटीस दिली जाते किंवा नाही मला याची माहिती देण्यात यावी.

महापौर:- ज्यांचे भाषण सुरु आहे त्यांच्याच प्रश्नाचे उत्तर दिले जाईल. तुमचे उत्तर लेखी स्वरुपात दिले जाईल. प्रशासनाने याचे उत्तर ३ दिवसांत मला सुध्दा आणि त्यांना सुध्दा लेखी स्वरुपात दयावे.

श्री.तानाजी वनवे:- मा.महापौरजी, ज्या ज्या ठिकाणी असे छोटे चिल्लर धंदा करणारे नागरिक आहे. मासोळीवाला ४ वाजता येतो आणि ७ वाजता निघून जातो.आपला कचरा व्यवस्थित उचलून निघून जातो. चौकात बसु दिले नाही तर गल्लीत बसतो. अनेक ठिकाणी आपआपला रोजीरोटीचा धंदा करतात. एन.डी.एस. च्या लोकांना आणि संबंधित सहा.आयुक्तांना आपण आदेश दयावे या पध्दतीने गरीब मंडळीला त्रास देवू नका. कोव्हीडचा काळ सुरु आहे आणि लोकांवर आत्महत्या करण्याची वेळ आलेली आहे. एक मासोळी विकणार आहे त्याची आई पीडीत आहे. त्यांनी जर व्यवसाय केला नाही तर ती केव्हाही मरु शकते. आईसाठी त्याला रोजचे औषध लागते. माझ्याकडे येवून ते रडले. अशी आर्थिक स्थिती असणा-या लोकांचा सहानभुतिपूर्वक विचार करावा. तो जर रस्त्याच्या मध्ये, कुणाच्या घरासमोर लावत असेल तर तुम्ही चालान केले तर मला काही म्हणावयाचे नाही. परंतु नागपूर शहरामध्ये अनेक हजारो लोक मासोळी विकणारे आहेत. ते आपल्या वेगळया लाईन मध्ये बसुन व्यवसाय करतात. हटवायचे असेल तर मा.महापौरजी, या नागपूर शहरामध्ये एकही अतिक्रमण, एकही फेरीवाला उद्यापासून मला दिसता कामा नये. नाही तर मी संबंधित सहा.आयुक्तांवर गुन्हा दाखल करेल. पोलीस स्टेशनमध्ये त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करेल. हे अतिक्रमण मला दिसत असेल तर मी उद्यापासून शहरात कुठे कुठे अतिक्रमणआहे आणि किती ते ॲपवर टाकले जाते, ते मी लाखोने त्या ॲपवर तक्रार टाकणार आहे. आयुक्तांनी काढावे आणि उत्तर दयावे. या शहरातील जनता आधीच कोव्हीडने त्रस्त झालेली आहे. या त्रस्त असलेल्या या लोकांना विनाकारण आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करुन जर या ठिकाणी लोकांना त्रास दिला जाणार असेल तर निश्चित रुपाने या शहरातील महानगरपालिकेतील विरोधी नेता म्हणून आणि या शहराचा एक सामान्य नागरिक म्हणून मी आपल्या विरोधात एफआयआर दाखल करणार याची नोंद घ्यावी.. आपण गरीब लोकांना त्रास देण्याचा काम करु नये. मा.महापौरजी, कोव्हीड आहे आणि पावसाळयाला सुरुवात झालेली आहे. या शहरामध्ये अनेक पोल उभे झाले आहेत,अनेक लाईट बंद आहेत. जवळपास ७ हजार पोल उभे आहेत आणि त्यावर लाईट लागलेली नाही. यावर प्रशासन काय करणार आहे आणि किती दिवसात करणार आहे याचे उत्तर संबंधित विभागाने उत्तर दयावे.

श्री.मानकार,कार्यकारी अभियंता(विद्युत):-मा.महापौरजी, शहरात जवळपास ७ हजार पोल उभे आहेत. फिटींग चा प्रस्ताव स्थायी समितीकडे दिला आहे.तो प्रस्ताव इंम्प्लीमेंट झाल्यावर फिटींग करता येईल.

श्री.तानाजी वनवे:- मा.महापौरजी, फिटींग लावण्याचा अधिकार आहे काय?

श्री. प्रदीप पोहाणे:- पाईंट ऑफ इन्फोमेशन, संबंधित अधिकारी या सभागृहाला चुकीची माहिती देत आहे. फाईल ही ३ महिन्यापासून स्थायी समितीकडून गेली आहे यांनी स्पष्ट सांगावे. ही फाईल

इम्प्लीमेंट करण्याकरिता कुणाकडे थांबली आहे. या फाईलचे टेंडर झाले आणि सर्व प्रोसेस सुध्दा झालेली आहे. यांनी स्पष्ट सांगावे. चुकीची माहिती देवू नये.

श्री.विजय झलके:- मा.महापौरजी पाईंट ऑफ इनफोर्मेशन, स्थायी समितीमध्ये ज्या वेळी हा विषय चर्चेला गेला, गेल्या १३५ दिवसापासून ही नस्ती..

श्री.मानकार,कार्यकारी अभियंता(विद्युत):-मा.महापौरजी, स्थायी समितीने हा प्रस्ताव मंजूर केलेला आहे. प्रशासनाकडे ती फाईल इम्प्लीमेंट करिता अकाऊंट विभागाकडे ५ मार्चपासून प्रलंबित आहे.

श्री. प्रदीप पोहाणे:- मा.महापौरजी, प्रशासन म्हणजे कोण ते सांगावे.

श्री.मानकार,कार्यकारी अभियंता(विद्युत):-मा.महापौरजी, कॅफोकडे प्रलंबित आहे.

श्री.तानाजी वनवे:- मा.महापौरजी, कॅफोला उत्तर मागावे.

महापौर:- कॅफोने उत्तर दयावे.

श्री.हेमंत ठाकरे (प्रमुख लेखा व वित्त अधिकारी):-सन्माननीय महापौरजी, सन्माननीय सदन. ही फाईल माझ्याकडे आता आली आहे. मी ३ जून ला आल्या नंतर दोन-तीन दिवसाने आली आहे. सध्या ती फाईल विचाराधीन आहे ॲडीशनल कमिश्नर सोबत चर्चा करावयाची आहे.

श्री.तानाजी वनवे:- मा.महापौरजी, किती दिवसात मंजूर होईल. शहरातील ७ हजार पोल लागलेले आहे आणि दिवे लागलेले नाही. बंद दिवे दुरुस्तीकरिता यांच्याकडे सामान नाही.

श्री.मानकार,कार्यकारी अभियंता(विद्युत):-मा.महापौरजी, आपण ज्या काही फिटींग लावलेल्या आहेत त्या ७ वर्षाच्या कॉन्ट्रकमध्ये आहेत. जसजसे दिवे बंद होतात आपण ते रिपेअर करतो.

श्री.तानाजी वनवे:- मा.महापौरजी, यांनी सांगितले की जे ७ हजार पोलवर बंद दिवे आहेत ती फाईल कॅफोकडे प्रलंबित आहे परंतु जे दिवे बंद आहे आणि नगरसेवकांच्या प्रभागातील बंद दिवे आहेत त्यांना विचारले असता आपल्या तर्फे सांगितल्या जाते की सामान नाही तर मग हे बंद दिवे कधी दुरुस्त करणार आहे.

श्री.मानकार,कार्यकारी अभियंता(विद्युत):-मा.महापौरजी, जशाही फिटींग चा रिपोर्ट येतो त्यांना मेंटेंन्स करुन रिपेअर करतो त्याच सामानाचा प्रश्न येत नाही.

श्री.तानाजी वनवे:- मा.महापौरजी, आपल्या कार्यालयाकडून आणि झोन कार्यालयाकडून जेव्हाही विचारले तर सांगितले जाते की आमच्याकडे सामान नाही.

श्री.मानकार,कार्यकारी अभियंता(विद्युत):-मा.महापौरजी, ज्या गृहस्थाने सांगितले त्याचे नाव सांगावे.

श्री.तानाजी वनवे:- मा.महापौरजी, अनेक प्रभागात लाईट बंद आहेत. झोनचे जे इंजिनिअर आहेत त्यांच्याकडून मी माहिती घेतली. अनेक झोनमधून मला फोन येतात. आमच्या प्रभागात हा लाईट बंद आहे, तो लाईट बंद आहे, यासाठी शिष्टमंडळे करतात. नारा नारी उत्तर नागपूरमध्ये हाच प्रकार आहे.

श्री.मानकार,कार्यकारी अभियंता(विद्युत):-मा.महापौरजी, आम्ही डायरेक्ट फिटींग करतो, रिपेअर करीत नाही.

श्री.तानाजी वनवे:- मा.महापौरजी, आता पावसाळा सुरु झाला आहे. या पिरेडमध्ये अनेक साथीचे रोग सुरु होत आहेत. कोव्हीड-१९ सुरु आहे. या संबंधित डॉक्टर, नर्सेस आणि संबंधित कर्मचारी यांची आवश्यकता आहे त्यांची भरती आपण करणार आहे काय? आपण कोव्हीड-१९ च्या संदर्भात आणि आरोग्य विभागाशी संदर्भात आवश्यक काही भरत्या करणार आहे काय? मला या संदर्भात

माहिती दयावी.

डॉ.सवाई(आरोग्य अधिकारी):-मा.महापोरजी, मा.सदन, कोव्हीड-१९ च्या अंतर्गत आपण मागणी केलेली आहे. एक शासनाचे जे पत्र आहे त्यात असे म्हटले आहे की कोव्हीड अंतर्गत जर तुमच्या कडे पाझीटीव्ह रुग्ण हॉस्पीटलला दाखल झाला तर आपण मनुष्यबळाची व्यवस्था करावी. मनुष्यबळासाठी सन्माननीय जिल्हा शल्य चिकित्सक यांच्याकडे मागणी केलेली आहे. त्यात कोव्हीड केअर सेंटरकरिता एक हॉस्पीटल इन्चार्ज, ४ मेडीकल ऑफीसर, १८ आयुष्यक, १ हॉस्पीटल मॅनेजर ,५८ स्टॉफ नर्स आणि ४ लॅब टेक्निशियन आणि ४ फार्मसिस्ट, ४ स्टोअर इन्चार्ज, ४ डाटा ऑपरेटर, वार्ड बॉय १८ अशी ११६ ची मागणी केलेली आहे. तसेच कोव्हीड च्या अंतर्गत जी डेडीकेटेड कोव्हीडमध्ये सेंटरची सुरवात केली आहे त्यात ३ रेग्युलर दवाखाने आहेत त्या रेग्युलर दवाखान्यासाठी १५० च्या जवळपासचा स्टॉफ करिता डेप्युटी डायरेक्टरकडे याची मागणी केलेली आहे. तिसरा प्रश्न आहे, साथ रोग अंतर्गत वैद्यकीय अधिकारी आणि इतरांची भरती प्रक्रिया, स्पेसिफिक आपण साथ रोग अंतर्गत करीत नाही. एनयुएचएम अंतर्गत आपल्या भरती प्रक्रिया सुरु राहतात. प्रथमत: ती होत होती १५ दिवसात महिन्याच्या दुस-या आणि चौथ्या मंगळवारी , सन्माननीयअति. आयुक्त आणि मी अशी आमची दोन-तीन जणांची कमेटी आहे. जसजसे डॉक्टरांचे अर्ज येतील त्याच दिवशी त्यांना अपाईंटमेंट दयावी. जवळपास ११ डॉक्टर आले, जसे डॉक्टर आले तसे आम्ही अपाईंटमेंट देतो तेव्हा समितीची बैठक घेत नाही.

श्री.तानाजी वनवे:- मा.महापौरजी, एनयुएचएमच्या हॉस्पीटलमध्ये लोकांची प्रमाणपत्र घेण्याकरिता गर्दी होत आहे. त्या ठिकाणी स्टॉफ नाही. त्या ठिकाणी जे कर्मचारी होते ते आपण कोव्हीडचा सर्वे करण्यासाठी बाहेर काढले आहे. आता त्या ठिकाणी कर्मचारी नाहीत तर अशा वेळेस त्या ठिकाणी दवाखान्यामध्ये भरतीच्या संदर्भात आपण ताबडतोब् आदेश दिले पाहिजे.

डॉ.सवाई (आरोग्य अधिकारी):-मा.महापौरजी, नम्रपणे निवेदन करु इच्छितो, आपले कडे जेवढे फिवर क्लिनिक आहेत त्या ठिकाणी आपण एक-एक अॅक्स्ट्रा दिला आहे. बाजुचा काढून रजिस्ट्रर मेडीकल प्रॅक्टीसनर नागपूर शहरातील हे कुणीही सर्टीफिकेट देवू शकतो. त्याच्यात काही अडचण नाही फक्त एकच आमची अट आहे त्यांनी ती मोफत दयावी.

श्री.तानाजी वनवे:- मा.महापौरजी, बाहेरचे जे हॉस्पीटलवाले आहेत ते जास्त पैसे घेवून या संधीचा दुरुपयोग करीत आहेत.

श्री.विजय झलके:- पाईंट ऑफ इन्फोमेशन, डॉ.सवाई यांनी सांगितल्याप्रमाणे प्रायव्हेट प्रॅक्टिशनर यांनी हे सर्टीफिकेट निशुल्क दयावे असा त्यांनी उल्लेख केला. मात्र नेहरुनगर झोनने वॉटस् अप वरती आम्हांला मॅसेज पाठविला होता त्यात ३ दवाखाने यांचे नामनिर्देशित केले होते त्या दवाखान्यातून प्रमाणपत्र प्राप्त करुन घेता येईल. परंतु जाफरी हॉस्पीटल उमरेड रोड वरील या हॉस्पीटलचे डॉ. जाफरी हे प्रत्येक व्यक्तिकडून प्रत्येकी २०० रुपये घेत आहेत. यांचे प्रमाण मी माझ्याकडे आहे ते मी देवू शकतो. याच्या मी नंबर ऑफ केसेस देवू शकतो, या डॉक्टरांनी प्रत्येक व्यक्ति, प्रत्येक प्रमाणपत्रानुसार २०० रुपये घेतलेले आहे. याबाबत आपण सरसकट सर्व लोकांकरिता हा नियम केला होता की स्पेसिफिक काही दोन-तीन हॉस्पीटलकरिता हा नियम केला होता याची सुध्दा माहिती देण्यात यावी.

डॉ.सवाई(आरोग्य अधिकारी):-मा.महापौरजी, ज्या ज्या वेळी खाजगी दवाखान्याची मागणी आमच्याकडे आली. त्या त्या वेळेस झोनल मेडीकल ऑफीसरला सांगितले की तुमच्या स्तरावर

क्लिअर इन्स्ट्रक्शन तुम्हांला द्यायचे आहे. हे सर्टीफिकेट मोफत दयायचे आहे लोकांची लुबाडणी करण्यात येवू नये. जाफरी हॉस्पीटलच्या बाबतीत असे झाले असेल तर आपण निश्चितच आपण दया त्याबाबत निश्चितच कार्यवाही करु.

श्री.तानाजी वनवे:- मा.महापौरजी, पावसाळयाला सुरुवात झाली असून आता अनेक ठिकाणी पाणी साचण्याचे काम सुरु आहे आणि फायर ब्रिगेडचे कर्मचारी आपल्याला कमी पडत आहे. त्यांची कधी भरती करणार आहे. पावसाळा गेल्यावर भरती करणार आहे काय? या ठिकाणी नागपूर शहरामध्ये जी भयावह कोव्हीड -१९ ही महामारी आली. त्या संदर्भात जी काही सतरंजीपुरा झोनमध्ये घटना घडली. हा प्रकार भविष्यात कुठेही घडू नये. आमचे सहकारी मित्र नितीन साठवणे यांना त्या परिस्थितीतून जावे लागले. कोव्हीड-१९ च्या अंतर्गत कोंरटाईन मुळे लॉकडाऊन केलेल्या भागामध्ये त्या ठिकाणी मुलभूत सेवा व सुविधा तत्परतेने पुरविण्यात याव्यात अशी मी आपल्याला विनंती करतो. आपण आयुक्त साहेबांना संपुर्ण कोव्हीड सेंटरला आम्ही आपल्या सोबत यायला तयार आहोत. आपणा त्या सगळया सेंटरचा दौरा घेवू. कारण नागपूर शहरामध्ये सुरुवातीला ज्यावेळेस कोव्हीड-१९ ची सुरुवात झाली. मा.पालकमंत्री नितीनजी राऊत, मेडीकलचे डॉक्टर, मेयोचे डॉक्टर यांच्या सोबत मेयो, मेडीकलचा आणि अनेक सेंटरचा दौरा केला त्या ठिकाणची परिस्थिती बघितली. कारण शेवटी या नागपूर शहराचा प्रश्न आहे. नागपूर शहरातील लोक अडचणीत असतील आणि त्या अडचणीच्या काळामध्ये आपल्या सर्व नगरसेवकांनी आपआपल्या परिने आपल्या प्रभागामध्ये मदत केली. कोव्हीड-१९ चे काम नागपूर महानगरपालिकेच्या आयुक्तांच्या नेतृत्वामध्ये चांगल्या पध्दतीने होत आहे. या सगळया कामाचा आढावा आपण घ्यावा. आपण याठिकाणी स्थगण प्रस्तावाच्या निमित्ताने या ठिकाणी चर्चेसाठी सर्वांना बोलण्याची संधी उपलब्ध करुन दिली. या शहरामध्ये अनेक लोक जेथे जेथे लोकांचे प्रश्न होते त्या त्या लोकांनी उजागर करण्याचे काम केले . मी या ठिकाणी अधिक न बोलता या ठिकाणी थांबतो. जयहिंद

श्री.संदीप जाधव(सत्तापक्ष नेता):-मा.महापौरजी, जवळपास ५ दिवसापासून मा.सदस्य श्री. नितीन साठवणे आणि श्रीमती मंगला गवरे यांच्या मांडलेल्या स्थगण प्रस्तावाच्या निमित्ताने चार दिवसापासून याठिकाणी चर्चा सुरु आहे. जवळपास ५८ मा.सदस्यांनी चर्चेमध्ये सहभाग घेतला. २८-२९ तासापासून ही चर्चा सुरु आहे. आणि चर्चेचा जो कल होता तो फोकस होता. मा.आयुक्तांच्या कार्यप्रणालीवर होता आणि म्हणून मा. महापौरजी या संपुर्ण चर्चेत मा.नगरसेवकांनी प्रश्न उपस्थित केले आणि चर्चा केली. एक-दोन नगरसेवक सोडले तर सगळया नगरसेवकांचा आक्षेप मा. आयुक्त यांच्या कार्यप्रणाली वर आणि त्यांच्या वागणुकीमुळे सगळया नगरसेवकांनी प्रतिबंधित केले. ज्या विषयाला धरुन हा स्थगण प्रस्ताव आला आणि मा. नितीन साठवणे यांना त्रास झाला आणि त्यांनी या ठिकाणी आपली आपबिती सांगितली आहे. या नागपूर शहरात ७ ते ८ कोरंटाईन सेंटर उघडण्यात आले आहेत. त्याची कुणालाही, कोणत्याही प्रकारची माहिती न देता त्या ठिकाणी लोकांचा प्रचंड विरोध असतांना सुध्दा त्या ठिकाणी कोव्हीड सेंटर उभारले गेले आहे. हे करीत असतांना ज्या लोकांना कोरंटाईन सेंटरवर घेवून गेले त्या ठिकाणची व्यवस्था जी होती त्या व्यवस्थेबद्दल आपल्या वर्तमानपत्रामध्ये, नगरसेवकांनी सुध्दा या ठिकाणी निदर्शनास आणून दिले होते. ज्या ठिकाणी व्यवस्थाच नाही. एक उदाहरण मी सांगतो, व्हीएनआयटीचे ज्या वेळेस हया ठिकाणी त्या एरियाचे लोक कोरंटाईन करण्यासाठी घेवून गेले त्या ठिकाणी दोन तास लोक फुटपाथवर बसले होते. त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारची व्यवस्था नव्हती, पाण्याची व्यवस्था

नव्हती, बेडची व्यवस्था नव्हती, बाथरुमची व्यवस्था नव्हती. चादरीची व्यवस्था नव्हती, दोन-तीन बाथरुम असलेल्या ठिकाणी २०० ते ३०० लोक घेवून गेले होते. या लोकांना कोरंटाईन करण्यासाठी घेवून जाण्याच्या आधी त्या ठिकाणची स्थिती जाणून घ्यावयाची होती. तेव्हाच त्या लोकांना शिफट करावयाचे असते. अशा वेळेस त्या लोकांना मानसिक त्रास झाला याला जबाबदार कोण ? आमदार निवासात कोरंटाईन सेंटर केले त्या ठिकाणच्या आजूबाजूच्या लोकांचा विरोध होता. कोणत्याही जनप्रतिनिधींना विश्वासात न घेता त्या ठिकाणी कोरंटाईन सेंटर केले. मला वॉटस् अपवरती आलेले रिकार्डीग आहे. त्या ठिकाणी जे जेवण होते त्या जेवनामध्ये अळया निघाल्या. त्या लोकांना विचारुन सांगता येईल. त्या ठिकाणी कोरंटाईन सेंटरची स्थापना केली त्या ठिकाणी सेंटर चाललेले आहे त्या ठिकाणी स्थिती बघा. वेळेवर जेवन नाही, वेळेवर नाश्ता नाही. तेथे टायलेट, बाथरुमची पुरेशी व्यवस्था नाही. अशा परिस्थितीमध्ये ते लोक मानसिक दबावामध्ये राहतात ही गोष्ट समजून घेण्याची गरज आहे. मा.महापौरजी. जेथे जेथे हे सेंटर उभे केले मला असे वाटते ते सरकारी इमारतीमध्ये आहेत. सरकारी इमारतीमध्ये असतांना सुध्दा त्या वस्तीमध्ये त्या ठिकाणी मोठया प्रमाणात लोकांची वस्ती आहे त्या ठिकाणी सुध्दा उभारले गेले आहे. यामुळे लोकांची प्रचंड नाराजी त्या ठिकाणी आहे. त्या ठिकाणची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न प्रशासनातर्फे झालेला नाही. मा.महापौरजी, दुसरा विषय होता, विकासाची कामे, आताच एस.ई. साहेबांनी माहिती देतांना सांगितले इतकी कामे थांबलेली आहेत,किती कामाचे वर्कआर्डर झाले, हे करीत असतांना डी.पी.डी.सी. ची सुध्दा कामे थांबविण्यात आली आहे. मा.महापौरजी, अनेक नगरसेवक मला भेटतात आणि त्यांनी मला सांगितले की माझ्या प्रभागातील, माझ्या वार्डातील एवढया फाईल थांबलेल्या आहेत. टेंडर झालेले आहे, परंतु वर्कआर्डर झालेले नाही आणि वर्कआर्डर झालेले आहे तर वर्कआर्डर झालेल्या कामाची सुरुवात झालेली नाही. अशा अनेक महत्वाच्या फाईल मा.नगरसेवकांच्या थांबलेल्या आहेत. मी आपल्या माध्यमातून आयुक्तांना विचारु इच्छितो, त्या फाईली कोणत्या कारणामुळे थांबलेल्या आहेत. या ठिकाणी नियम सांगितले आहेत. जे वर्कआर्डर झालेले आहे त्या वर्कआर्डर झालेल्या फाईली कुणाच्या आदेशामुळे थांबलेल्या आहेत. कशामुळे थांबलेल्या आहेत. पावसाळा सुरु झाला आहे. नाल्याच्या भिंती पडलेल्या आहेत, गडरलाईन खराब झालेल्या आहेत, चोकेजची व्यवस्था नाही. गडरवरती झाकणे नाहीत. अशा वेळेस मा. नगरसेवक काय करतील. नागरिकांचा रोष हा नगरसेवकांवर असतो, नगरसेवकांच्या घरी लोक येतात आणि विचारतात आपण भुमीपुजन केले हाते ते काम कुठे गेले. मा. महापौरजी, ही संपुर्ण विकासाच्या कामाच्या बाबतीमध्ये कामे कां थांबलेली आहेत, कशामुळे थांबलेली आहेत याचे उत्तर मा. महापौरजी आयुक्तांनी या ठिकाणी आपल्या भाषणामध्ये दयावे. मा.महापौरजी, ॲपच्या माध्यमातून काय होते हे सर्व नगरसेवकांनी याठिकाणी सांगितलेले आहे. ॲपवर तक्रार केली तर कामे होतात मात्र नगरसेवकांनी सांगितलेले कामे वार्ड अधिकारी असो, हेल्थचा इन्स्पेक्टर असो यांना सांगितल्यावरही चार- चार दिवस कामे होत नाही. बरेच नगरसेवकांच्या या ठिकाणी कम्प्लेंट आहेत. नदी-नाल्याचा विषय याठिकाणी झाला, मागच्या वर्षी १ कोटी ०२ लक्ष रुपये खर्च आला आणि या वर्षी ४६ कोटी खर्च झाला. यात दोषी कोण आहे. त्यावेळेस १ कोटीचे टेंडर काढले होते. मा.महापौरजी, हे सगळया वर्तमानपत्रामध्ये, वॉटस् अप आणि फेसबुकमध्ये टाकण्याचे कृत केले आहे. मी महानगरपालिकेचे किती पैसे वाचविले आहे. सच्चाई याच ठिकाणी आहे. मा.आरोग्य सभापती विरेंद्रजी कुकरेजा यांनी माहिती घेवून सांगितली. एन.एच.आय., एनआयटी, मेट्रो, पी.डब्लू.डी. या सगळयांनी या ठिकाणी मशीनरी उपलब्ध करुन

दिली आहे. हे सगळे करीत असतांना केवळ आपली प्रसिध्दी नगरसेवकांना चोर ठरविणे. मागच्या वर्षी १ कोटी ०२ लक्षाचे काम झाले आणि या वर्षी ४६ कोटीचे काम झाले याचे डिटेल्स मा.महापौरजी आपल्या माध्यमातून आपण घ्यावे. मा.महापौरजी, नागपूर शहरात ७ हजार इलेक्ट्रिक पोल उभे आहेत. नगरसेवकांनी मागच्या वर्षी उभे केले आहेत. महानगरपालिकेच्या माध्यमातून असो, एमईसीबीच्या माध्यमातून असो. आज एक वर्ष झाले मा.महापौरजी माझ्या प्रभागात जवळपास पावने दोनसे पोल उभे आहेत. मा.सदस्या श्रीमती संगीता गि-हे ताई आहेत. माझ्या प्रभागात १७५ पोल लागलेले आहेत परंतु त्यावर फिटींग लागली नाही. लोक आम्हांला विचारतात पोल उभे केले, लाईट कधी लागणार आहे. आताच अधिका-यांनी सांगितले, मार्च महिन्यापासून ही फाईल मा.कॅफोकडे प्रलंबित आहे. ही जबाबदारी कुणाची आहे. हे केव्हा होणार आहे. त्याचे टेंडर निघाले आहे, परंतु पैसे नसल्यामुळे ते काम थांबलेले आहे. हे महत्वाचे काम नाही आहे काय? आऊटर प्रभाग आहे त्या ठिकाणी लोकांची मागणी आहे ते सुध्दा काम मार्च महिन्यापासून मागच्या चार-सहा महिन्यापासून थांबलेले आहे. याचेही उत्तर आयुक्तांनी या ठिकाणी दयावे. दवाखान्याच्या विषयाबद्दल, खुप गाजावाजा झाला. मी सहा दवाखाने केले, ते दवाखाने कोणते आहेत. ते नवीन दवाखाने नव्हते. आताच मा.दया भैय्या यांनी सांगितले, एक बिल्डींग ५० वर्ष आधीची आहे. एक बिल्डींग ६० वर्ष आधी आहे तर एक बिल्डींग १०० वर्ष आधी ची आहे. अशा बिल्डींगमध्ये ते काम करण्यात आले. आमचे बंटी शेळके यांनी सांगितले नागपूर शहरामध्ये १५० बेडची व्यवस्था नव्हती. परंतु अवघ्या ४५ दिवसामध्ये मा.आयुक्तांनी ४५० खाटांची व्यवस्था केली. हे करीत असतांना मागे त्या ठिकाणी किती डॉक्टरची अपाईंट केली, किती नर्सेसची अपाईमेंट केली, औषधासाठी किती पैसे ठेवले. मा.महापौरजी, मी एक आकडा सांगतो, केवळ ५० लक्ष रुपये औषधासाठी ठेवले, ६० पीएचसी सेंटर आहेत. वर्षाचे ८५ हजार रुपये होतात, महिन्याचे किती होतील तर केवळ ७ हजार रुपये एका महिन्याची औषध होते. माझ्या प्रभागामध्ये एक पीएचसी सेंटर आहे तेथे रोज २०० ते ३०० लोक येतात त्या ठिकाणी केवळ ६ हजार रुपये एका हॉस्पीटलसाठी, आणि ६ हॉस्पीटल ४५० बेडचे तयार करीत आहेत आपण, काय व्यवस्था तेथे असेल. केवळ सोशल मिडीयावर ४५ दिवसात ४५० बेडचे हॉस्पीटल तयार केले असे सांगायचे, केवळ प्रसिध्दी घेण्यासाठी हे करीत असतांना यासाठी ज्या ज्या व्यवस्था त्या ठिकाणी लागतात ते सुध्दा करण्याची आवश्यकता आहे. केवळ पलंग ठेवल्याने हॉस्पीटल होत नाही. सर्व सोयी सुविधायुक्त ज्या ठिकाणी असते त्यालाच दवाखाना म्हणू शकतो. आपले दिलीपजी दिवे, या सभागृहामध्ये ठराव झाला होता आपल्या गोरगरीब विद्यार्थ्यांकरिता इंग्रजी माध्यमाची शाळा असल्या पाहिजे. त्याकरिता त्यांनी इंग्रजी माध्यमाच्या शाळा जशा मुंबई, पुणे महानगरपालिकेची एक संस्था ती चालविते त्या शाळेला त्यांनी भेट दिली आणि एक चांगला प्रयोग नागपूर महानगरपालिकेने सुरु करावा. नागपूर शहरातील गोरगरीब विद्यार्थ्यांकरिता इंग्रजी माध्यमाच्या शाळा असल्या पाहिजे या हेतूने महानगरपालिकेने ६ इंग्रजी शाळेचा ठराव मंजूर केला. त्याला मा.महापौरजी आयुक्त महोदयांनी केराच्या टोपलीत टाकला तो रदद केला. याचे उत्तर मा. महापौरजी आयुक्त महोदयांनी याठिकाणी दयावे. मा.महापौरजी, कोव्हीडच्या काळामध्ये आपल्या देशाचे पंतप्रधान मा.नरेंद्रजी मोदी, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. उध्दवजी ठाकरे यांनी आव्हाहन केले होती की कोव्हीडच्या काळामध्ये कोणत्याही कर्मचा-याला कामावरुन कमी करता कामा नये. त्यांना कामावर बोलविता येत नसेल तर त्यांचा पगार सुध्दा दयावा असे आव्हाहन केले होते. मा. महापौरजी, मागच्या दोन महिन्यापासून नागपूर महानगरपालिकेत कंत्राट बेसिकवर

असतील, कुठे परमानंट बेसिसवर असतील अशा किती लोकांना आयुक्त महोदयांनी काढले. ही मानवता आहे काय? देशाचे पंतप्रधान असतील किंवा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असतील यांनी आव्हाहन केले तरीही मा.आयुक्त महोदयांनी ही गोष्ट केली हे काही बरोबर नाही. हे शोभत नाही. त्याचप्रमाणे जेष्ठ नगरसेवक प्रफुल्ल गुडधे यांनी काल प्रश्न उपस्थित केला होता. दीड महिन्यात आयुक्त महोदय काम करीत होते आपण कुठे होते. केंद्र सरकारच्या आणि राज्य सरकारच्या गाईडलाईनप्रमाणे ऑफीसमध्ये १०टक्के, ५ टक्के कर्मचा-यांची उपस्थिती असली पाहिजे असे आदेश काढले होते. प्रफुल्ल गुडधे साहेब नागपूर शहराचे महापौर घरी बसले नव्हते. नागपूर शहराचा महापौर म्हणून ते अनेक प्रभागामध्ये त्यांनी दौरा केला. दिनदयाळ थाळीच्या माध्यमातून नागपूर शहरातील झोपडपट्टयामध्ये गोरगरीब जनतेला भोजन वितरीत करण्याचे काम जवळपास ४६ दिवस ११ हजार ५०० लोकांना निरंतर सेवा, पुर्ण जेवन पर डे ११ हजार ५०० लोकांची जेवणाची व्यवस्था मा.महापौरजी यांच्या माध्यमातून झाली आहे. राशन किटचे वितरण, गोरगरीब लोकांना २५ ते ३०दिवस राहतील अशी किट ज्यात तेल असेल, डाळ असेल, साखर असेल, पत्ती असेल,साबण असेल अशा आवश्यक वस्तुची एक किट मा. महापौरजी यांनी ८ हजार ९०० लोकांना या किटचे वाटप केलेले आहे. मग ते दंतेश्वर झोपडपट्टी असेल, धनगरपुरा मोहल्ला असेल या लोकांना त्याही ठिकाणी दररोज भोजनाची व्यवस्था केलेली आहे.ऑटो चालविणारे असतील, रिक्षा चालविणारे असतील, चहाचे टपलीवाले असतील,चर्मकार बंधू असतील त्यांचे या काळात या लोकांचे कामधंदे बंद झालेत. अशाही लोकांना मा.महापौर महोदयांनी या किटचे वाटप केले. पार्वती नगर कंटोनमेंट झोनमध्ये सुध्दा मा.महापौरजी जावून आले आहे. त्या ठिकाणी सुध्दा २५० किटचे वाटप केले आहे. आयजीएम, आयजीएमआर, त्या ठिकाणी सुध्दा आपण मार्च महिन्यात गेले आहे. त्याठिकाणी जोधपुरकर यांच्या घरी जावून त्यांच्या परिवाराचे सुध्दा भेट घेतली आहे. आपण बाहेरुन येणारा लेबर क्लॉसचा व्यक्तीची त्यांच्या त्यांच्या राज्यात परत जाण्यासाठी व्हेओीकलची व्यवस्था, बसची व्यवस्था मा.महापौरजी यांनी केली आहे. मा.महापौरजी यांच्या हातातून या काळात रचनात्मक काम झालेले आहे. ७ मे या दिवशी मा.जिल्हा कार्यालय यांच्या सोबत मा.महापौरजी आपण दौरा केला आहे. शहरातील विविध कम्युनिटी किचनला आपण भेट दिलेली आहे. स्वामी नारायण मंदीर या ठिकाणी सुध्दा आपण भेट दिलेली आहे. मा. प्रफुल्ल गुडधे यांच्या घराच्या पाठीमागे एकात्मता नगर येथे गरीब लोकांची वस्ती आहे त्या ठिकाणी १२०० लोकांच्या जेवणाची व्यवस्था आपल्या माध्यमातून केली आहे. आमचे सर्व नगरसेववक मा. दया भैय्या असतील, संजय बंगारे असतील, सुनिल अग्रवाल असतील, नागपूर शहरातील सहाही मतदार संघात भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून हजारो पॅकेटच्या माध्यमातून लोकांच्या जेवनाची व्यवस्था या ठिकाणी केलेली आहे. मा. महापौरजी, आम्ही जनतेमध्ये होतो घरी बसलेलो नव्हतो. आमचा एक एक कार्यकर्ता शहरात कम्युनिटी किचन चालवित होता.या ठिकाणी मला दोन महामहीम लोकांच्या प्रत्येक भाषणातून त्यांचे नाव निघाले आहे डॉ.गंटावारजी. महानगरपालिकेच्या सेवेत असतांना सुध्दा प्रायव्हेट हॉस्पीटल चालविणे हे कायदयाने गुन्हा आहे. त्यांच्या पत्नी सुध्दा डॉक्टर आहेत. आमचे जेष्ठ नगरसेवक दयाशंकर तिवारी यांची आज या संपुर्ण बाबींचा या ठिकाणी उल्लेख केला. त्यांच्या कारनाम्याचा उल्लेख केला आहे. मग त्यामध्ये संदीप सहारे असतील, प्रवीण दटके असतील, आमच्या ताई परिणिता ताई असतील या सगळया लोकांनी या डॉक्टरवर अत्यंत गंभीर अशा स्वरुपाचे आरोप लावलेले आहेत.मा.महापौरजी, या सगळया चौकशी तुम्ही तर कराल, चौकशी करण्याच्या आधी

तत्काळ या दोघा पती पत्नींवर तात्काळ निलंबनाची कार्यवाही करावी असा आदेश मा.महापौरजी प्रशासनाला दयावा. याच्या नंतर त्याच्यावर कार्यवाही करुन याचा जो अहवाल आहे. हा अहवाल पुढच्या सभागृहात ठेवण्याचा आदेश आपण या ठिकाणी दयावे. याठिकाणी बरेच लोकांच्या भाषणातून एक गोष्ट समोर आली. मा.आयुक्त महोदय आम्हाला वेळ देत नाही. ही गोष्ट देखील तेवढीच खरी आहे. एक गोष्ट सांगतो, मा. महापौरजी, आपल्या जेष्ठ नेत्या हया सभागृहाच्या माजी महापौर होत्या. त्या प्रभाग १२ च्या नगसेविका आहेत. अनुसुचित जमाती आयोगाच्या त्या राष्ट्रीय सदस्या आहेत. त्यांना संवैज्ञानिक दर्जा आहे. केंद्रीय राज्य मंत्र्यांचा दर्जा आहे. त्यांचा एक प्रोटोकाल आहे. अशा आमच्या मायाताई इवनाते आणि प्रगतीताई पाटील हया मा. आयुक्त साहेबांना भेटायला गेल्या होत्या. मायाताई तुम्हाला सांगतो त्यांना घरी पाठविण्याचा आपला अधिकार आहे. तुम्ही त्यांच्या भेटीसाठी गेल्यात. दोन तासानंतर तुम्ही मला भेटायला या अशा शब्द मा.आयुक्तांनी वापरलेला आहे. एक प्रोटोकाल आहे, मा.महापौरजी, कलेक्टर, कमिश्नर त्यांच्या पाठीमागे जातात. ते कुठेही बोलाविले त्यांच्या बैठकीत हजर राहावे असा प्रोटोकॉल आहे. ही गोष्ट त्या दिवशी त्यांना कळली असती तर देशाचे महामहीम राष्ट्रपती महोदय त्यांना ते तक्रार करु शकत होत्या एवढा पावर त्यांच्यामध्ये होता. मा. आयुक्त महोदयांनी ते सिरयसली घेतले नाही, वा-यावर सोडून दिले. एक अनुसुचित जमाती आयोगाच्या राष्ट्रीय सदस्या भेट देत असतील तर त्यांना दोन तास बाहेर बसवुन ठेवले हा त्यांचा पदाचा अपमान आहे मा. महापौरजी, याची देखील चर्चा आयुक्त महोदयांनी आपल्या निवेदनात करावी. मा.महापौरजी, मी १५ तारखेला भेटण्यासाठी वेळ मागितली, मी एक पत्र दिले अनेक नगरसेवकांच्या माध्यमातून, प्रभागात काम होत नाही, अनेक अडीअडचणी आहेत. मी मा.आयुक्त महोदयांना १६-१७ तारखेला भेटण्याची वेळ दयावी म्हणून पत्र दिले. आज २६ तारीख झाली आहे. अजूनपर्यंत त्यांनी पत्राचे उत्तर दिले नाही. ही गोष्ट बरोबर नाही. समन्वय कुणी करायला पाहिजे. ज्या सत्तापक्ष नेत्यांना पत्रावर आयुक्त महोदय वेळ देत नसतील तर सर्वसाधारण नगरसेवकांच्या पत्रावर काय कार्यवाही होत असेल, आम्हांला सांगतात समन्वय ठेवा, आम्ही समन्वय करायला तयार आहोत परंतु ते एकतर्फी झाले नाही पाहिजे. कुठे तरी महानगरपालिका चालवायची असेल मा.महापौरजी, आज पुर्ण महाराष्ट्रात नागपूर महानगरपालिकेची बदनामी झाली आहे ही कशामुळे झाली आहे. जर हे २० मार्चला सभागृह चालविण्याची परवानगी दिली असती तर आज जो भपका उडाला आहे. ज्या नगरसेवकांच्या मनात चीड आलेली आहे, आयुक्तांच्या कारभाराबाबत, ती त्याच दिवशी शांत झाली असती. कोणते नी कोणते कारण सांगून, धमकी देवून , नियमाला बोट दाखवून सभा स्थगित करण्याचा त्यांचा मानस होता. परंतु महाराष्ट्र राज्याचे मी अभिनंदन करतो त्यांनी सभेला परवानगी दिली आणि मागच्या ५ दिवसापासून हे सभागृह सुरु आहे. आणि नागपूर महानगरपालिकेच्या इतिहासात याची नोंद राहील. मा.महापौरजी, स्मार्ट सिटी च्या बद्दल मला बोलावयाचे आहे. आपण महापौरजी त्या ठिकाणी डायरेक्टर आहात. मी सुध्दा डायरेक्टर आहे, स्थायी समिती अध्यक्ष सुध्दा डायरेक्टर आहेत. परंतु बीओटी झालीच नाही. बीओटी झालीच नाही तर आयुक्त डायरेक्टर कसे झालेत आणि डायरेक्टर झाले नाही तर सी.ओ. कसे झाले. यांना अधिकार कुणी दिले याची सुध्दा चौकशी झाली पाहिजे. हा एक माझा मुद्दा आहे. त्याचप्रमाणे एडीटीपी विभाग एक पत्र दिले होते तुमच्या विभागाचा कारभार जो सुरु आहे. त्याबद्‌ल मला अनेक तक्रारी आल्या आहेत. मी त्यांना सांगितले की मला याबद्दल माहिती दयावी. परंतु महिनाभर झाला याचे उत्तर मिळाले नाही.या ठिकाणी पुन्हा मी सगळयांचे अभिनंदन करतो, कोव्हीडच्या काळात ज्या

ज्या अधिका-यांनी काम केले. ते मग डिव्हीजनल कमिश्नर असोत, जिल्हाधिकारी साहेब असोत, मा.पोलीस कमिश्नर असतील, मेयो, मेडिकलचे, एम्सचे डॉक्टर असतील, आमचे सफाई कर्मचारी असतील, आशा वर्क्सर असतील, पोलीस कर्मचारी असतील, मा. आयुक्तांचे सुध्दा याठिकाणी मी अभिनंदन करेल, आपल्या एलबीटीचे कर्मचारी असतील त्यांनी ५० लक्ष लोकांना जेवणाचे वाटप केले. या कोव्हीडच्या काळामध्ये ज्यांनी ज्यांनी सहकार्य केले त्यांचे मी मनापासून अभिनंदन करतो. मा.महापौरजी, आपल्या कडून मी हा विश्वास व्यक्त करतो की तुम्ही मायाताई इवनाते बद्दल काय कार्यवाही होईल. मी दिलेल्या पत्रावर देखील याचे सुध्दा स्पष्टीकरण दयावे. डॉ. गंटावार यांच्या बाबतीमध्ये जे गंभीर आरोप लागलेले आहेत त्याबद्दल सुध्दा तात्काळ प्रभावाने त्यांना निलंबित करावे आणि याच्यावर योग्य चौकशी बसवावी. अशी मी मा.महापौरजी आपल्याला विनंती करतो. मा.महापौरजी ज्या ज्या नगरसेवकांनी या ठिकाणी प्रश्न उपस्थित केले त्या प्रश्नाचे सर्व प्रश्नाचे उत्तर आयुक्त महोदयांनी या ठिकाणी दयावे. एक-एक प्रश्नाचे उत्तर त्यांच्या निवेदनात या ठिकाणी घ्यावे. याच्या मध्ये रायटिंगमध्ये सुध्दा नगरसेवकांना त्यांच्या प्रश्नाचे लेखी उत्तर देण्यात यावे आणि सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात यावे अशी मी आपल्याला विनंती करतो. धन्यवाद.

श्री.प्रफुल्ल गुडधे:-पाईंट ऑफ इन्फोमेशन, सन्मानीय सत्तापक्ष नेत्याच्या भाषण मी मुद्दाम थांबविलेले नाही. मी बाहेर जात असतांना कालच्या भाषणात जो काही उल्लेख केला होता की एक महिना मा.महापौरजी कुठे होते. त्यावर मा.सत्तापक्ष नेत्यांनी उत्तर दिले नागपूर शहरात विविध भागामध्ये जेवण वाटपाचे कामामध्ये मा.महापौरजी होते. माझा पाईंट ऑफ इन्फोमेशन यासाठी आहे, हे जे उत्तर यांनी दिले त्यात त्यांनी सांगितले की प्रफुल्ल गुडधे यांच्या प्रभागात सुध्दा मा.महापौरजी यांनी जेवण वाटप केले. पाईंट ऑफ इन्फोमेशन यासाठी आहे की महानगरपालिकेच्या वतीने जे जेवण वाटप होते कां? जर होत तर तेथील स्थानिक नगरसेवकांना कुठली माहिती त्या संदर्भात दिली याची माहिती मला हवी आहे.

श्री.संदीप जाधव(सत्तापक्ष नेता):-मा.महापौरजी, ते महानगरपालिकेकडून ते जेवण नव्हते.महापौर यांनी नागपूर शहराच्या जनतेला ती सेवा दिली आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे:-तो व्यैयक्तिक होते की महानगरपालिकेचे होते.

श्रीमती नंदा जिचकार:-पाईंट ऑफ इन्फोमेशन, या शहरामध्ये अत्यंत गंभीर समस्येला तोंड दिले आणि देत आहे. या नागपूर शहरामध्ये या काळामध्ये वेगवेगळया पक्षाच्या नगरसेवकांनी जागोजागी स्वत:च्या क्षमतेनुसार रेशन किट दिल्या, जेवण दिले. काय काय नाही केले. म्हणून या नागपूर शहराची मान ताठ राहिली. गरीबांना एक न्याय मिळाला, अशा कठीण परिस्थितीत महानगरपालिकेने कोव्हीडच्या या परिस्थितीत आपल्या निधीतून जेवणावर आणि राशनवर काय खर्च केला याची माहिती देण्यात यावी.

श्री.प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, जेवण त्या बद्दल काही बोलणे नाही.

श्रीमती नंदा जिचकार:-पाईंट ऑफ आर्डर, मी बोलत आहे. माझे बोलणे पुर्ण झालेले नाही. आपण जेष्ठ नगरसेवक आहात अशी मुस्काटदाबी आपण करु नये. मा.महापौरजी, अत्यंत वाईट अनुभवले जेव्हा या संकटाच्या काळी अधिका-यांना आपण म्हणत होतो, महानगरपालिका काय करीत आहे. तर महानगरपालिकेचे अधिकारी संस्थेच्या शोधात फिरत होते की कोणती संस्था मदत करते. निरनिराळया संस्थेला ते एस.एस.एस. करीत होते की इतके तेलाचे डबे पाठवा, इतके किलो गहु पाठवा. तर या संकटकाळी महानगरपालिकेने काय केले त्याची माहिती दयावी.

श्री.प्रफुल्ल गुडधे:-मा.महापौरजी, आपण निर्णय दिला होता की मा.आयुक्त या संदर्भात आपल्या भाषणात उत्तर देतील. माझा प्रश्न असा होता की वैयक्तिगत स्तरावर आपण माझ्या प्रभागात जेवण दिले त्या बद्दल मी आपला आभारी आहे. माझा प्रश्न माझ्या संभाषणात होता. मा.महापौर म्हणून आपण काय करीत होता. यांनी हे चुकीचे उत्तर दिले हे सभागृहाच्या पटलावर आहे.

श्री.संदीप जाधव:- मा.महापौरजी, मी एक गोष्ट विसरलो. महापौर ॲप असतांना आयुक्त ॲपची गरज काय? त्याचे सुध्दा उत्तर या ठिकाणी देण्यात यावे.

श्री.दयाशंकर तिवारी:-मा.महापौरजी, प्रफुल्लजी वरिष्ठ सदस्य है। उन्होने यह प्रश्न करना की संदीप जोशी के रुप मे आपने काम करना वो तो ठीक है परंतु महापौर के रुप मे आपने क्या काम किया इसकी जानकारी दे। यह एक व्यंक्ति है की दो व्यंक्ति है यह संदेह की बात है। संदीप जोशीही महापौर है और जिस समय मा.आयुक्त ने पोलीस कमिश्नर की मिटींग लेके कहां की विधायक नगरसेवक घर के बाहर घुमते है तो उनको अंदर डाल दिया जाये ऐसी अवस्था सन्माननीय नगरसेवक अपनी बेइज्जती करने के लिए बाहर क्यु घुमेगा। और मा.आयुक्त महोदय ने जितना बवाल किया है की ७५ लाख लोगो को खाना, ७५ लाख लोगो को खाना तो महानगरपालिका के माध्यम से उन तक खाना पहुचा है, यह भोजन पहुचाने का काम जिन जिन संस्थाओ ने किया है उन संस्थाओ का महानगरपालिका ने कभी अखबार मे उल्लेख किया क्या ? उल्लेख ही नही किया ७५ लाख लोगो को खाना। आपण जे काही केले ते स्व:तच्या फेसबुकवर केले आणि मा.आयुक्तांनी केले ते महानगरपालिकेच्या पोर्टलवर आहे. हेच अंतर आहे मा.महापौरजी, प्रसिध्दी पसरविण्यासाठी महापालिकेच्या पोर्टलचा उपयोग मा.आयुक्तांनी केला. तो आपण नाही केला म्हणून मा. प्रफुल्लजी हा गैरसमज झाला की मा. महापौरजी काहीच करीत नाही.माझी सुचना आहे मा.महापौरजी, प्रफुल्लजी आपल्या परिवारातीलच आहेत. म्हणून त्यांना जो प्रश्न केला, आता काहीही करावयाचे असेल तर ते फेसबुकवर टाका अशी माझी नम्र सुचना आहे आणि ती स्विकारावी अशी सुचना आहे मा.महापौरजी. मा.महापौरजी, मी एक व्हिडीओ टाकला होता, माझ्या बद्दल मा.आयुक्तांनी गैरसमज पसरविण्याचा प्रयत्न केला त्या संदर्भात, त्याच्यात आयुक्तांचे समर्थक आहेत, दांडगे समर्थकआहेत. उन्होने एक बडी मांग की है की सभागृह मे आयुक्त को जो कुछ कहां, वह जनता को दिखा देना चाहिए। मा.महापौरजी, मेरी करबध्द प्रार्थना है की महानगरपालिका के फेसबुक लाईव्ह पे आपने इस महानगरपालिका के पाच दिन के सभागृह को दिखाई देना चाहिए। उनके समर्थको की इच्छा है तो उनकी अंतिम इच्छा पुरी करना चाहिए।

**महापौर :- मा.आयुक्तांनी या संपुर्ण चार दिवसाचे आपले निवेदन या ठिकाणी करावे.**

श्री.प्रकाश भोयर:-मा.महापौरजी, जेव्हा निवेदन करतील. तेव्हा पाइंट ऑफ इन्फोंमेशन किंवा पाईंट ऑफ आर्डर घेता येते काय?

महापौर:- घेता येते परंतु त्यांनी चार दिवस आपले शांतपणे ऐकलेलेआहे. माझी सभागृहाला विनंती आहे, त्यामुळे त्यांच्या निवेदनात आपण कुठलाही पाईंट ऑफ इन्फोंमेशन किंवा पाईंट ऑफ आर्डर घेवू नये. परंतु सभागृहाला काही विचारावयाचे असेल, काही राहिले असेल तर सोमवारी संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत आपल्या लेटरहेडवरीत लिहून माझ्याकडे पाठवावे. त्या प्रश्नाचे लेखी उत्तर देण्याकरिता मी आयुक्तांना सुचना करेल.

श्री.प्रवीण दटके:-मा.महापौरजी, मा.आयुक्तांचे निवेदन शांतपणे ऐकण्यास काही हरकत नाही.

परंतु त्यांच्या निवेदनात परत मा.दयाशंकर तिवारी यांनी म्हटल्याप्रमाणे कुठे खोटेरडापणा, कुठे लबाडपणा असेल तर पाईंट ऑफ इन्फोमेशन किंवा पाईंट ऑफ आर्डर घेण्यासाठी आम्ही करु. तुम्ही तुमच्या सद्सदविवेकबुध्दीपणे आम्हांला परवानगी दयावी.

श्री.प्रकाश भोयर :- मा.महापौरजी, कसे आहे परत त्यांना राग आला आणि ते निघुन गेले तर या ३० लाख लोकसंख्येने तुम्हांला निवडून दिले त्यांना परत तुम्हांला विनंती करावी लागेल.

महापौर:- आता सर्व विषय संपवावे लागतील आणि पुढे जावे लागेल.

श्री.पुरुषोत्तम हजारे :- मा.महापौरजी, माझी एक सुचना आहे. कोव्हीड-१९ आहे. नागपूर शहरामध्ये खुप झोपडपट्टया आहेत. आणि या झोपडपट्टयामध्ये अनेक मजुर वर्ग राहतात. आता या महामारीच्या काळामध्ये महामारी अजून संपलेली नाही आणि या मजुरवर्गाचे कामकाज ठप्प पडलेले आहे. त्यांची जिवनशैली चालविण्याकरिता कोणत्याही प्रकारची व्यवस्था नसल्यामुळे जो इतक्या वर्षापासून महानगरपालिका त्यांच्याकडून टॅक्स वसुल करीत आहे. मा.महापौरजी, आपल्या माध्यमातून मा.आयुक्तांना विनंती आहे. नागपूर शहरामध्ये जितक्या काही झोपडपट्टया आहेत. त्या झोपडपट्टयातील लोकांना आपली जिवनशैली चालविण्याकरिता जी अन्नाची किट, जे सामान लागते ते त्या लोकांना नागपूर महानगरपालिकेच्या निधीतून देण्यात यावे अशी विनंती आहे. पुन्हा एक सुचना आहे, इतक्या वर्षापासून नागपूर शहरात लोकांकडून २४० करोडचा टॅक्स आपण घेतो. परंतु या महामारीच्या काळात कुणाकडे सहा महिने झाले असेल, कुणाकडे चार महिने झाले असेल तर त्यांच्याकडे कामधंद नसल्यामुळे तसेच अनेक मध्यमवर्गीयांचे कामधंद हिसकावल्या गेल्यामुळे या नागपूर शहराच्या जनतेच्या हिताच्या दृष्टीने एक निर्णय या ठिकाणी आपण घेतला पाहिजे. आपल्याला २५० कोटीचे नुकसान झाले तरी ते नुकसान सहन केले पाहिजे. या शहरात मोठमोठे पुल तयार झाले, मोठ मोठे सिमेंट रस्त्यामध्ये आपणा नुकसान सहन केले आहे तेव्हा या जनतेवरील टॅक्स माफ करण्यात यावी अशी मी आपल्या माध्यमातून विनंती करतो.

श्री.नितीन साठवणे:- मा.महापौरजी, आयुक्तांच्या उत्तर झाल्यानंतर मला बोलण्याची वेळ मिळेल काय? मा. महापौरजी, मा.सभागृह, या सदनात जितक्या नगरसेवकांनी माझ्या स्थगण प्रस्तावावर जी चर्चा घडवून आणली आणि चर्चेत सहभागी झाले त्यांचा मी शतशः आभारी आहे. हे सदन माझ्या मुळे चार दिवस चालले, या नागपूर महानगरचा मी ऋणी आहे. माझ्यावर जी घटना घडली आणि त्या घटनेला वाचा फोडण्याची मला संधी मिळाली. त्या संधी बद्दल मी आपला आभारी आहे. या संपुर्ण सभागृहाचा मी शतशः आभार मानतो. धन्यवाद.

**निगम आयुक्त** :- सन्माननिय महापौरजी, सन्माननिय सदन, गेल्या ४ ते ५ दिवसांपासून स्थगण प्रस्तावावर चर्चा झाली त्यातील मुद्दे प्रत्येकाचे सारखे आहे त्यामुळे मी रिपीट करणार नाही. सभागृहात स्थगन प्रस्ताव आणला गेला त्या अनुषंगाने जे प्रश्न आणि इशु रेज केले गेले. त्याची सुरुवात कंटोनमेंट झोन पासुन झाली. कोव्हीड सेंटर, आय.सी.एम.आर. दिलेल्या गाईडलाईननुसार, गव्हर्नमेंट ऑफ इंडीयाच्या गाईड लाईननुसार तसेच पब्लीक हेल्थ डिपार्टमेंट गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र यांनी वेळोवेळी काढलेल्या गाईडलाईन नुसार केल्या जाते. कोव्हीड – १९ चा प्रादुर्भाव नागपूर शहरामध्ये ११ मार्चला पहिली केस आली. त्यामध्ये शासनाने ज्या वेळोवेळी सुचना दिल्या होत्या, जशा जशा गाईड लाईन येत गेल्या त्या दृष्टीने अंमलबजावणी करण्याचे काम प्रशासनाच्या वतीने, वेगवेगळया अथॉरिटीच्या माध्यमातून वेगवेगळया स्तरावर केल्या जात आहे. आजही ती प्रक्रीया चालु आहे. कोव्हीड – १९ हा जसा सर्वांना नविन होता तसाच शासनाला सुध्दा नविन होता

त्यामुळे त्यावर वेळोवेळी गाईडलाईन चेंज होत गेल्या वेळोवेळी रिसर्च झाले त्या रिसर्चनुसार जे भारतातील वेगवेग्हया राज्यांच्या अनुभवाच्या दृष्टीने जे काही नोटीफिकेशन आले त्या दृष्टीने गाईड लाईन आल्यात आणि त्याची अंमलबजावणी करण्यात आली. कंटोनमेंट झोनच्या संदर्भात गाईड लाईन सुरुवातीला आल्या ज्या ठिकाणी पॉझिटीव्ह केस ई.पी.आय. सेंटर इंडेक्स केसेस सापडल्या असेल त्या ठिकाणचा अर्बन आणि रुरल ऐरिया मध्ये ५ किमी आणि ३ किलोमिटरचा ऐरिया कंटोनमेंट करायच्या गाईड लाईन होत्या, त्यामध्ये दुस-या अशा गाईडलाईन होत्या जरी ५ किलोमिटर किंवा ३ किलोमिटर असेल तरी तेथील परिस्थितीवर कॉटॅक्ट ट्रेसिंग आणि त्याचे इन्फ्लुअन्स किती असेल या दृष्टीने आवश्यक आहे त्या दृष्टीने आपण करीत होतो. म्हणुन वेगवेगळया कंटोनमेंट झोनमध्ये ५, ३ किंवा २ किलोमिटर अशी परिसिमांकन न ठेवता असा परीघ न ठेवता आवश्यकतेनुसार त्याचा इनफ्लुअन्स काय असेल या नुसार आवश्यकतेप्रमाणे कंटोनमेंट झोन तयार केला आहे आणि त्या नुसार त्याचे इम्प्लीमेंटेशन केले आहे. आता जवळपास ९६ पेक्षाही जास्त ॲक्टीव्ह कंटोनमेंट झोन आहे. २६ पेक्षा जास्त डि-कंटोनमेंट झोन आहे. म्हणजे डिसचार्ज झाल्यापासुन २८ दिवसाचा पिरेड संपलेला असेल ते नंतर ती गाईड लाईन १७ मे मध्ये चेंज केली. त्यामध्ये पॉझिटीव्ह शेवटची केस सापडली तेव्हापासुन २८ दिवस कायम स्वरुपी आहे त्या दृष्टीने अंमलबजावणी सुरु आहे. कंटोनमेंट झोन ज्यावेळेस करतो त्यावेळेस कोणतीही बाहेर किंवा बाहेरुन आत मुव्हमेंट म्हणजे आतुन बाहेर किंवा बाहेरुन आत अनुज्ञेय नाही. इमरजन्सी परपज सोडुन अत्यावश्यक वस्तु सोडुन कुठल्याही गोष्टी तेथे अनुज्ञेय नाही. त्या दृष्टीने इप्लीमेंट करण्याचा प्रयत्न केला. मी जेव्हा ऑर्डर काढली तेव्हा त्यामध्ये सुध्दा कोणत्या कोणत्या सर्व्हीसेस एक्झमटेड आहे त्या क्लीअरली नोटेड आहे त्यामध्ये हेल्थ इमरजन्सी सुध्दा आहे. या सर्व गाईड लाईन आदेशामध्ये नमुद आहे तसेच अधिकारी आणि कर्मचा-यांना सुध्दा सांगितले आहे. त्यामुळे कंटोनमेंट झोनमध्ये मेडीकल शॉप आपण उघडे ठेवले आहे. आवश्यक त्या ठिकाणी ॲम्ब्युलन्स बाहेर जाण्यासाठी प्रत्येक कंटोनमेंट झोनमध्ये ठेवल्या होत्या ते सुध्दा आदेशामुध्ये नमुद केलेले आहे. हे करीत असतांना कंटोनमेंट झोन डिफाईन करणे, कॉटॅक्ट ट्रेसिंग करणे, कंटोनमेंट झोनचा सर्व्हे करणे, त्याला आपण डोअर टु डोअर सर्व्हे म्हणतो या सर्व ॲक्टीव्हीटी डिफाईन करायच्या असतात. कॉटॅक्ट ट्रेसिंग करीत असतांना कोणताही व्यक्ती पॉझिटीव्ह आल्यानंतर त्याच्या संपर्कामध्ये कोणकोणते व्यक्ती आले असेल, फक्त तेवढेच नव्हे ज्या दिवशी पेशंट पॉझिटीव्ह आला तेव्हापासुन शेवटच्या १४ दिवस ते कॉरंटाईन करतील. तो व्यक्ती कोणत्या व्यक्तीच्या किंवा मित्राच्या कॉटॅक्टमध्ये आला असेल, वर्क प्लेसेस मध्ये कोणाच्याही कॉटॅक्ट मध्ये आला असेल याची माहिती आपण कॉटॅक्ट ट्रेसिंगच्या माध्यमातुन घेत असतो त्याची ट्रॅव्हल हिस्ट्री घेत असतो आणि त्या दृष्टीने कोव्हीड झोन आणि कंटोनमेंट झोन तयार करीत असतो, कंटोनमेंट झोन एका बाजुला, कॉटॅक्ट ट्रेसिंग एका बाजुला, त्या कंटोनमेंट झोनमध्ये किती हाऊस होल्ड आहे त्याचे पॅरामिटर तेथील लोकसंख्या आणि त्यामध्ये आवश्यक असलेल्या सर्व्हे करण्यासाठी लागणारा स्टाफ आपण कंटोनमेंट झोन तयार करतांना लक्षात घेतो. त्याच्या पुढचे १४ दिवस ॲक्टीव्ह सर्व्हे करीत असतो त्यानंतरचे १४ दिवस पॅसिव्ह सर्व्हे असतो. हे करीत असतांना पहिल्यांदा डोअर टु डोअर व्हिजीट, त्यामध्ये प्रत्येकाचे नाव, त्यांना कोव्हीडची लक्षणे आहे काय ते विचारले जातात त्याच्या अहवाल आवश्यकतेनुसार कोणाला होम कॉरंटाईन, कोणाला इन्स्टीटयुशनल कॉरंटाईन तसेच हॉस्पीटल मध्ये व्हाययचे असेल त्या ठिकाणी पाठविले जातात, ही माहिती वेबसाईडवर सुध्दा अव्हेलेबल आहे.

प्रत्येक दिवसाचे सुध्दा आहे. त्या साठी टिम्स तयार केले आहे. त्या टिम्स डिप्लॉय केले जातात. आणि त्या टिम कोव्हीड झोनमध्ये काम करत असतात. कोव्हीड झोन तयार केल्यानंतर त्या कंटोनमेंट झोनमध्ये जिवनावश्यक वस्तुचा पुरवठा करणे ही जबाबदारी तयार केली आहे. त्याकरीता एक सिस्टीम तयार केली आहे. एका बाजुला हेल्थ साईड आणि दुस-या बाजुला सिव्हील साईड. हेल्थ साईडचे प्रमुख आहे ते एम.ओ.एच आहे. आणि सिव्हील साईडचे जे आहे ते अति.आयुक्त आहे. त्यांच्या माध्यमातुन हे काम सुरु आहे. हे करीत असतांना २० वेगवेगळी समिती तयार केली आहे. त्यामध्ये जबाबदार अधिकारी व त्यांच्या अधिनस्त कर्मचारी यांच्या प्रत्येकांकडे जबाबदारी दिली आहे. त्यामध्ये झोन मध्ये असलेले अधिकारी वेगवेगळया स्तरावर काम करणारे कर्मचारी काम करीत असतात. सिव्हील साईडला झोन लेव्हलवर असिस्टंट कमीश्नरला जबाबदारी दिली आहे. ज्यांच्या झोनमध्ये कंटोनमेंट झोन असतात त्या ठिकाणी सिव्हील सप्लाय व्यवस्थित राहणे याची जबाबदारी दिली आहे. त्यामध्ये जर कंटोनमेंट झोनमध्ये जे बॅरिकेट असतात त्या त्या ठिकाणी आवश्यक असलेला भाजी पुरवठा व्हेंडरच्या माध्यमातुन, आवश्यक असलेले दुध वेगवेगळया व्हेंडरच्या माध्यमातुन, ईसेनशील असलेली दुकाने तसेच रेशन शॉप्स चालु ठेवले. रेशनिंग दुकानाच्या बाबतीत सुध्दा त्या कंटोनमेंट झोनमध्ये त्या व्यक्तीचे किंवा कंटोनमेंट झोनच्या बाहेरचे रेशनिंगचे शॉप असु शकते किंवा त्या कंटोनमेंट झोनमध्ये बाहेरचा व्यक्तीचे रेशनिंगचे शॉप असेल त्या ठिकाणी कंटोनमेंट झोन किंवा डिकंटोनमेंट झोन नाही या मध्ये येण्याची मुभा होती या प्रकारचे निर्देश दिले होते. यानुसार जिल्हाधिकारी तसेच एफ.डिओ. ला निर्देश दिले होते. ज्या ज्या ठिकाणी अडचणी आल्यात त्या अनुषंगाने त्यांना इंटरविन करुन एफ.डी.ओ. मार्फेत रेशनिंगची सुविधा सुध्दा देण्यात आली होती. कंटोनमेंट झोन तयार करीत असतांना त्या ठिकाणची हाय रिस्क पेशंट किंवा हाय रिक्स व्यक्ती पॉझिटीव्ह व्यक्तीच्या संपर्कामध्ये आली असेल तर त्यांना कॉरंटाईन करणे अपेक्षित असते. ते करीत असतांना त्यांना आयडेन्टीफाय करणे, त्यांना ट्रेस करणे, ट्रॅक करणे, त्यांना कॉरंटाईन सेंटरला नेणे, पॉझीटीव्ह आले की त्यांना हास्पीटल मध्ये अॅडमीट करणे ही प्रक्रीया असते त्या दृष्टीकोणातून निरंतर जेव्हापासून केसेस आल्या तेव्हा पासुन ही प्रक्रीया चालु आहे. हे कॉरंटाईन सेंटर आपण ऐस्टॅब्लीश केले तेथे जेवणाची सुविधा असेल, टायलेट बाथरुमची व्यवस्था असेल, लाईट, पाणी, स्वच्छतेची असेल बायोमेडीकल वेस्टच्या संदर्भातील असेल, त्या सर्व व्यवस्था आपण त्या ठिकाणी केलेल्या आहेत. पहिले क्वॉरंटाईन सेंटर एम.एल.ए. होस्टेल ला केले आहे. दिनांक ११ मार्च रोजी पहिल्या केसेस आल्या त्या आंतरराष्ट्रीय रिटर्न होते त्या नंतर २५ तारखेला जी केस आली ती दिल्ली रिटर्न केस आली. ११ मार्च ते २५ मार्च या दरम्यान या ज्या रिटर्न केसेस होत्या त्यांचे कॉटेक्ट ट्रेसिंग आणि होम आयसोलेशन किंवा होम क्वॉरंटाईनचा अनुभव लक्षात घेता त्यांनी होम क्वॉरंटाईन पाळल्या गेले नाही हे निर्देशनास आले त्यामुळे २५ तारखेनंतर इन्स्टीटयुशनल क्वॉरंटाईन करण्याचा निर्णय घेण्यात आला. क्वॉरंटाईन सेंटरच्या संदर्भात वेगळा इशु आला की इन्स्टीटयुशनल क्वॉरंटाईन मुळे पोझिटीव्ह केसेस आल्या काय? असे काही प्रश्न सदस्यांकडुन प्रश्न विचारले गेले तर त्याचे उत्तर नाही असे आहे. त्या मागची कारणमिमांसा अशी आहे की दोन ठिकाणी पहिल्या दिवशी पॉझिटीव्ह केसेस नव्हत्या त्यानंतर १२ किंवा १४ व्या दिवशी दुसरी टेस्ट घेतो ती टेस्ट घेतल्यानंतर तेथे पॉझिटीव्ह आली. पहिली केस रवीभवनची होती.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ ऑर्डर जेवणाची व्यवस्था, स्वच्छतेची व्यवस्था महानगरपालिकेची होती ती योग्य होती की नाही त्या संदर्भात खुलासा करावा.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, क्वॉरंटाईन सेंटरमध्ये सुविधा केले असेल तर लिखीत स्वरुपात दयावे.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ ऑर्डर घेण्याचा माझा अधिकार आहे आपण परवानगी दया की नका देऊ, आयुक्त जे सांगत आहे जेवणाची, स्वच्छतेची, चादरीची व्यवस्था, गादीची, शौचालयाची व्यवस्था होती ती उत्तम स्वरुपाची होती की नव्हती. आणि ती कोणाची जबाबदारी होती.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, आपण जो निर्णय दिला त्या अनुषंगाने मी या ठिकाणी विचारत आहे. आपण ते ठरवुन घ्यावे. कोणाचा दबाव थोडी चालणार आहे.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, क्वॉरंटाईन सेंटरच्या सुविधेचा व्हीडीयो आमच्याजवळ आहे.

महापौर :- आयुक्तांचे निवेदन पुर्ण होऊ दयावे.

श्री.किशोर कुमेरिया :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ ऑर्डर या ठिकाणी मा.सदस्य श्री.दयाशंकर तिवारी यांनी काल पासुन भाषण केले आजही केले यामध्ये पक्षपात म्हणुन कोणी मधात नाही बोलले, आपल्या पक्षाची बाजु त्यांच्या अधिकारानुसार ते बोलले, दुसरा पक्ष म्हणुन त्यांची बाजु बरोबर होती की नाही त्यांच्या मधात कोणी बोलले नाही. त्याचे मुख्य कारण असे होते की दयाभेय्या हे सगळयात अभ्यासु नगरसेवक आणि त्यांचा आदर आणि मानसन्मान आहे. ते नगरसेवक म्हणुन त्यांची बाजु ठेवत नव्हते, भारतीय जनता पार्टीची बाजु नव्हते ठेवत, तर या संपुर्ण सभागृहाच्या सदस्यांच्या बाजुने ते बोलत होते म्हणुन आम्ही मधामध्ये बोललो नाही परंतु जो शब्द आयुक्तांच्या विषयी सुरुवातीला सभागृहामध्ये झाला होता त्या नावावरुन माझी विनंती अशी आहे की मा.आयुक्तांचे निवेदन पुर्ण होऊ दयावे.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी मी पॉइंट ऑफ ऑर्डर घेतला की ८ क्वॉरंटाईन सेंटर या शहरात आहे. व्ही.एन.आय.टी. झाले, पाचपावली झाले ते भर रस्त्यामध्ये आहे. मग आय.सी.एम.आर. च्या गाईडलाईन काय होत्या. आम्ही या सभागृहात खोटे निवेदन ऐकुन घेणार नाही.

श्री.किशोर कुमेरिया :- मा.महापौरजी, पहिल्यांदा आयुक्तांचे पुर्ण निवेदन होऊ दयावे, असे जर चालले तर प्रश्न आणि उत्तर होईल.

(बेल)

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी आम्ही या सभागृहात खोटे निवेदन ऐकुन घेणार नाही.कारण आमच्याकडे फोटो आहे. बातम्या आहे.

श्री.दयाशंकर तिवारी :- पॉइंट ऑफ ऑर्डर मा.महापौरजी, आपके माध्यम से मा.आयुक्तजी से मेरा सामान्य सा निवेदन है। और दोनो के बिच सामज्यंस स्थापन करनेवाला निवेदन है। मेरा निवेदन यह है आयुक्त महोदय भाषण करेगे अगर वह त्रुटीपुर्ण होगा तो नगरसेवक सामन्यसे प्रश्न करेंगे इसके लिये मेरा निवेदन है संपुर्ण विषयपर आयुक्त महोदय एक लेखी निवेदन आपके पास कर दे, उस लेखी निवेदन को आप प्रत्येक नगरसेवक को वितरीत करे और उसपर चर्चा करे तो आयुक्त के उपर टिकाटिपन्नी भी नही होंगी, किसी प्रकार से किसी नगरसेवक को यह भी नही लगेगा की मेरे अधिकार का हनन हो रहा है। और आयुक्त महोदय विस्तारीत सारी बाते कह सकेंगे, यह मेरा निवेदन है

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, मा.आयुक्त निवेदन करीत असतील तर सदस्यांना त्यांच्या निवेदनावर निश्चितपणे चर्चा करण्याचा अधिकार आहे. त्यांचे जे काही म्हणणे असेल, खरे असेल, खोटे असेल, चुक असेल, बरोबर असेल, अपुर्ण माहितीच्या आधारावर असेल, ज्या कुठल्या कारणामुळे निवेदन करीत असतील, त्यांना ते निवेदन करु दिले पाहिजे. मा.महापौरजी, या ठिकाणी सर्व सन्माननिय सदस्यांनी या चर्चेत भाग घेतला. त्यातील किती सत्य आणि किती असत्य कोणी विचारले नाही. आपण ते सत्यच मानतो. त्याच्यावर जर काही आक्षेप असेल तर डिसीजन घेऊ.

(बेल)

श्री.तानाजी वनवे :- मा.महापौरजी,जसे मा.सदस्यांचे म्हणणे आपण ऐकुन घेतले तसेच मा.आयुक्तांचे म्हणणे देखील आपण ऐकुन घ्यावे. त्यामध्ये जर काही आक्षेप असेल तर पॉइंट ऑफ ऑर्डर घेऊ दयावे.

(बेल)

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, या ठिकाणी विरोधी पक्ष नेत्यांचे म्हणणे बरोबर आहे. मी एक सदस्य आहे आणि मला आय.सी.एम.आर. च्या गाईड लाईन जाणुन घेण्याचा अधिकार आहे.

(बेल)

श्री कमलेश चौधरी :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ ऑर्डर, आपल्या आदेशाच्या वर जर सत्तापक्ष याला हनन करण्याचा प्रयत्न करणार असेल तर बरोबर नाही. आयुक्तांना त्यांचे निवेदन तर देऊ दया.

(बेल)

श्री.दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी, आपके माध्यम से आयुक्तजी को मेरा निवेदन है, बहोत सामान्यसा निवेदन है जब आयुक्त महोदय कहते है आय.सी.एम.आर. के गाईडलाईन के हिसाब से सदस्यों ने अपने संभाषण मे उसके उपर प्रश्न उठाया है की गाईडलाईन के विपरीत काम हो रहा है। इसलिये मा.महापौरजी आयुक्त महोदय जिस गाईडलाईन के हिसाब से काम कर रहे है उसका विस्तार से उन्होने अपनी भुमिका रखी तो उतनी ही विस्तार से किस नियमों के हिसाब से काम कर रहे है उसका भी विस्तारीत तरीके से सारी बातों से कह सकेंगे। हम पांच दिन बैठे है और पांच दिन आयुक्त का भाषण सुनने के लिये तयार है आयुक्त महोदय विस्तार से भाषण केरेंगे तो किसीको बिच मे भाषण देने के लिये खडा नही होना पडेगा। इसलिये आयुक्त महोदयजी को सारा विषय विस्तार के साथ रखने के लिये कहीये।

महापौर :- आयुक्तांनी येथे विस्तृतपणे येथे विषय ठेवावा. सर्व सन्माननिय सदस्यांचा पॉइंट ऑफ ऑर्डर आणि पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन घेण्याचा अधिकार आहे. ते दयायचे की नाही ते मी ठरविणार, परंतु माझी सर्वांना विनंती आहे (बेल) मी बोलत असतांना कोणीही मधात बोलायची गरज नाही. मी बोलत आहे आणि तुमचा सर्वांचा प्रतिनिधी मी देखील आहे. हे होत असतांना आयुक्तांनी पाच दिवस सर्व सदस्यांचे भाषण ऐकले आहे त्यांचे बोलणे विस्तृत करावे. कुठेही सदस्यांच्या मांडलेल्या प्रश्नांच्या विपरीत होऊ नये. एखादया विषयामध्ये जर सदस्यांना वाटले तर की ते विपरीत आहे आणि ते मला जरी वाटले एखादयाचा प्रश्न किंवा पॉइंट ऑफ ऑर्डर तेवढा विचारावा आपण देखील जास्त तानाव नाही वाटले तर आपण लिखीत स्वरुपात म्हटले आहे ते उत्तर देतील. आयुक्तांनी येथे सुरु करावे.

निगम आयुक्त :- सन्माननिय महापौरजी, येथे जो क्वॉरंटाईन सेंटर मधला इशु उचलला गेला

आहे त्यावर काही प्रश्न येथे मांडले आहे त्यामध्ये क्वॉरंटाईन केल्यामुळे काही व्यक्तींना तेथे ठेवल्यामुळे बाधा झाली काय ? पहिल्यांदा डाऊट आला जेव्हा रवीभवनमध्ये पहिल्या दिवशी निगेटीव्ह आल्यानंतर १४ व्या दिवशी डिसचार्ज करण्यासाठी आपण सेकंड टेस्ट करतो अशा वेळेस ती व्यक्ती पॉझिटीव्ह आली. दुसरी केस सिम्बॉयसिस मध्ये ज्या ठिकाणी आपण क्वॉरंटाईन सेंटर ठेवले आहे त्या ठिकाणी पाच व्यक्ती १२ व्या, १३ व्या दिवशी पॉझिटीव्ह आले. जर क्वॉरंटाईन सेंटर इनफेक्शन सोर्स असते तर रवीभवनची केस असेल किंवा सिम्बॉयसिस केस असेल तर रवीभवनची केस असेल ते दोन व्यक्ती होते ते दोघेही अजमेरला जाऊन आले. त्यामुळे त्यांना क्वॉरंटाईन केले होते दोघांच्याही पहिल्या दिवसाची केस निगेटीव्ह होत्या ते एका रुममध्ये राहिले होते, एक टॉयलेट वापरत होते. १४ व्या दिवशी एक व्यक्ती पॉझिटीव्ह आला आणि दुसरा व्यक्ती निगेटीव्ह आला. एकाच ठिकाणी, एकाच रुममध्ये आणि एकाच टॉयलेट बाथरुम त्यांनी युज केले होते. त्यामुळे जर ते क्वॉरंटाईन सेंटर इनफेक्शन सोर्स असेल तर दोघांनाही व्हायला पाहिजे होते. त्यामुळे क्वॉरंटाईन सेंटर इनफेक्शन सोर्स होऊ शकत नाही. सिम्बॉयसिस होस्टेलच्या संदर्भात ५ व्यक्ती १२ व्या ते १३ व्या दिवशी पॉझिटीव्ह आले त्यांच्याही रुम मध्ये १५ व्यक्ती होते. ते एका कुटुंबातील एका रुममध्ये एक व्यक्ती व आईवडील आहे त्यातील पहिल्या दिवशी तीनही व्यक्ती निगेटीव्ह येतात, मात्र १३ व्या दिवशी आईवडील निगेटीव्ह येतो मात्र मुलगा पॉझिटीव्ह येतो ही पण एक घटना आहे. त्याचे कारण असे आहे की तो इन्फेक्शन सोर्स नाही. मग आपला सहाजिकच प्रश्न असा असेल की ते १२ व्या व १३ व्या दिवशी पॉझिटीव्ह केस कशी आली. कारोना व्हायरसचे मेडीकल कारणे आणि मेडीकल फीचर समजुन घेणे गरजेचे आहे. कोरोना व्हायरसचे जेव्हा इन्फेक्शन होते जेव्हा पहिल्या दिवसापासुन दुस-या दिवसापर्यत इन्फेक्शन होण्याचे चान्सेस हे २.५ टक्के लोकांना असतो आणि दुस-या दिवसांपासुन १४ व्या दिवसापर्यत इन्फेक्शन होण्याचे चान्सेस हे ९५ टक्के लोकांमध्ये असतो आणि १४ व्या दिवसांपासुन २८ दिवसापर्यत २.५ टक्के लोकांना लक्षणे दिसु शकतात. हे तुकाराम मुंढे नाही या संदर्भात गाईडलाईन आहे ते सांगतात. म्हणुन १४ व्या दिवशी सुध्दा पेशंट रिकव्हर करुन डिसचार्ज केल्या जाते त्यानंतर सुध्दा १४ दिवस होम क्वॉरंटाईन रहायला सांगितले जाते. ते मेडीकल रिजन आहे. म्हणुन कोणताही व्यक्ती पहिल्याही दिवशी असु शकतो, चौदाव्या दिवशी सुध्दा असु शकतो परंतु कोणत्या परसेंटज मध्ये असु शकतो ते त्यावर डिपेंड आहे तो ९५ परसेंट मध्ये येतो की २.५ परसेंट मध्ये येतो ते त्यावर डिपेंड करतो मग त्याची इम्युनिटी पावर चांगली असु शकते त्याचा इन्फेक्शनचा रेट जास्त असु शकतो, कमी असु शकतो तो पहिल्या दिवशी संपर्कात आला दुस-या दिवशी संपर्कात आला, आला की नाही आला म्हणुन क्वॉरंटाईन सेंटर मधुन इन्फेक्शन होऊ शकतो काय याचे एक पी.आय.एल. नागपूर हायकोर्ट बॉम्बे बेंच या ठिकाणी सांगतो. त्यांनी एक कमेटी अपॉइंट केली होती. ती हाय कोर्टाने केली होती तुकाराम मुंढे ने नाही. त्याच्यामध्ये जे मेंबर होते ते त्यांनी ठरविले होते. त्या समितीचा रिपोर्ट आहे. त्या समितीने दोन क्वॉरंटाईन सेंटरला व्हिजीट दिली एक आमदार निवास आणि दुसरे व्ही.एन.आय.टी. त्यांचा रिपोर्ट मी पटलासमोर वाचु शकतो. ते हाय कोर्टाच्या रेकॉर्डवर पण आहे. त्यातील जे कंनक्लुजन आहे ते वाचतो. उपरोक्त दोन्ही ठिकाणी गठीत केलेल्या समितीने प्रत्यक्ष भेट दिली असता दोन्ही ठिकाणचे अलगीकरण केंद्र राहत्या वसाहतीपासुन कमीत कमी १० मिटर अंतरावर आहे त्यामुळे सदर रहिवासी क्षेत्राला संसर्गाचा धोका होऊ शकत नाही. अशी या समितीचे मत आहे. (वाचले) समितीने व्हिजीट केल्यानंतर हाय कोर्टासमोर केले आणि ते मान्य केले त्यामध्ये आक्षेप केला नाही. सांगायचे ऐवढेच आहे की या

समितीने कोर्टाने सांगितले होते आय.सी.एम.आर. च्या गाईडलाईन नुसार आहे की नाही, त्या ठिकाणी इन्फेक्शन होऊ शकते की नाही. तो २ ते ३ पानाचा रिपोर्ट आहे. हे सर्व करीत असतांना क्वॉरंटाईन सेंटरमध्ये ज्या सोयी सुविधा दयायच्या असतात आपण प्रत्येक क्वॉरंटाईन सेंटरला वेगवेगळया टिम नियुक्त केल्या आहेत. त्या टिममध्ये जेवणाची टिम आहे. तेथे इंन्सीडंट कमांडर पण आहे. त्या ठिकाणी मेडीकलची टिम आहे. या सर्व टिम ज्या काही फॅसिलीटी असतात त्या अनुषंगाने प्रोव्हीईड करतात. त्यामध्ये दोन वेळचे जेवण सकाळचा नाश्ता आणि चहा, संध्याकाळी चहा आणि भिस्कीट ही व्यवस्था पहिल्या दिवसापासून आहे. यामध्ये अनेक संदस्यांनी प्रश्न विचारले ते मी प्रत्येक सदस्यांमध्ये जाणार नाही परंतु त्या अनुषंगिक बाबी समोर ठेवतो याच्यामध्ये जो खर्च झालेला आहे त्याचे पुर्ण डिटेल्स देतो. आतापर्यत क्वॉरंटाईन सेंटरमध्ये आपण जे सांगितलेले आहे त्याप्रमाणे प्रथमत: हे क्वॉरंटाईन सेंटर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फेत बघितल्या जात होते. परंतु मध्ये काही १ ते २ इंन्सीडंट घडले त्यानंतर ते महानगरपालिका आयुक्ताला बघायला सांगितले ती तारीख २ मे आहे. त्याच्या पुर्वी हे सर्व कामे जिल्हाधिकारी कार्यालयामार्फेत केले जात होते. २ मे ते २५ मे च्या दरम्यान दोन वेळचे जेवन, चहा व सकाळचा नाश्ता, पिण्याचे पाणी या परीने प्रती व्यक्ती प्रती दिन दोन वेळेचे जेवन, सकाळचा नाश्ता आणि संध्याकाळचा चहा आणि नाश्ता असे १५९ प्रती व्यक्ती प्रती दिनाचे टेन्डर काढुन रेट आले होते त्यानुसार २ मे ते २५ मे या ७५.२८ लक्ष हाती आले. दिनांक २६ मे पासुन आजपावेतो राधास्वामी सत्संग व्यासकडुन निशुल्क नाश्ता व भोजन परंतु त्याबरोबर चहा, पाणी, भिस्कीट, सर्व्हीस हे आपण प्रायव्हेट व्यक्तीकडुन घेतले कारण राधास्वामी सत्संगाने सांगितले की आम्ही फक्त जेवण देऊ शकतो, नाश्ता देऊ शकतो परंतु संध्याकाळचा चहा आणि भिस्कीट देऊ शकत नाही. त्यासाठी लागणारा मॅनपावर मध्ये प्रती व्यक्ती प्रती दिन ५२.४७ प्रती व्यक्ती प्रमाणे ३२.२८ लक्ष रुपये आहे. हे करीत असतांना राधास्वामी सत्संग व्यास यांच्यातर्फे जे जेवण बनविल्या जातात ते पॅकींग मटेरियल लागतात पॅकींग मटेरीयल मध्ये त्यांच्याकडचे जे मटेरियल होते ते योग्य क्वॉलिटीचे नव्हते त्यावर चर्चा झाली आपल्याला ज्या पध्दतीच्या प्लेट पाहिजे होत्या त्याचे टेन्डर काढुन पॅकींग मटेरिनयल, डिसपोजल प्रती दीन प्रती व्यक्ती १२.५८ प्रमाणे आतापर्यत ७.८१ लक्ष खर्च झाला आहे. गादी, चादर,उशी,कव्हर,पांघरुन, टॉवेल, नॅपकीन, बकेट, मग,जार, ग्लास याचे आपण टेन्डर काढले, सुरुवातीला ही जी व्यवस्था होती ती भाडयावर होती जेव्हा हे सर्व काम जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे चालत होते. एका व्यक्तीसाठी हे जे आता मी बोललो ते गादी, चादर, उशी जे डेली मटेरियल लागते या साठी दर महिन्यात सर्वसाधारणपणे ३००० रुपये प्रती व्यक्ती रेट येत होता. मग आम्ही विचार केला रेंन्टवर घेणे बरे राहील की विकत घेणे बरे राहील त्याचे कॅलकुलेशन केले. टेन्डरमध्ये जर कमी रेट आला तर त्याकरीता आम्ही टेन्डर काढले. या सर्व गोष्टी आहे त्याकरीता पर व्यक्ती पर मंथ ३००० रुपये मिळत होत्या ते टेन्डर मध्ये विकत १८३० रुपयाला पडल्या त्यामध्ये आम्ही फायननशियल नॉर्म्स फॉलो केले आहे. त्या अनुषंगाने नगरसेवकांचा प्रश्न होता की टेन्डरची प्रक्रीया केली होती काय ? तर त्याचे उत्तर होय असे आहे की यामध्ये टेन्डर प्रक्रीया केली ती किती दिवसाची केली. इमरजन्सी नॉर्म्स मध्ये २४ तासामध्ये करता येते ते आम्ही २८ तासामध्ये इमेल, बाय फोन कॉल, आणि पेपरमध्ये केले जे जे समोर समोर त्यांना घेऊन केले आहे. हे करीत असतांना काही सदस्यांनी विचारले की अळया दिसल्याच्या कंम्पलेंट आल्या काय ? असे मी कधीच म्हणत नाही की तक्रारी आलेल्या नाही. परंतु त्या कंम्पलेंट मध्ये तथ्याश नव्हता. ज्या ज्या वेळेस ज्या ज्या ठिकाणी तक्रारी आल्या त्या आम्ही अॅड्रेस केल्या त्यातील

पहिली तक्रार ही जिल्हाधिकारी कार्यालयाकडे काम होते तेव्हा त्या वेळेस व्हेरीफाय केल्यानंतर तत्थ्यांश सापडला नाही. २ मे रोजी ज्या वेळेस महानगरपालिकेकडे क्वॉरंटाईन सेंटर आले त्याच्या दुस-या दिवशी सकाळी सर्व अधिका-यांच्या बैठका घेतल्या इनक्लुडींग एम.एल.ए. होस्टेलला जे अधिकारी वेगवेगळया कार्यालयाचे आहे त्यांच्या बैठका घेतल्या वेगवेगळया कार्यालयामध्ये त्यामध्ये जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, ऐरीगेशन, आहे तेथील वेगवेगळया विभागाचे अधिकारी/ कर्मचारी आपण वापरत असतो आपली आवश्यकता भागविण्यासाठी हे करीत असतांना त्यांची मिटींग घेतली मिटींगमध्ये हे निर्देशनास आले आपण कोणत्या कोणत्या फॅसिलीटी देतो त्यावर आढावा घेतला. जनरल गोष्टी मला माहिती होत्या, डिव्हीजनल कमीश्नर, कलेक्टर, मी , सी.पी., सी.ई.ओ, डीन्स, एम.ओ.एच, हे सर्व वेगवेगळया स्तरावर वेगवेगळया मिटींग घेऊन माहिती घेत होते आणि निर्णय घेत होते. हा फक्त निर्णय हा एकटा कलेक्टरचा नाही आहे. डिव्हीजनल कमीश्नरचा नाही आहे. आयुक्तांचा नाही आहे. हे कलेक्टीव्हली अनेक डिसीजन आहे. त्याची पॉलिसी पाहुन काय स्ट्रॅटीजी कोणत्या वेळेस करायची याची वेळोवेळी चर्चा करतात पालकमंत्री महोदयांसोबत चर्चा करतात शासनाशी व्ही.सी. च्या माध्यमातुन चर्चा झाली आणि गायडन्स या सर्वांचा उहापोह वेगवेगळया स्तरावर जशी जशी सिच्युऐशन आली त्या दृष्टीकोनातुन स्ट्रॅटीजीचा पार्ट सुध्दा चेंज होत गेला. त्या दृष्टीने आपण पाठपुरावा केला. त्यावेळेस मी तेथील कर्मचा-यांची मिटींग घेतली. मिटींग घेतल्यानंतर कोणत्या कोणत्या फॅसिलीटी आपण देतो ते बघीतले, जेवण आपण काय देतो, जेवणामध्ये कोणते अॅटम असतात ते सुध्दा बघितले त्या वेळेस निर्देशनास असे आले प्रति व्यक्ती प्रति दिन जेवणासाठी जवळ जवळ ७०० रुपये खर्च येत होता. आता तो का येत होता त्यामध्ये मला जायचे नाही. त्यासाठी एक वेगळी प्रक्रीया पार पाडली होती. अगोदर त्यामध्ये दुसरा व्हेंडर होता मी त्यावर प्रश्न उपस्थित करीत नाही. परंतु ज्यावेळेस ११ मार्चची पहिली केस आली तो इंटरनॅशनल रिटर्न होता त्यावेळेस ही व्यवस्था करीत असतांना त्या ठिकाणी एम.एल.ए. होस्टेलला जो कोणी व्हेंडर असेल, जे कोणते टेन्डर निघाले होते त्या दृष्टीकोणातुन ती व्यवस्था उभी केली होती आणि त्या दृष्टीने ते काम करीत होते. ज्यावेळेस माझ्याकडे ते आले त्यावेळेस मी ते व्यवस्था चेक केली. आपल्याला व्यवस्थित जेवण दयायचे आहे परंतु अनावश्यक गोष्टी सुध्दा आपण टाळल्या पाहिजे. त्यामध्ये पाणी बॉटलची व्यवस्था त्याची आवश्यकता नव्हती त्या आम्ही कमी केल्या. त्यावेएजी आम्ही कॅन ठेवल्या, त्याचबरोबर स्वीटस् दिले जायचे, आम्ही हा विचार केला की नॉर्मली मी आपण सर्वजण जे जेवण करतो ते सुध्दा त्याच व्यक्तीला दिले पाहिजे त्यापेक्षा कमी असु नये, मग पोळी भाजी असेल, नाश्ता असेल, चहा असेल, त्या दृष्टीने व्यवस्था केली आणि मग टेन्डर काढल्यानंतर रेट आहे ते १५९ आहे आणि सकाळचा चहा आणि संध्याकाळचा चहा आणि भिस्कीट आणि जे मॅनपॉवर लागते, वॉटर बॉटल लागतात त्या साठी करीत आहे. वास्तविक पाहता त्यामध्ये दोन विषय आहे जेव्हा जिल्हाधिकारी कार्यालयाकडे काम होते आणि नंतर राधास्वामी सत्संग व्यासचा प्रश्न उपस्थित झाला त्यावेळेस व्हेंडर चेंज झाले होत आणि ज्या वेळेस व्हेंडर चेंज होतात तेव्हा एखादया गोष्टीची सवय लागल्यानंतर म्हणजे अगोदर मला स्वीट देत होते नंतर स्वीट देणे बंद केले मानुस म्हणुन मी प्रश्न विचारणार हा सामान्यपणे प्रश्न विचारला जाणार. ज्यावेळेस राधा स्वामी सत्संग व्यासच्या संदर्भात मेजर कंम्पलेंट आल्या होत्या आणि काही वेळेस तक्रारी आल्या त्या त्या वेळेस आपण त्याचे इनव्हेस्टीगेशन केले त्यावर रेक्टीफाय करण्याची गरज पडली ज्यावेळेस व्हेंडर चेंज केले त्यावेळेस एम.एल.ए. होस्टेल मधील तक्रार होती की वेळेवर जेवण मिळत नाही.डिले झाले ते

बरोबर आहे परंतु त्या जेवणामध्ये अळया नव्हत्या, ॲडशीनल कमीश्नर त्या गोष्टीचे स्वत: इनचार्ज आहे. त्यामुळे तक्रारी आल्या असे नाही आहे. ते व्हेरीफाय केले तर हो ते रेक्टीफाय ॲक्शन घेतली काय ? तर होय, त्या दृष्टीने आम्ही पुढे जात आहोत. काही सदस्यांनी हा सुध्दा प्रश्न विचारला की बटाटे वडयामध्ये अळया सापडल्याचा व्हीडीयो आहे. वास्तविक पाहता मा.महापौर महोदय, हा विषय जेव्हा झाला त्यावेळेस ॲडीशनल कमीश्नर यांना दाखविले, त्यांच्याकडुन ८ दिवसापुर्वी हा व्हीडीयो आला होता. पत्रकार कडुन आला याची माहिती नाही. त्यामुळे अशा गोष्टी होत राहतात. प्रत्येक गोष्टी व्हेरीफाय करायला पाहिजे, रेक्टीफाय ॲक्शन घ्यायला पाहिजे ती केल्या गेली काय ? तर त्याचे उत्तर होय आहे. ज्या वेळी घरामध्ये ४ व्यक्ती राहतात त्यावेळी काहींना तिखट पाहिजे, काहिंना तुपकट लागते, काहींना तेलकट लागते, कोणाला कमी तेल लागते. ज्यावेळी २३०० लोकांना आपण भोजन देतो त्यावेळी प्रत्येकांना टेस्ट प्रमाणे देऊ शकनार नाही. त्यामुळे कंम्पलेंट निश्चितपणे येईल त्या कधी होणार नाही असा मी कधी दावा केलेला नाही. ते बेसिक क्वॉलिटी फुड असावे ते वेळेवर भेटावे, ॲडीक्वेट असावे हा आमचा प्रयत्न राहिला आहे. आतापर्यंत राहणार आहे. आणि येथुन पुढेही राहणार आहे. त्यामुळे यामध्ये कुठेही कमतरता राहणार नाही. अनेक सदस्यांनी प्रश्न विचारले की पैसे नाही आहे काय ? पैशाचा येथे विषय नाही. परंतु त्या प्रकारची सुविधा दिली गेली पाहिजे हा त्या मागचा उद्येश आहे. स्वच्छतेच्या बाबतीत, टॉयलेटच्या बाबतीत, इंडीव्हीज्युअल टॉयलेटच्या संदर्भात प्रश्न विचारले गेले. इंडीव्हीज्युअल टॉयलेट ज्या ठिकाणी रुम्स आहे त्या ठिकाणी होते परंतु ज्या ठिकाणी रुम्स नव्हते होस्टेल आहे त्या ठिकाणी ४ ते ५ टायलेट बाथरुम आहे त्या क्लीन केले जातात काय ? तर त्याचे उत्तर होय. तेथे मानसे ठेवले आहे ते नियमीत क्लीन करतात. काही रुम मधील असे व्हीडीयो आले की माझे टायलेट स्वच्छ केले नाही. रुममध्ये टायलेट साफ करण्यासाठी किंवा स्वच्छ करण्यासाठी जे इस्ट्रुमेंट लागतात ते आपण दिलेले आहे. प्रत्येक रुममध्ये ते ससपेक्ट असल्यामुळे आपला व्यक्ती जाऊ शकेल अशी स्थिती नाही म्हणुन ती गोष्ट आपण केलेली नाही. ते एम.एल.ए. होस्टेल संदर्भात झाले असेल किंवा ज्या वेळेस एक व्यक्ती क्वॉरंटाईन होऊन निघतो त्यावेळेस पुर्णपणे त्याचे सॅनिटायझेशन होते आणि दुसरी व्यक्ती येण्याच्या अगोदर सॅनिटायझेशन होते. ही प्रक्रीया पार पाडली जाते. होस्टेलमध्ये दिवसातुन दोन ते तिनदा सॅनीटायझेशन केल्या जाते परंतु इंडीव्हीज्युअल रुममध्ये ते केल्या जात नाही. मात्र घरामध्ये जे केल्या जाते तीच परिस्थिती लावण्याचा प्रयत्न केला आहे. कोणाच्याही स्व:ताच्या रुममध्ये जर व्हीडीयो केला असेल की स्वच्छता ठेवत नसेल तर त्याला दुसरे कोणी जबाबदार राहु शकत नाही. आमचा उद्येश हा ॲडीक्वेट मेजर्स घेणे आहे. ॲडीक्वेट फॅसिलीटी देणे आहे. त्यांना लक्झरी करण्यासाठी देऊ शकत नाही ही सुध्दा वस्तुस्थिती आहे. बायोमेडीकल वेस्ट कंम्पाईल केले जाते आणि ते डिसपोज केले जाते. शहरामध्ये सुध्दा आपल्या गाडया फिरतात. अनेक नागरिक मास्क वापरायला लागले आहे आणि ते आवश्यक आहे. माझी विनंती आपल्या माध्यमातुन ही आहे की सर्वांनी कपडयाचे मास्क वापरले पाहिजे ते डिसपोज होत नाही. ते धुऊन परत वापरता येते त्यामुळे जास्त बायोमेडीकल वेस्ट निर्माण होणार नाही. गाडीमध्ये सुध्दा आपण वेगळया प्रकारे बायोमेडीकल वेस्ट गोळा करुन ते बायोमेडीकल वेस्ट डिसपोज करतो. मी स्वच्छतेच्या बाबतीत सांगितले, जेवणाच्या बाबतीत सांगितले, फॅनच्या संदर्भात सांगितले मागे मे च्या आठवडयामध्ये हिट वाढलेली आहे त्यामुळे तेथे ए.सी. लावा किंवा कुलर लावा. ते पैसे नाही म्हणुन नाही तर एका रुममध्ये मी कुलर लावल्यानंतर नॉर्मल व्हायरल इन्फेक्शन होण्याचे चान्सेस जास्त असते.

ज्यावेळेस तो फ्लो होतो त्यावेळस जर एखादा मानुस शिंकला आणि पहिल्या दिवशी जर तो मानुस निगेटीव्ह असला आणि नंतर जर तो पॉझिटीव्ह आला तर तो शिंकला तर तो शिंकेव्दारे दुस-याकडे जाऊ शकतो म्हणुन ते गाईडलाईन नुसार करता येऊ शकत नाही. हे त्या मागचे मेडीकल कारण आहे. येथे पैसा हा इशु नाही. इशु हा हेल्थ केअरचा आहे. हे सर्व करीत असतांना डेली बेसीसवर चर्चा होतात, दिवसभरात काय घडले, काय काय त्रुटी राहिल्या, कर्मचा-यांमध्ये काही त्रुटी राहिल्या काय, कॉट्रॅक्टमध्ये राहिला काय याचा उहापोह सकाळी होतो आणि संध्याकाळी सुध्दा होतो. माझ्या स्तरावर अधिका-यांसोबत होतो. यामध्ये सदस्यांनी विचारले की डॉ.ख्वाजा आणि अशोक पाटील सोबत चर्चा झाली काय ? तर माझे फोन रेकॉर्ड तपासुन घ्या, त्यांच्याशी या संदर्भात चर्चा झाली काय याच्यावर प्रश्न विचारता सहज विचारले असते तर मी आनंदाने उत्तर दिले असते आणि आताही आनंदाने देतो. वॉर रुम क्रीयेट केली ती १ एप्रिल २०२० रोजी कोरोनाची वॉर रुम ऐस्टॅब्लीश नागपूर महानगरपालिकेमध्ये झाली. १ एप्रिल रोजी पहिली मिटींग रात्री ११.३० वाजेपर्यत चालली त्याच्यामध्ये शेवटचे ७ मिनीटे मी त्याच्यामध्ये बोललो त्याचा व्हीडीयो सर्वांसमोर आहे. त्यातील वाक्य आपण ऐकले असेल, नसेल ऐकले तर मी परत या ठिकाणी सांगतो. प्रयत्न करा, प्रयत्न केला नाही तर कारवाई तुमच्यावर करेल, प्रयत्न फसला, त्याल्या सक्सेस नाही आले फल्युअर आले तर त्याची जबाबदारी माझी हे माझे वर्ड आहे. हे १ एप्रिलचे सांगतो. ज्या दिवशी कोरोना रुम स्थापन केली, त्या दिवशी झोनल मेडीकल ऑफीसर होते माझी पुर्ण मेडीकलची टिम बरोबर होती त्यांच्या बरोबर चर्चा करतांना त्यावेळी म्हटले फेलीवर सगळे माझे आहे. यश तुमचे फक्त प्रयत्न करा ते जर नाही केले तर मी तुमच्यावर कारवाई करेल, ते आजही येथे स्टॅम्प करतो की या करोनामध्ये जर काही फेल्युअर असतील तर आजही पुर्णपणे छातीठोक पणे मी जबाबदारी घेतो.

श्री.धर्मपाल मेश्राम :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ ऑर्डर पॉइंट हे सभागृह सन्माननिय आहे की नाही. त्यांनी म्हटले अनेक जन म्हणजे कोण ? आणि छातीठोकत बोलणे ही पध्दत नाही सभागृहात बोलण्याची.

महापौर :- छातीठोकपणे हे वक्तव्य सभागृहाच्या कामकाजातुन वगळण्यात यावे.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ ऑर्डर मी तुम्हाला वारंवार अशी विनंती करीत आहे. त्यांनी हाय कोर्टाचे उदाहरण सांगुन त्यांनी व्ही.एन.आय.टी आणि आमदार निवासासाचे उदाहरण दिले. अनेक नगरसेवक उत्तर नागपूर मधील बसले आहे. पाचपावली कॉरंटाईन सेंटर हे भर वस्तीच्या मध्ये आहे. तेथे १ मिटरचे पण अंतर नाही त्या बद्यल आयुक्त महोदय बोलले नाही. म्हणुन माझी विनंती आहे आय.सी.एम.आर. च्या गाईडलाईन क्वॉरंटाईन सेंटर निर्माण करण्यासाठी काय होते ते त्यांनी सांगितले नाही. पाचपावली क्वॉरंटाईन सेंटर भरवस्तीमध्ये आहे. आणि आयुक्त महोदय प्रश्नाचे उत्तर देत नाही ते भाषण देत आहे. आम्हाला कुठल्याही शासकीय अधिका-यांचे भाषण नाही मा. सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर पाहिजे.

(बेल)

महापौर :- आपण सर्वांनी बसावे, आयुक्तांनी निवेदन सुरु करावे.

निगम आयुक्त :- सन्माननिय महापौरजी, राधास्वामी सत्संग या ठिकाणी ज्या बेसीकली कोव्हीड – १९ च्या गाईडलाईन्स आल्या तेव्हा कोव्हीड केअर सेंटर, डेडीकेटेड कोव्हीड केअर सेंटर, आणि डेडीकेटेड कोव्हीड हॉस्पीटल अशा तीन स्तराची रचना आहे. सुरुवातील ज्या वेळी कोव्हीडचे रुग्ण आले त्यावेळेस जी.एम.सी. व आय.जी.एम.सी. जे हॉस्पीटल आहे त्याची

आय.सी.यु च्या बेडची कॅपिसीटी जवळ जवळ ९० होती. आणि ते ९० कॅपिसिटी पुरणारी नव्हती म्हणुन प्रथमत: निर्णय घेण्यात आला की जी.एम.सी. आणि आय.जी.एम.सी. येथील कॅपिसिटी वाढविणे गरजेचे आहे त्या हॉस्पीटलमध्ये काम सुरु झाले आणि आज ती कॅपिसिटी आय.सी.यु, व्हेटीलेटर, एच.डी.यु. त्याला आपण हाय डिपेडन्सी युनिट म्हणतो या ठिकाणी ऑक्सीजन अव्हेलेबल असतो असे १२०० बेड दोन्ही हॉस्पीटल मिळुन तयार झाले आहे. त्यामधील १२०० बेडपैकी ४०० हे आय.सी.यु. बेड आहे. बाकीचे हाय डेफीडन्सी युनिट आहे. हे यासाठी तयार केले गेले की, सी.सी.सी, डी.सी.एच.ची, आणि डी.सी.एच. या त्री स्तरीय संरचना एका ठिकाणी असु शकते, मल्टीपल ठिकाणी असु शकते या दृष्टीने विचार करतांना आवश्यक असलेला मॅनपॉवर आणि पर्टीकुलर एक्सपर्टाईज असलेला मॅनपॉवर या कोव्हिडच्या बाबतीत मेडीकल आणि पॅरामेडीकलच्या बाबतीत कमीत कमी सेंटरवर वर करावे असे दिशानिर्देश पण आहे आणि त्या दृष्टीने वेगवेगळया स्तरावर चर्चा करुन तो निर्णय घेण्यात आला आणि हे सर्व होत असतांना पुढचा जो प्रश्न आला की क्वॉरंटाईन सेंटर सी.सी.सी. मध्ये कन्हर्ट करणार आहे आता आपण एम.एल.ए. क्वॉरंटाईन सेंटर सी.सी.सी. मध्ये कन्हर्ट करणार आहे या दोन्ही जवळपास एकाच प्रकारच्या फॅसिलीटी आहे थोडयाफार फरकानी, म्हणुन त्या ठिकाणी करता येते की नाही याचा विचार चालु असतांना त्यामध्ये एक प्रेडीक्शन आले गर्व्हनमेंट ऑफ इंडीयाने आणि गर्व्हनमेंट ऑफ महाराष्ट्राने वेगवेगळया सिटीसाठी वेगवेगळया शहरासाठी प्रेडीक्शन आले त्या प्रेडीक्शननुसार १५ मे ते ३१ मे च्या दरम्यान नागपूर शहरामध्ये जे पीक म्हणजे हायस्ट पॉइंट किती असेल सर्वसाधारणपणे १० दिवस हे पीक डेली बेसीसवर १२०० प्लस केसेस पॉझिटीव्ह येतील १२०० इन टु १० दिवस म्हणजे एका दिवशी १२००० पेशंट पॉझिटीव्ह राहणार होते. हे फक्त नागपूरचे नाही तर ते मुंबईच्या संदर्भात होते. असे शासनाचे पत्र आहे आणि ते प्रेडीक्शननुसार तयारी करण्याचे निर्देश देखील आहे. त्यानुसार मग कोव्हीड हॉस्पीटल जी.एम.सी. आणि आय.जी.एम.सी. पुरणार नाही अपुरे राहणार या दृष्टीकोणातुन विचार करण्यात आला आणि दुसरीकडे आपल्या नागपूर शहरामध्ये असे कोव्हीड हॉस्पीटल कुठे तयार होऊ शकतात. प्रायव्हेट हॉस्पीटल होऊ शकतात काय म्हणुन आपल्याकडे प्रायव्हेट हॉस्पीटल किती आहे. १०० बेडच्या वरचे किती आहे ५० बेडच्या वरचे किती आहे. याची माहिती आपण घेतली त्या ठिकाणी किती आय.सी.यु. बेड आहे. त्या ठिकाणी व्हेंटीलेटर किती आहे. ही माहिती आपण घेतली मला जेवढे आठवते की २५ किंवा २६ एप्रिलच्या आसपास मी एक ऑर्डर पास केली होती अॅपेडमीक अॅक्ट अंतर्गत प्रायव्हेट हॉस्पीटल संदर्भात जेथे पर्टीकुलर १०० बेड च्या वरची कॅपिसिटी होती तर १०० बेडच्या वरची कॅपिसिटी सर्वसाधारणपणे १३०० किंवा २६११ आहे. त्यामध्ये ९०० च्या आसपास आय.सी.यु. बेड किंवा ऑक्सीजन अशाप्रकारचे आहे. ज्या हॉस्पीटलची परिस्थिती ५० बेडच्या वर होती ती जवळपास १३०० च्या आसपास होती अशी एकुण २६०० त्यामध्ये सर्वसाधारण पणे आय.सी.यु आणि ऑक्सीजनची कॅपिसिटी जवळपास १३०० ते १४०० च्या आसपास होती म्हणुन ती ऑर्डर मी २५ ते २६ एप्रिलला (ऑर्डरचे वाचन केले.) ही ऑर्डर महाराष्ट्र शासनाची ऑर्डर नव्हती. ती ऑर्डर महाराष्ट्र शासनाची २० मे मध्ये आली जेव्हा मुंबईमध्ये जास्त कोरोनाचा संसर्ग झाला त्यावेळेस प्रायव्हेट हॉस्पीटलच्या संदर्भात अॅपेडमीक अॅक्ट नुसार ऑर्डर काढली होती. त्यामध्ये ते कोर्टामध्ये सुध्दा गेले आणि गरज पडली तर गव्हर्नमेंटची फॅसिलीटी ते वापरणार आहे. दुसरा स्तर जो डी.सी.एच.सी. म्हणजे प्रायव्हेट हॉस्पीटल आणि मेडीकल कॉलेज जे आहे आहे त्या बाबतीत होता. तिसरा स्तर जो होता सी.सी.सी. (कोव्हीड केअर सेंटर) कोव्हीड

केअर सेंटरमध्ये कोणते व्यक्ती ठेवायचे होते की ज्यांचे सिमटन्स पॉझिटीव्ह होते आता हे केव्हा करायचे होते त्या वेळेस आपल्याकडे ही फॅसिलीटी उपलब्ध नसेल आणि म्हणुन ही जर १२००० चा पिक आला तर त्याच्यामध्ये माईल सिमटेमॅटीक किंवा असीमटेमॅटीक किती असतील तर असीमटेमॅटीक सर्वसाधारणपणे जे प्रेडीक्शन आहे ते ६००० असतील समजा १०० आले तर ६० टक्के लोक असीमटेमॅटीक असतील म्हणुन १२००० मधले ६० परसेंट बघितले तर सर्वसाधारणपणे ६ ते ७ हजारापर्यत होतात म्हणुन ती फॅसिलीटी तयार करण्याकरीता कोव्हीड केअर सेंटर उभारण्याचे ठरले. माझ्या आधी जिल्हाधिकारी महोदयांनी राधा स्वामी सत्संगाला विनंती केली होती त्यांनी ती  रीफुज केली होती. ते रेकॉर्डवर आहे. जेव्हा क्वॉरंटाईन सेंटरची जबाबदारी महानगरपालिकेकडे आलो त्यावेळी मी त्या ठिकाणी व्हीजीट केली त्यानंतर त्यांना रिक्वेस्ट केली त्यांनी मला सांगितले की आमचे मुंबईचे जे हेड ऑफीस आहे त्यांच्याशी बोला काही इशु असतील तर मला सांगा मी  त्यांच्याशी बोलतो त्यांनी २४ तासाच्या आत मान्य केले आणि काय काय पाहिजे त्या दृष्टीने तेथील सर्व फॅसिलीटी इलेक्ट्रीक फॅन जेथे नव्हते तेथे फॅन बसविले, लाईटची  व्यवस्था जेथे ॲक्टीव्ह करायची होती ती केली. आजुबाजुला मॅटींग करुन दिल्या जे काही गोष्टी असेल त्या करुन दिल्या. ते करीत असतांना आपल्याला फक्त बेड बकेटचे टेन्डर काढुन त्या दृष्टीने आपण तयारी केली. ५००० बेडचे सी.सी.सी. सेंटर आपण रेडीनेस सेंटर केले आणि ५०० बेड त्या ठिकाणी टाकले होते. काही सदस्यांनी नंबर जास्त आहे ७०० पर्यत नंबर गेले  होते कारण तेथे कंम्पार्टमेंट होते जेव्हा ससपेक्ट केसेस आल्यानंतर एका कंम्पार्टमेंट मध्ये ठेवायचे त्यामध्ये लेडीज आणि जेन्ट ते केल्यानंतर त्याची टेस्टींग होईल जे पॉझीटीव्ह होतील ते पॉझीटीव्ह सेक्शनला जातील तर ते बेड कमी होईल आणि जे निगेटीव्ह असतील तेथुन तो नंबर जास्त दिसत आहे. त्यावरती हा प्रश्न विचारला होता की १५ मिनीट दुर टायलेटला जावे लागते आपण तेथे जाऊन बघा बेडच्या बाजुला टायलेट बाथरुम आहे. कारण प्रत्येक कॉटजवळ आपण टायलेट बाथरुम देऊ शकत नाही.  जे हयुमनली आवश्यक आहे आणि जे आपण करु शकतो त्या दृष्टीने कोव्हीड केअर सेंटर  त्रीस्तरीय म्हणजे डिसीएचसी प्रायव्हेट हॉस्पीटलचा केले आहे.  हे सर्व होत असतांना प्रायव्हेट हॉस्पीटल जरी होत असेल आणि तेथील आय.सी.यु. बेडची जरी संख्या बघितली तरी अलॉंग विथ जे मेडीकल कॉलेज जे प्रायव्हेट आहे. त्यांना सुध्दा आम्ही रिक्वेस्ट केली त्यांचे पण आय.सी.यु. बेड सांगितले होते त्यांचे सुध्दा काही फायननशियल इशु होत्या त्यांना पैसा कुठुन भेटणार आहे. गव्हर्नमेंटच्या गाईडलाईन नुसार आपण प्रायव्हेट मध्ये  खर्च करु शकत नाही. त्यांनी स्वत: करावे असे म्हटले आणि ज्या ठिकाणी आयुष्यमान भारत योजना असेल, महात्मा फुले योजना असेल त्याच्यातुन देखील पैसा घेण्याचे त्यांना सांगितले होते. त्यामध्ये आम्हाला ऑक्सीजनची जे सर्वसाधारणपणे ग्रामीन आणि अर्बनच्या ज्या प्रेडीक्शननुसार म्हणजे अर्बनसाठी आम्हाला २० टक्के जे ऑक्सीजनेट बेड लागतात ते २० टक्केनुसार सर्वसाधारणपणे ३६०० च्या आसपास बेड अपेक्षित होते. त्यामध्ये मी सांगितले की १३०० बेड आपले प्रायव्हेट हॉस्पीटलचे होते. तरी सुध्दा आपल्याकडे बेडची कमतरता होती म्हणुन मेडीकल कॉलेज त्यांना सांगितले त्यांनी कॅपिसीटी चालु केली होती त्या तुन आपल्याला ४०० ते ५०० बेड भेटणार होते उर्वरीत ४०० ते ५०० बेडची गॅप कमी करण्याच्या दृष्टीकोणातुन ते ऑक्सीजन बेड कुठे तयार करु शकतो त्या दृष्टीकोणातुन ऑक्सीजनचे बेड ५ हॉस्पीटल मिळुन ते ४५० ची कॅपिसिटी आहे ऑक्सीजनची पाईप लाईन टाकावी लागेल त्याची प्रोसेस फॉलो केली आहे. त्या अनुषंगाने त्रिस्तरीय संरचना केली आहे. क्वॉरंटाईन सेंटर एका बाजुला, सी.सी.सी,

डी.सी.एच.सी, आणि डिसी.एच. यामध्ये किती पेशंट येईल, किती दिवसापर्यंत राहील हे कोणालाही माहिती नाही. हा व्हायरस आर.एन.ए. व्हायरस आहे डिएन.ए. व्हायरस नाही. या अनुषंगाने ज्या काही गाईडलाईन आहे आणि जो काही रिसर्च आहे त्याच्या आधारावर मी बोलत आहे. दिल्लीमध्ये जो व्हायरस आहे तो मुंबईमध्ये असु शकतो असे नाही. आणि मुंबईमध्ये जो व्हायरस आहे तो नागपूरमध्ये असु शकतो असे नाही आणि मग त्यावर औषधी यायला किती वेळ लागेल आजच्या तारखेला कोणीही सांगु शकत नाही. त्याच्यावर प्रयत्न झालेले आहे आणि लवकरात लवकर उत्तम होईल परंतु जो पर्यत हे होत नाही तो पर्यत किती पेशंटला हॉस्पीटलची गरज लागेल हे माहिती नाही. या दृष्टीकोणातुन शासनाने जे काही सायंटीफीक ॲर्नॅलिसीस केले आहे आणि ॲनिलीसीस आहे एम.ओ.एच.डब्लु. चे, गव्हर्नमेंट ऑफ इंडीयाचे, गर्व्हनमेंट ऑफ महाराष्ट्राचे, हे डिस्ट्रीक लेव्हलवर ॲनॅलाईज केलेले नाही. हा जो काही डाटा जे काही पॉझिटीव्ह केसेस आले त्याच्यावर गव्हर्नमेंट ऑफ इंडीयाचे आणि गर्व्हनमेंट ऑफ महाराष्ट्राचे ॲनिलीसीस आहे ते आम्हाला ऑफीशीअली पाठविले आहे त्याची कॉपी आहेत ते देण्यात येईल. आता हे करीत असतांना हे प्रक्रीया अजुन किती दिवस चालेल हे सांगु शकत नाही.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ ऑर्डर, पाच हॉस्पीटलमध्ये जी काही प्रोसेस मा.आयुक्तांच्या किंवा प्रशासनाच्या माध्यमातून झाली ती पुर्ण योग्य आहे काय ?

निगम आयुक्त :- सन्माननिय महापौरजी, त्याचे उत्तर होय आहे. त्यावर मी डिटेल बोलतो. हे होत असतांना हे जो स्प्रेड आहे याच्यामध्ये काही हॉटस्पॉट होते. सुरुवातीला आपण रेड झोन बघितले, येलो झोन, ग्रीन झोन असे क्लासिफीकेशन होते. नंतर फक्त रेड आणि ग्रीन झाले. त्यानंतर कंटोनमेंट झोन आणि नॉन कंटोनमेंट झोन असे झाले. यानंतर पॉलिसीनुसार चेंज होत गेल्या, यामध्ये कंन्सेप्ट आहे हॉटस्पॉट आणि नॉन हॉटस्पॉट, आता हॉटस्पॉट म्हणजे ज्या ठिकाणी मल्टीपल केसेस आहे पर्टीकुलर पेरीमीटर मध्ये जास्त असतात त्यांना हॉटस्पॉट असे म्हणतात आणि जेथे पाच पेक्षा कमी असते त्याला हॉटस्पॉट म्हटल्या जात नाही. याच्यामध्ये तीन बाबी आहे त्यामध्ये सुपर स्प्रेडर, स्प्रेडर, सुपर स्प्रेडर म्हणजे कोण एक व्यक्ती जेव्हा १० पेक्षा जास्त व्यक्तींना बाधीत करीत असेल तर त्याला सुपर स्प्रेडर म्हणतात स्प्रेडर व्यक्ती म्हणजे कोण तर ५ ते १० व्यक्तीना जे बधीत करीत असेल ते आणि त्याच्या खाली जो असतो तो इनफेक्टीव्ह पेशंट असतो. याच्यामध्ये एक कंसेप्ट आहो इंडेक्स पेशंट आहे. ज्याच्या मुळे पॉझिटीव्ह केस होते किंवा स्प्रेड होतो त्याला इंडेक्स केस म्हणतात ? आता ही इंडेक्स केस आली कुठुन याच्यावर येथे डिबेट झाली. या हॉटस्पॉटच्या अनुषंगाने मोमीनपूरा व सतरंजीपूरा इंडेक्स केसबद्यल बोलत आहे. पहिल्या ४ केसेस आणि ५ वी केस २५ तारखेला दिल्ली रिटर्न होती. आपल्या शहरातील व्यक्ती दिल्ली मध्ये गेले १६ तारखेला तेथे काम केल्यानंतर संध्याकाळी १७ तारखेला बसले आणि १८ तारखेला सकाळी नागपूर मध्ये आले त्याचे घर आहे घराच्या बाजुला दुकान आहे ते चालु केले, हे होत असतांना त्याचवेळी ११ मार्चपासुन आपण प्रायमरली डोअर टु डोअर सर्व्हे चालु केला होता. आता डोअर टु डोअर सर्व्हेमध्ये २१ तारखेला तो व्यक्ती घरी गेला त्या व्यक्तीला ताप आला होता जास्त ताप नसेल तर त्या व्यक्तीला होम आयसोलेशन सांगितले होते. त्या व्यक्तीचा सहायक दिल्लीला गेला होता. तो २१ तारखेला गेला २२ ला गेला २३ ला जास्त त्रास झाल्यामुळे क्लीनिक मध्ये गेला त्यानी आपल्या स्टाफला व प्रायव्हेट हॉस्पीटलच्या डॉक्टरला सांगितले नाही. आणि २५ तारखेला ताप कमी होत नसल्यामुळे तो स्वत: जी.एम.सी. आणि आय.जी.एम.सी. ला ॲडमिट झाले. हे केल्यानंतर मला ही

प्रश्न पडला होता की सर्व्हे केल्यानंतर हे कसे झाले. होम आयसोलेशन न पाळल्यामुळे आणि त्या पेंशटला सांगितले होते की काहीही जरी वाटले तरी कंट्रोल रुमला फोन करा ते केले नाही त्याचा कॉटॅक्ट ट्रेसिंग सुरु झाले, त्यांच्या सोबत जे व्यक्ती होते त्यांचे क्वॉटॅक्ट ट्रेसिंग सुरु झाले. एकंदर या केसमध्ये १२ व्यक्ती पॉझिटीव्ह सापडले त्याचे जे असिस्टंट आहे त्याची पुर्ण फॅमिली आली होती. ते बरे होऊन घरी गेले, यातील काही लोकांना ३९ दिवस झाले आहे हे करीत असतांना दुसरा व्यक्ती जो दिल्ली रिटर्न होता त्यांना आपण कॉरंटाईन केले त्याच्या रिपोर्ट पॉझिटीव्ह आला नाही. कॉरंटाईन करणे, कंटेनमेंट करणे हे चालु असतांना दिल्ली सेंट्रलची गर्व्हनमेंट ऑफ इंडीया मिनीस्ट्री ऑफ होम अफेअर्स आणि गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र ही ज्या ठिकाणी एका कार्यक्रमासाठी भारतामधुन व्यक्ती गेले होते त्या ठिकाणी कोणी व्यक्ती पॉझिटीव्ह झाल्यापासुन त्यांना आयडेन्टीफाय करणे टेस्टींग करणे गरजेचे होते मिनीस्ट्री ऑफ होम ॲफेअर्स, गर्व्हनमेंट ऑफ इंडिया दिल्ली सेंट्रल आपण त्याला मरकज पण म्हणतो. त्या ठिकाणाहुन माहिती आल्यानंतर नागपूर शहरातील जवळपास ४०० प्लस व्यक्तीची लिस्ट नागपूरला आली होती. त्या व्यक्तीचे व्हेरीफीकेशन करणे ते शहरातील असेल किंवा दुस-या जिल्हातील असेल किंवा ग्रामीणचे असेल तर त्याची माहिती करणे यापैकी २५१ व्यक्ती शहरामध्ये आले होते त्यांना आपण इस्टीटयुशनल क्वॉरंटाईन केले. २५ तारखेला जेव्हा पाचवा पेशंट आला तेव्हा आपण इस्टीटयुशनल क्वॉरंटाईन करण्याचा निर्णय घेतला हे त्यामागचे कारण होते. टेस्ट घेतल्यानंतर जी माहिती समोर आली ती सर्वासमोर आहे. आणि २५१ बरोबर जी माहिती शासनाकडुन आली होती त्यांचे कॉटॅक्ट ट्रेसिंग करीत असतांना एकुण २८२ लोक क्वॉरंटाईन केले होते. त्यांच्या टेस्ट केल्या होत्या. जे ५२ लोक आहे जे मस्जीदमध्ये होते त्यांना सुध्दा क्वॉरंटाईन केले यामधुन त्याची टेस्ट करतो त्यामधुन जे पॉझिटीव्ह येतात त्यांना हॉस्पीटलायझेशन करणे आणि बाकीचे जे आहे त्यांना क्वॉरंटाईन केले. तसेच ५ ऐप्रिलला जी डेथ झाली सतरंजीपूरा येथील त्याची हिस्ट्री घेतली. २५ तारखेला जेव्हा इन्स्टीटयुशनल क्वॉरंटाईन चालु केले होते त्याच्या अगोदर जे होम क्वॉरंटाईन होते त्यामध्ये सर्व्हे करीत असतांना तीन प्रश्न आपण विचारले होते. ते शासनाने सांगितले नव्हते. तो आपल्या स्तरावर निर्णय घेतला होता. त्या माध्यमातुन आपण लोकांपर्यत पोहचु त्यांना दोन प्रश्न आपण विचारु कोव्हीडच्या संदर्भात आपल्या टिममार्फेत घरापर्यत कोव्हीड संदर्भात माहिती जाईल,आणि दुसरे कोव्हीडच्या संदर्भात आपल्यामध्ये काही सिमटन्स आहे काय ? त्या अनुषंगाने फॉरमॅट तयार करण्यात आला त्यामध्ये त्यामध्ये त्याचे वय काय आहे. नाव काय आहे. आजारी आहेत काय ? ताप आहे काय ? कफ आहे काय ? श्वास घेण्यास त्रास होत आहे काय? हे तीन प्रश्न विचारले गेले त्याची माहिती आली त्या आधारावर आपण होम क्वॉरंटाईन, इन्स्टीटयुशनल क्वॉरंटाईन गरज पडल्यास दवाखान्यामध्ये सुध्दा आयसोलेट करण्याचा निर्णय घेतला परंतु जशी ही पाचवी केस आली त्या वेळेस आम्ही विचार केला यामध्ये काही चेंज करण्याची आवश्यकता आहे. त्या अनुषंगाने जे हायपर टेंशनचा पेशंट असेल किंवा बी.पी. चा पेशंट असेल, ते सुध्दा ॲड करत गेलो त्यामुळे २६ ते २७ ताराखेच्या मध्ये परत नव्याने जेव्हा सर्व्हे चालु केले त्याला दुसरा कोणता आजार आहे काय ही माहिती आपल्याकडे असेल तर वेळेवर हाय रिस्क पेशंट आपण आयडेन्टीफाय केले त्या दृष्टीकोणातुन होम क्वॉरंटाईन केले लो रिस्क आणि हाय रिस्क पेशंट आयडन्टीफाय करण्याच्या माध्यमातून २६ किंवा २७ तारखेपासून सर्व्हे चालु केले. ही जी सतरंजीपूरा येथील पहिली डेथ होती यांच्याकडे २७ तारखेला आपली टिम गेली होती. २७ तारखेला जेव्हा त्यांना विचारणा केली तेव्हा कोणाला तापही नव्हता, खोकला नव्हता असे त्यांनी

स्वत:ही सांगितले आणि त्यांच्या मुलांनीही सांगितले, आता याच्यावर प्रश्न विचारले की हे सायंटीफीक कसे, सायंटीफीक याच्यासाठी आहे कोव्हीडच्या दृष्टीकोणातुन तीनच लक्षणे आहे. तीन पैकी दोन म्हणजे ताप आणि खोकला किंवा श्वास घेण्यास त्रास होत असेल तर आपण त्याला ससपेक्ट करुन घेतो हा सर्व्हे आहे. चेकींग नाही. चेकींग करु शकत नाही. कारण चेकींग करण्याचे वेगळे मापदंड आहे. या सर्व्हेमध्ये हे प्रश्न विचारले कोव्हीडच्या माध्यमातून त्यानंतर मी २७ तारखेला होम ऑरबिट कंडीशन बरोबर बाकीच्या कंडीशन आहे ते तयार केले हे तयार केल्यावर ही २७ मार्चला केले होते. तेथे जी टिम गेली होती त्या व्यक्तीला जी लक्षणे होती त्या व्यक्तीची जी काही हिस्ट्री सांगितल्यानंतर १ एप्रिलला ताप आला होता. २ किंवा ३ एप्रिलला क्लीनिक मध्ये गेला. ४ ऐप्रिलला रात्री १२ वाजेच्या आसपास आय.जी.एम.सी. ला ॲडमीट झाला आणि दुर्देवाने ५ तारखेला सायंकाळी ५ वाजता त्यांचा देहांत झाला आता ट्रीटमेंट तेथे केली काय ? तर होय, तर डेथ का झाली तर त्यांना टिबी. होता ते हाय रिस्क पेशंट होते. त्याचा रिपोर्ट लेट आला त्याच्यामुळे त्याच्यावर योग्य प्रकारची ट्रिटमेंट करता आली नाही. त्यांच्याकडे टिम पोहचली होती. ज्या वेळेस त्यांचा डेथ होते तेव्हा इनफेक्शन हाय लोडेड असते त्यामुळे जास्त पॉझिटीव्हली इनफेक्शन होऊ शकते. त्यामुळे ज्यावेळी डेथ झाली त्यावेळेस स्वॅब टेस्ट घेतली होती त्याचा रिझल्ट आला. डेथबॉडीच्या गाईडलाईन काय आहे १५ मार्च २०२० गर्व्हनमेंट ऑफ इंडीया व आय.सी.एम.आर. ने गाईड लाईन दिलेल्या आहे. डेथबॉडीवर कशा प्रकारे प्रक्रीया करायची त्यानुसार आपण करीत आहे. आणि हे होत असतांना जरी आपण नातेवाईकांना भेटु दिले नाही. रात्रीतुन काय झाले हे माहिती नाही. जशी ती बॉडी पॉझीटीव्ह आली तेव्हा पासुन आपण पुढची प्रक्रीया चालु केली. आणि मग कॉटॅक्ट ट्रेसिंग पासुन सर्व कामे चालु केले. यामध्ये काही सन्माननिय सदस्यांनी प्रश्न विचारला की हा इंडेक्स पर्सन नाही आहे काय ? तर त्याचे उत्तर होय आहे. १५ ते २० दिवस इंडेक्स पर्सन कोण आहे हे माहित नाही. परंतु जेव्हा अशा केसेस वाढत गेल्या त्यावेळेस लक्षात आले की त्याच्या फॅमिलीमध्ये जे जे संपर्कात आले आहे त्यांना प्रत्येकाला इनफेक्शन आहे आणि ते कुठुन आले तर ते तर मग ज्या वेळेस जे नातेवाईक मकरज वरुन त्यातील काही पॉझिटीव्ह आले, त्यामध्ये त्यांच्या जवाईचा मित्र एका बाजुनी आणि दुस-या बाजुने भावाचा जो जवाई आहे तो बाहेर जाउन आल्याचे त्यांनी स्वत: सांगितले, तो दिल्लीला पण जाऊन आला होता तसेच तो रायबरेलीला सुध्दा जाऊन आला होता. त्या दृष्टीकोणातुन त्याला इनफेक्शन झाले होते. आता हा ऐरिया हॉटस्पॉट का झाला, कारण तेथे इन्फेक्शन वाढल्यामुळे स्प्रेड झाले आणि याला थांबविण्याचा एक प्रकार आहे की चेन ब्रेक करणे आणि जर चेन ब्रेक करायची असेल तर आपल्याला पर्सन टु पर्सन कॉटॅक्ट कट ऑफ करावा लागेल, म्हणुन कॉटॅक्ट ट्रेसिंग करणे, म्हणजे अर्ली कॉटॅक्ट ट्रेसिंग अर्ली आयडेन्टीफीकेशन, अर्ली आयसोलेशन, अर्ली ट्रीटमेंट करणे आवश्यक आहे. परंतु जेवढे लेट होईल तेवढे स्प्रेड होण्याचे चान्सेस वाढते. आणि म्हणुन जितक्या लवकर कॉटॅक्ट ट्रेसिंग होईल तितक्या लवकर करणे आवश्यक होते आणि ती सिस्टीम आपण बसविली होती त्या दृष्टीने आपण काम केले जसे या बाबतीत झाले तसेच मोमीनपूराच्या बाबतीत सुध्दा झाले. आता मोमीनपूराच्या नावाच्या बाबतीत ऑब्जेक्शन घेतले. मोमीनपुरामध्ये खुप जास्त ऐरिया आहे हे मलाही माहिती नव्हते भानखेडा पासुन तर वेगवेगळया झोपडपट्टी पर्यतचा ऐरिया आहे. हे हॉटस्पॉट दोन्ही ऐरिया झाला. याच्यामध्ये कोणालाही बदनाम करण्याचा प्रश्न नाही. कंटोनमेंट ऐरियामध्ये कोणी आत जाऊ नये आणि बाहेर निघु नये याचा परपज फक्त ऐवढाच होता की स्प्रेड होऊ नये, ही चेन ब्रेक करावी, या दृष्टीने प्रयत्न

केला आहे. त्यामुळे जवळ जवळ दीड महिना या दोन झोनच्या बाहेर आपल्याला केसेस सापडत नव्हत्या. आणि आपल्याला चांगला रिझल्ट मिळाला परंतु लॉकडाऊन संपल्यानंतर ते आता सर्व शहरामध्ये पसरत आहे. आता ॲक्टीव्ह ९६ कंटेनमेंट झोन हाते त्यावेळेस फक्त दोन ते तिन कंटेनमेंट झोन होते.गाईडलाईनच्या विपरीत आपण काहीही केले नाही. त्याच्यामुळे हे करीत असतांना हॉटस्पॉट कमी करायचा असेल तर त्याला आयसोलेट करणे, आयसोलेट केल्यानंतर त्याला ट्रीटमेंट करणे आणि ट्रिटमेंट करुन त्याला निगेटीव्ह करणे त्या ऐरियामध्ये कोणाला कोरोना होऊ नये म्हणुन २८ दिवस कंटोनमेंट झोन ठेवणे त्याच्यामध्ये १४ दिवस जो डोअर टु डोअर सर्व्हे आहे तो करणे, त्याच्यातुन जेवढे पेशंट सिमटेमॅटीक असेल त्यांना योग्य ती ट्रीटमेंट करणे हे त्याच्या मागची पॉलीसी आहे आणि तीच पॉलीसी आतापर्यत पाळत आहे आणि त्या दृष्टीकोणातुन काम चालु आहे. आता हे काम कोणी केले. टीम ने, मेडीकलची टिम मेडीकलचे काम करीत होते, सिव्हील साईडची जी टिम आहे ती त्या दृष्टीकोणातुन असिस्टंट कमीश्नरच्या माध्यमातून काम करीत होते. हे काम करीत असतांना आय.सी.एम.आर. च्या गाईड लाईन, गव्हर्नमेंट ऑफ इंडीयाच्या गाईडलाईन, गर्व्हनमेंट ऑफ महाराष्ट्र यांच्या सुचनांचे आपण तंतोतंत पालन करीत होतो. आणि हे करीत असतांना लॉकडाऊनचे जे काही नियम आहे पाहिले लॉकडॉन असेल, दुसरे लॉकडॉऊन असेल, तिसरे लॉकडाऊन असेल किंवा आताचे मिशन बिगीन अगेन असेल त्यामध्ये शासनाच्या गाईडलाईनप्रमाणे काम करतो. येथे हा प्रश्न देखील विचारला गेला शासनानी दारु बंदीच्या संदर्भात दारु ओपन करण्याचा निर्णय घेतला असतांना मी शासनाच्या विरुध्द निर्णय घेतला. माझा कंन्सेप्ट ऐवढाच होता दारुचे दुकान ओपन केल्यानंतर तेथे गर्दी होऊ शकते. तेथे गर्दी झाल्यामुळे कारोना स्प्रेड होऊ शकतो हे माझे ऑब्झरवेशन होते म्हणुन मी तो स्टॅन्ड घेतला. त्या कंडीशन मध्ये कडाडुन टिका झाली. कडाडुन टिका झाल्यानंतर दुस-या दिवशी अनेक जिल्हयामध्ये तिच परिस्थिती आली त्या नंतर अनेक जिल्हयाच्या निर्णय रिव्हर्स केला. आणि त्यानंतर मग होम डिलीव्हरीचे आदेश आले ते आपण पाळले आहे. त्याच्यानंतर हा पण प्रश्न आला की, दारुला परमीशन दिली पण चहाच्या टप-याला नाही. होम डिलीव्हरी केली म्हणजे गर्दी होणार नाही हे त्या मागचे कारण होते. चहाच्या टपरीच्या ठिकाणी गर्दी होऊ शकते, आणि तेथुन स्प्रेड होऊ शकतो. हे त्याच्या मागची कारणमिमांसा होती. लॉकडॉऊन ओपन करीत असतांना मिशन बिगीन अगेन करीत असतांना स्टेप बाय स्टेप पुढे जाणे अत्यंत आवश्यक आहे. त्या दृष्टीने शासन सगळया स्तरावर विचार करीत आहे. तहसिल लेव्हलला असेल, डिस्ट्रीक लेव्हलला असेल, स्टेट लेव्हलला असेल, कारपोरेशन लेव्हल असेल याचा विचार घेतला जातात यांचे इनपुट घेतले जातात आणि मुख्यमंत्री महोदय आठवडयातुन एक दिवस मुख्यत: रवीवारच्या दिवशी ४ ते ५ तास व्ही.सी. व्दारे मुख्यमंत्री महोदयांपासुन तर सर्व सक्रेटरी पासुन सर्व डिस्ट्रीक कलेक्टर, सर्व महानगरपालिका आयुक्त, सी.पी. असायचे त्यामध्ये चर्चा व्हायची आणि त्यामध्ये निर्देश दयायचे. ज्या वेळेस मिशन बिगीन अगेन सुरु झाले त्यावेळेस शहरातील पेशंटची संख्या ४०० पेक्षा कमी होती. आणि आज ती जवळपास ११२७ च्या जवळपास केसेस आहे. लॉकडाऊन ओपन होऊन सर्वसाधारणपणे १ महिना व्हायला लागला आहे. १ जुनच्या आसपास मिशन बिगीन अगेन सुरु झाले. आज २५ तारीख आहे. या २५ दिवसामध्ये जवळजवळ ३ पट केसेस वाढलेल्या आहे. याच्यामध्ये अनेक कारण आहे. इनमायग्रेशन असेल, आउटमायग्रेशन असेल, कंटेनमेंटच्या बाबतीत इशु असतील, याच्यामध्ये अनेक कारणे आहे. एकच समाधानाची बाब यामध्ये आहे की डेथ रेट आपला कमी आहे. आम्हाला अपेक्षित होते की एकही डेथ होऊ नये.

आमचे प्रयत्न देखील त्या दृष्टीकोणातून होते. परंतु ज्या केसेस लेट आल्या जर व्हेंटीलेटरवर गेलो तर व्हेंटीलेटरवरुन वापस येण्याचे चान्सेस खुप कमी आहे. बाकी शहरांची किंवा जिल्हयाची आकडेवारी मी येथे देत नाही. मी फक्त आपल्या आकडेवारी बद्यल बोलतो. हे करीत असतांना ज्या काही कार्यवाही आपण केल्यात ही कारवाई वेळेत होणे गरजेचे आहे. याच्या काही कॉम्पीटंट ऑथिरीटी ठरविलेल्या आहे. त्या नुसार आपण डिसेंट्रलाईज केलेले आहे आणि म्हणुन दरोरोज सकाळी मी स्वत: अनेक मा.सदस्यांनी प्रश्न विचारले की कंटोनमेंट झोनमध्ये किंवा शहरात फिरले काय ? दरारोज सकाळी ८ ते ११.३० या दरम्यान तीनचे लॉकडाऊन संपेपर्यत मी स्वत: शहरातील वेगवेगळया भागात दरोरोज मी फिरत होतो. त्याचे कारणच असे होते की ग्राउंडची परिस्थिती काय आहे. लॉकडाऊनचे व्यवस्थित पालन होते की नाही होत. लोकांची गर्दी होते आहे काय ? याच्यामध्ये सोशल डिस्टंसिंग पाळले जात आहे काय ? या सर्व गोष्टी स्वत: बघणे, टिममार्फत तेथे जाणे आणि त्यानंतर मग ११.३० किंवा १२.०० वाजता ऑफीसमध्ये गेल्यानंतर पुढच्या दिवसभरात किंवा रात्रभरात काय घडले, किती पेशंट आले, किती आयसोलेट केले, किती ट्रीट केले त्याच्यावर दोन ते अडीच तास मंथन मेडीकल टिम बरोबर मग आवश्यक त्या सूचना त्याच्यानंतर सिव्हील सप्लायच्या बाबतीत आढावा त्यानंतर त्यांना सूचना त्यानंतर मग मेडीकल टिम बरोबर चर्चा त्यानंतर रात्री वॉररुम मध्ये प्लॅनिंग केले. त्यामध्ये आवश्यक निर्णय कसा घेतला, स्ट्रॅटीजी काय असणार, रिसोर्सेस काय असणार, हे सर्व फायनल वॉर रुम मध्ये होत होते हे करीत असतांना डीव्हीजनल कमीश्नरला दरोरोज किंवा अलटरनेट डे ला सूचना असतील, पालकमंत्री महोदयांच्या सूचना असतील, चिफ सेक्रेटरीच्या असतील, कॅबिनेट सेक्रेटरीच्या असतील, यांनी स्वत: दोन ते तिन मिटींग घेतल्या आहे. या गाईडलाईन आणि हे काम करीत असतांना तारेवरची कसरत होत होती आणि बेस्ट पॉसिबल मॅनरने या संकटावर मात करण्याचा प्रयत्न केला आणि त्या दृष्टीकोणातुन आपण काम करीत आहे. या लॉकडाऊन मध्ये कॉरंटाईन सेंटर ज्या ज्या ठिकाणी निवडले ते निवडतांना तो फक्त तुकाराम मुंढेचा निर्णय नाही आहे. महानगरपालिकेतील अधिकारी आणि कर्मचारी तर आहेतच त्याचबरोबर डिव्हीजनल कमीश्नर, जिल्हाधिकारी, सी.पी. त्याच्या बरोबरही चर्चा झाली आहे. का झालेली आहे, व्हॉट इझ द बेस्ट पॉसिबल मॅनर ते कोणते सेंटर असु शकतात. प्रथमत: आपण पब्लीक इन्स्टीटयुशन, होस्टेल हे घेतले त्यानंतर प्रायव्हेट बिल्डींग घेतल्या त्यामध्ये हे सांगितले होते की कोर्टाने आदेश दिले, कृपया आपण कोर्टाचे आदेश वाचावे, कोर्टाच्या आदेशामध्ये असे कुठेही म्हटले नाही की ते देऊ नका. कोर्टाच्या आदेशामध्ये ऐवढेच म्हटले आहे की जेवढे आवश्यक आहे डिझास्टर मॅनेजमेंट नुसार अधिकार आहे त्यांना दयावे लागेल, कॉम्पनसेशनच्या संदर्भात ते नंतर बघु हे म्हटले आहे हे का आवश्यक होते कारण की आपल्याला जर ससपेक्ट केसेस कॉरंटाईन सेंटरमध्ये ठेवायचे असतील तर तेथे मॅनपॉवर लागणार आहे. बेस्ट पॉसिबल मॅनर लागणार आहे. प्रेडीक्शननुसार जर आले असते तर कदाचित आपल्याला २०,००० पर्यत लोकसंख्या न्यावी लागली असती. त्या ठिकाणी आवश्यक असलेल्या इन्स्टीटयुटमध्ये तयारी करावी लागली असती. त्यामुळे जे जे आपण क्वॉरंटाईन सेंटर आपण केले ते सर्व त्या कमेटीमध्ये निर्णय करुन चर्चा करुन घेतलेले आहे. त्याच्यावर विरोधीही झाला आणि डी.सी.एच.सी. उभारायला सुध्दा विरोध झाला रेकॉर्ड आहे. सन्माननिय सदस्यांनी पत्र सुध्दा दिले आहे. या ठिकाणी नको, ते चुकीचे आहे. हे सर्व निवडतांना आम्ही गाईडलाईनचा विचार केला आहे. आणि गाईडलाईनचा विचार का केला तर शहरातील पेशंट शहराच्या बाहेर जाऊ शकत नाही. शहरातच राहणार, ते एका वार्डातुन दुस-या

वार्डात जाऊ शकतील, आपल्याला शहर म्हणुन बघावे लागणार आहे. ग्रामीणचा विचार करावा लागणार आहे. जेथे मेडीकल गर्व्हनमेंट कॉलेज नाही आहे तेथील पेशंट आता येथे अमरावती, अकोलाचे पेशंट येत आहे. म्हणुन हा स्टॅन्ड आपण घेऊ शकत नाही. म्हणुन कॉरंटाईन सेंटर माझ्या प्रभागात नको, किंवा डिसी.एच.सी. माझ्याकडे नको, हा अप्रोच चालणार नाही म्हणुन त्या दृष्टीकोणातून निवड करतांना ती योग्य प्रकारे निवड केली आहे आणि त्या दृष्टीने आम्ही काम करीत आहे. आता हे करीत असतांना या मध्ये एक सर्वांचा प्रामुख्याने इशु आहे की मी भेटत नाही. मी फोन उचलत नाही. आमच्या फाईल्स बंद आहे. कामे पुर्णपणे बंद आहे. आपण जेव्हा मला १०६ सदस्य भेटायला आलात तेव्हा बराच वेळ चर्चा झालेली होती. आणि त्या वेळेस असे म्हटलेले होते की आम्हाला वेळ दया, त्यानंतर देखील अनेक सदस्यांना भेटलो सर्वसाधारणपणे ३ ते ४ च्या दरम्यान वेळ दिली. फक्त कोव्हीडच्या काळात बंदी असल्यामुळे आपण ती प्रथा बंद पाडली. कोव्हीडच्या काळात प्रायरिटी कोव्हीडला आहे त्या दृष्टीने आम्ही काम केले. प्रत्येकाचा फोन घेणे मला शक्य होत नाही. आणि सुरुवातीला नमके काय करायचे हे सुध्दा माहित नव्हते. ओव्हर अ पिरेड ऑफ टाईम ज्या गोष्टी लर्न करीत गेलो त्यामध्ये डिस्ट्रीक लेव्हल असतील, स्टेट लेव्हल असतील, नॅशनल लेव्हल असतील त्या दृष्टीने काम करीत गेलो. आता इशु येथे आला की काम किती बंद पडले त्याची आकडेवारी येथे तालेवार साहेबांनी सांगितलेली आहे किती वर्कऑर्डर दिले आहे किती थांबविले आहे. त्यामध्ये मी जात नाही. परंतु ज्या कामाचे वर्कऑर्डर झाले आहे त्याचे काम बंद का केले त्याचे एकमेव कारण आहे की फायननशियल कंडीशन, ज्याचे काम झालेले आहे ऑलरेडी त्याचे बिल दयायला सुध्दा आपल्याकडे पैसे नाही. हे प्रायमरी आणि एकमेव रिझन आहे. हा अधिकार आहे काय तर तो अधिकार मला आहे. जर पैसे नसतील ऑलरेडी जे कामे झाले आहे तर नविन लायबिलीटी करु शकत नाही. नविन लायबिलीटी का करु शकत नाही कारण फायननशियल नॉर्म्स पाळणे हे आपले कर्तव्य आहे. आणि का करु शकत नाही याच्या बाबतीत मी थोडी आकडेवारी सांगितल्यानंतर मग मी बाकीचे विषय पुढे नेतो कारण ही महत्वाची गोष्ट आहे. जो पर्यत आपण हे समजून घेणार नाही तो पर्यत आपले गैरसमज असु शकतात ते या माध्यमातून दुर होऊ शकते. जसे तालेवारांनी मला सांगितले जशी ही सभा झाली त्या सभेमध्ये मी स्वत: स्टेटमेंट केले होते जे कामे सुरु झालेले आहे किंवा ज्या कामाचे वर्क ऑर्डर झालेले आहे ते कामे मी थांबविलेले आहे. तर होय ते कामे मी थांबविलेले आहे. ज्या वेळेस सभा झाली त्या सभेमध्ये मी स्वत: स्टेटमेंट केले होते की जे वर्कऑर्डर झालेले आहे ते कामे मी थांबविलेले आहे ते रेकॉर्डवर आहे.

श्री. प्रविण दटके :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ ऑर्डर, असे लेखी आदेश दयायची गरज आहे की नाही. प्रत्येक फाईलवर लिहले पाहिजे किंवा त्या त्या कॉट्रॅक्टरला कळविले पाहिजे असे एम.एम.सी. ॲक्टमध्ये आहे की नाही. फक्त सभागृहात सांगितले आणि झाले याची माहिती आयुक्तांनी आपल्या निवेदनामध्ये दयायला पाहिजे.

निगम आयुक्त :- सन्माननिय महापौर महोदय, हे स्टेटमेंट मी जी.बी. मध्ये केले आणि आयुक्त म्हणुनच केले आहे.

श्री.प्रविण दटके :- मा. महापौरजी, पॉइंट ऑफ ऑर्डर, समजा एखादया रस्त्याचे काम आवश्यक नाही. सिमेंट रोडची कामे या शहरात आवश्यक नाही. ते कामे मी स्पष्टपणे थांबविलेले आहे. ते काम यानंतर होऊ नये, नाल्याची भिंत बांधु नये, फुटपाथ करु नये, नाली करु नये, चेंबर

करु नये, जे जे कामे थांबले आहे त्यावर लेखी आदेश आहे काय ? तो अधिकार आयुक्तांना आहे काय ?

निगम आयुक्त :- मा.महापौर महोदय, मी क्लीअरली सांगितले आहे की फक्त आणि फक्त फंड नसल्यामुळे हे कामे थांबविलेले आहे.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ ऑर्डर मी परत एकदा येथे सांगतो की पैसे आहे नाही आहे ते माझ्यापेक्षा त्यांना जास्त कळते त्यामध्ये मला बोलायचे नाही. माझा तो अधिकार आहे की माझ्या प्रभागातील किंवा इतर प्रभागातील कामे थांबले का ? ते पैशाअभावी थांबले की कशा अभावी थांबले त्याच्यावर लेखी आदेश जर परिपत्रक असेल किंवा एतक्या फाईलवर कोण लिहीत बसणार तर परिपत्रक असेल, किंवा इतक्या इतक्या कामाचे वर्कऑर्डर झाले होते हे टेन्डर प्रोसेसला आहे त्याचे प्रावधान दिले होते ते पैशाअभावी होऊ शकत नाही. असे परिपत्रक मा.आयुक्तांनी किंवा सी.ई. साहेबांनी किंवा ए.सी. साहेबांनी काढले आहे काय किंवा फाईलवर लेखी लिहले आहे काय ?

महापौर :- यामध्ये परिपत्रक काढले आहे काय याची माहिती आयुक्तांनी दयावी.

निगम आयुक्त :- मा.महापौरजी जसे मी जी.बी. मध्ये सांगितले तसे मी बैठक घेऊन सांगितले आहे. मा.महापौरजी मला बोलु दिले पाहिजे.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ ऑर्डर, माझा मुद्दा ऐवढाच आहे एकदम सोपा, लेखी आदेश दयायची गरज आहे काय ? होय किंवा नाही, नसेल तर मी खाली बसतो. मा.महापौरजी परिपत्रक काढले आहे काय ? ते काढायची गरज आहे काय ते नोटींगमध्ये येऊ देऊ, आणि कोणत्या कायदयानुसार ऐवढा सोपा प्रश्न आहे.

श्री.कमलेश चौधरी :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ ऑर्डर, याच्या अगोदर मा.महापौरजी यांनी सांगितले आहे लेखी स्वरुपात आपण दयावे. मा.आयुक्त आता निवेदन करीत आहे तर त्यांना निवेदन करु दयावे.

(बेल)

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, दटके साहेबांचा मुद्दा बरोबर आहे. आपण या ठिकाणी जे वर्कऑर्डर थांबविले. वर्कऑर्डर थांबविण्याच्या संदर्भात परिपत्रक काढले काय ? काढले असेल तर हो, नसेल तर नाही. आयुक्तांनी समजा ते काढले नाही मात्र ते जी.बी. मध्ये नमुद आहे किंवा बैठकीमध्ये त्यांनी सांगितले. कुठल्या कायदयामध्ये नमुद आहे किंवा आपल्याला असे परिपत्रक काढण्याची गरज का भासली नाही. आपण जर परिपत्रक तेव्हा काढले नसतील तर आता काढणार आहात काय ? काढणार असेल तर केव्हा ?

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, त्यांनी काढले का नाही त्या बद्यल विचारायचे नाही. हो किंवा नाही. आणि कोणत्या नियमात, आणि भविष्यात काढणार आहे काय ?

निगम आयुक्त :- सन्माननिय महापौरजी, मी परिपत्रक काढलेले नाही. मी निर्देश दिलेले आहेत. सेक्शन ८६ एम.एम.सी. ॲक्टनुसार तो अधिकार मला प्राप्त आहे.

श्री.धर्मपाल मेश्राम :- मा.महापौरजी, कलम ८६ चे पाहिलेच वाक्य आहे. नगरपालिका निधीतुन खर्च करण्यास निर्बंध यामध्ये तरतुद केलेली असेल त्या खेरीज पुढचे काही वाचण्याची गरज नाही. हे जे काही कार्यादेश निर्गमित करण्यात आले आहे. ते तरतुदी शिवाय निर्गमित करण्यात आले आहे काय ?

निगम आयुक्त :- मा.महापौरजी, कलम ८६ ची तरतुद स्वयंस्पष्ट आहे. अर्धापार्ट वाचुन त्याचे उत्तर भेटत नाही.

श्री.प्रविण दटके :- सचिवांनी कलम ८६ चे वाचन करावे. आणि निर्देश लेखी दयायचे आहे की तोंडी दयायचे आहे. सी.ई. साहेबांना दयायचे आहे की, ए.सी. साहेबांना दयायचे आहे याचाही येथे खुलासा झाला पाहिजे.

निगम सचिव :- (महानगरपालिका निधीतुन खर्च करण्यास निर्बंध कलम ८६ चे वाचन केले )

श्री.धर्मपाल मेश्राम :- मा.महापौर महोदय, याच्यामध्ये स्पष्ट उल्लेख असा आहे की या पुढे तरतुद केलेली असेल त्या खेरीज परंतु जी काही आकस्मीक कामे जर असतील, तातडीचे असतील, प्रासंगिक असतील, अति तातडीचे असतील, अशा पध्दतीचे कोणतेही कामे थांबविण्याचा अधिकार कदाचित हे कलम आयुक्तांना देत असेल पण ज्या कामाचे कार्यादेश झालेले आहे ते कामे थांबविण्याचा अधिकार मा.आयुक्तांचा नाही. हे मला नम्रपणे या ठिकाणी सांगायचे आहे. दुसरे असे आहे की प्रशासनिक सेवेच्या संदर्भात मी काही खुप सांगितले तर बरे होणार नाही. परंतु सर्व्हिस रुल्स असे म्हणतात की जो पर्यत एखादया गोष्टीच्या संदर्भामध्ये स्पष्ट असे लिहलेले असेल की हे करायचे नाही. जो पर्यत ते नमुद नाही आहे तो पर्यत सगळया गोष्टी करण्यासाठी ते अधिकार आपोआप घटनादत्त प्राप्त आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, मा.आयुक्तांनी या ठिकाणी निवेदन केले कलम ८६ अन्वये त्यांना तो अधिकार प्रदत्त आहे. आणि त्याची तरतुद स्वय्मंस्पष्ट आहे. कुठल्या कुठल्या स्थितीमध्ये खर्च करण्यास निर्बंध आहे याचे वाचन सुध्दा झालेले आहे. मात्र दटके साहेबांचा जो प्रश्न आहे की  या संदर्भामध्ये आपण परिपत्रक काढुन निर्बंध लागले हे आपण घोषित केले की नाही किंवा करण्याची आवश्यकता नव्हती काय ? जर गरज नसेल तर तसे आपण नमुद करावे.

निगम आयुक्त :- मा.महापौरजी, वर्कऑर्डरच्या संदर्भात स्पेसीफीक परिपत्रक काढले नाही. परंतु बजेट सबमिट केल्यानंतर मार्च महिन्याच्या पहिल्या आठवडयामध्ये वेगळे परिपत्रक काढलेले आहे. १९ मार्च २०२० चे ते माझे परिपत्रक आहे. (परिपत्रकाचे वाचन केले)

श्री.दयाशंकर तिवारी :- पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन मा.महापौरजी, आयुक्त महोदय ने बताया की मैने जो मेरा बजट दिया उस दिन मैने परिपत्रक निकाल दिया था की मेरे बजट के घोषित होने के तारीख के पश्चात कोई भी व्यक्ती किसी भी प्रकार से इस बजट के विपरीत काम नही करेंगा। आयुक्तने जो सुधारित बजट दिया है, वह देने वाली तारीख से लागु होता है या १ एप्रिल से लागु होता है इसकी मिमांसा सभागृह के सामने बताये। और अगर १ एप्रिल से लागु होता है तो उसका परिपत्रक उन्होने १९ मार्च को क्यौ निकाला। उसीसी जुडा हुआ दुसरा प्रश्न है की अगर उन्होने १९ मार्च परिपत्रक निकालकर कहा की परिपत्रक के अनुरुप काम होना चाहिये तो बजट मे नगरसेवकों के लिये जो वार्ड फंडउ मे १० लाख रुपये रखे है तो उनके काम पर उन्होने निर्बंध क्यौ लगायें।

श्री.धर्मपाल मेश्राम :-  मा.महापौरजी, त्या सोबत चौथा प्रश्न जोडावा मा.आयुक्तांनी जे परिपत्रक काढले किंवा जे काही पत्र मा.स्थायी समिती अध्यक्षांना दिले. त्यामध्ये कार्यादेश निर्गमित करण्यात आलेल्या कामाच्या संदर्भात कसलाही उल्लेख आलेला नाही याचा अर्थ काय आहे तो ही त्यांनी समजुन सांगावा.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, दयाभैय्यांनी या ठिकाणी जे सांगितले १९ मार्चला आयुक्तांनी परिपत्रक काढले.

श्री.कमलेश चौधरी :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, आयुक्तांना जेव्हा कळले असेल तेव्हा त्यांनी पत्र काढले असेल, कारण की त्याच्या नंतर हाऊस किंवा बजेटची मिटींग होण्याची शक्यता नव्हती.

(बेल)

श्री.दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी, मैने आपके माध्यम से आयुक्तजी से प्रश्न पुछा है अगर आयुक्तजी को अपने विचार कमलेशजी से रखने है तो कृपया आयुक्त जी को सामने बैठाये और कमलेशजी को उपर बैठाये, मजाक न करे, मजाक न करे, बहोत संजीदगी के साथ हम सारी बाते शांती से सुन रहे है। एक चेअर बाजु मे भी कमलेशजी की लगाई जा सकती है। पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन लेकर अगर कमलेशजी बोलेगें तो फीर कमीश्नर की जरुरत क्या है सभागृह में।

महापौर :- आता जवळपास ४ वाजुन २५ मिनीट पासुन कमीश्नर साहेबांनी आपले निवेदन सुरु केलेले आहे. त्यांनी ६.३० पर्यत निवेदन पुर्ण करावे.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, आयुक्तांना अजुन वेळ दयावी. या परिपत्रकात जुन्या कामाबद्यल कुठलिही माहिती नाही. म्हणुन माझा परत स्पेसीफीक प्रश्न आहे. त्यांनी कामे थांबवावे माझे काही म्हणने नाही. परंतु काही लेखी आदेश, परिपत्रक नसेल काढले तर आता काढावे ऐवढीच माझी विनंती आहे. ज्या कामांचे वर्कऑर्डर झाले आहे ते कामाचे परिपत्रक काढले नाही असे त्यांनी सांगितले आहे. परंतु भविष्यामध्ये काढणार आहेत काय किंवा प्रत्येक फाईलवर लिहीणार आहे काय ? या या कलमानुसार ते नसेल लिहीत तर राम जोशी साहेबांना अधिकार देणार आहे काय, की सी.ई साहेबांना किंवा ए.सी. साहेब किंवा उपायुक्त बसले आहे त्यांना आपण लेखी देणार आहे काय ? की लेखी देण्याची कायदयामध्ये गरज आहे काय ?

महापौर :- आयुक्तांनी परिपत्रक काढावे.

श्री.दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी, या आधी मी निवेदन केले होते. माझे दोन प्रश्न होते मा.आयुक्तांनी त्यावर उत्तर दयावे.

निगम आयुक्त :- सन्माननिय महापौरजी, जो पहिला प्रश्न होता त्याचे उत्तर माझ्या परिपत्रकामध्ये आहे. त्याच्यामध्ये दोन भाग आहे एक रिव्हाईज बजेट २०१९-२०२० आणि प्रस्तावित बजेट २०२०-२०२१ त्या दोन्हीच्या संदर्भात मी तरतुद केली आहे. रिव्हाईज बजेट स्थायी समितीने अॅक्सेप्ट केल्यानंतर परिपत्रक काढले आहे.

श्री.दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन रिव्हाईज बजट जिस तारीख को मा.आयुक्त महोदय ने दिया उसके पुर्व जो कार्यादेश हुये है उसका इफेक्ट दिखेगा क्या कानुन इसके बारे मे क्या कहता है इसका भी उल्लेख निवेदन मे किया जायें

निगम आयुक्त :- रिव्हाईज बजेटच्या अनुषंगाने माझा शब्दप्रयोग आहे की मी सुधारीत तरतुदीच्या अनुषंगाने यथायोग्य ती कार्यवाही करावी.

श्री.दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी पॉइंट ऑफ ऑर्डर, यथायोग्य म्हणजे काय ?

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, मा.आयुक्त आणि सदस्यांचे येथे कंन्फुजन होत आहे. समजा जर एखादा हेड आहे त्या हेडमध्ये तरतुद केली आहे. बांधकामाच्या संदर्भातील एक हेड आहे. सभागृहाने त्या हेडमध्ये १ कोटी रुपये देण्याचे निश्चित केले होते. आणि रिव्हाईज बजेटमध्ये आयुक्तांनी ते ५० लाख रुपये केले. आता प्रश्न असा आहे की आता २१ मार्च पर्यत रिव्हाईज बजेट मा.आयुक्त देतात तो पर्यत ४० लाख रुपयांच्या कामाचे वर्कऑर्डर झाले नाही आणि ते काम टेन्डर

प्रोसेसमध्ये आहे. आणि १० लक्ष रुपयांचे वर्कऑर्डर दयायचे आहे. परंतु १० लक्षाच्या वरचे असतील तर त्याची तरतुद उपलब्ध नाही मात्र टेन्डर झाले मात्र वर्कऑर्डर देता येत नाही असा त्याचा अर्थ असेल.

श्री.दयाशंकर तिवारी :- पॉइंट ऑफ ऑर्डर मा.महापौरजी, अगदी बरोबर जे टेन्डर झालेले आहे ते थांबवु शकतात परंतु ज्यांचे वर्कऑर्डर झालेले आहे त्या बद्यल काय ?

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी ज्या कामाचे वर्कऑर्डर झाले नाही. रिव्हाईज बजेट सादर करण्याच्या आधी मात्र त्याचे प्रत्यक्ष काम चालु झाले नाही. त्याचे बजेट मध्ये तरतुद आहे हे जर स्पष्ट आहे तर त्या वर्कऑर्डरचे काम सुरु करण्यास काय हरकत आहे. या संबंधाने काही हरकत असेल तर आयुक्तांनी येथे स्पष्ट करावे.

निगम आयुक्त :- सन्माननिय महापौरजी, आता जो प्रश्न आहे तो रिव्हाईज बजेटच्या अगोदर वर्कऑर्डर झालेल्या असतील परंतु काम सुरु करायचे नाही किंवा काम सुरु केलेले नाही. तर रिव्हाईज बजेटमध्ये जी प्रोसिजर आहे त्यामध्ये नावानिशी नाही तर हेडवाईज अमाउंट ठेवलेली आहे. ज्यांचे त्या अमाऊंटच्या बाहेर जाणारे कामे सुरु झाली असतील ते करता येणार नाही हे निर्देश मी सर्व अधिका-यांना दिलेले आहे.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ ऑर्डर, निर्देश लेखी आहे की तोंडी आहे.

निगम आयुक्त :- सन्माननिय महापौरजी निर्देश देतांना मी अगोदर क्लीअर केले आहे की ज्या ठिकाणी फंड अव्हेलेबल नाही. त्या ठिकाणी वर्कऑर्डर दिलेली असेल तरीही ज्यांचे काम चालु झालेले नाही असे कामे करायची नाही मी निर्देश मिटींग मध्ये दिलेले आहे. लेखी मध्ये दिलेले नाही हे मी क्लीअर केलेले आहे.

महापौर :- सभागृहाचे आपल्याला निर्देश आहे की जे आदेश तोंडी दिलेले असतील आपण लेखी दयावे. परिपत्रक काढा.

श्री.तानाजी वनवे :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ ऑर्डर जे कामे सुरु झालेले नाही परंतु जे कामे सुरु झालेले आहे आणि कोव्हीड — १९ मुळे ते कामे बंद झालेले आहे त्या कामाच्या संदर्भात काय ?

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, आता मुद्या योग्य आहे. जर लेखी आदेश नाही, परिपत्रक नाही. कार्यादेश झाले १९ तारखेच्या आधी ते सर्व कामे सुरु करण्याचे निर्देश किंवा आदेश दयायचा अधिकार हे सभागृह आल्याला देत आहे. आणि तो आपण दयावा अशी माझी विनंती आहे.

निगम आयुक्त :- सन्माननिय महापौरजी हा माझा मुद्या वर्कऑर्डर का थांबविले या बद्यल होता तर त्याचा मुद्या हाच होता की फायननशियल पोझीशन व्यवस्थित नाही आपण जुनेच पेमेंट करु शकत नाही. पुढची लायबिलीटी क्रीयेट करु शकत नाही म्हणुन ते कामे आपण थांबविले होते. ३१ मार्च २०२० रोजी नागपूर महानगरपालिकेची टोटल लायबिलीटी २१२१ कोटी रुपयांची आहे. तर त्या २१२१ कोटी रुपयांमध्ये काय आहे. कर्मचारी व आस्थापनेचे दायित्व १९१. ९८ कोटी वैधानिक व शासकीय देणे ७४९ कोटी रुपयांची आहे.

महापौर :- सभागृहाने मला देखील मार्गदर्शन करावे की हा जो विषय आहे हा काही अर्धा तासाचा किंवा एका तासाचा काही विषय नाही. मी दोनदा स्थायी समिती अध्यक्ष होतो तर या आकडयांमध्ये काहीतरी गडबडी मला देखील दिसत आहे. त्यामुळे या आर्थिक विषयावर आज बोलण्यापेक्षा पुढे ८ ते १० दिवसांमध्ये बोलावे. हा मोठा विषय आहे.

श्री.दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी, मा.आयुक्त महोदय अभी जो आकडे पढ रहे है इस आकडे को प्राप्त करने के लिये तालेवार साहब को ७ शो कॉज देने पडे, इसका मतलब इस आकडे को निकालने के लिये कितने दिन लगे होंगे, अब उनको इतने दिन लगे होंग तो वह बोले और हम समझ जायेंगे ऐंसा तो संभव नही, इसलिये आयुक्त महोदय ने जो आकडे दिये वह आकडे सभागृह के पटलपर लेखी स्वरुप मे सबको दिये जायें और सबको प्राप्त होने के बाद सब उसपर चर्चा करेंगे, मै पुनश्च: निवेदन करना चॉहता हु आयुक्त महोदय का संपुर्न निवेदन आप लेखी स्वरुप मे वितरीत कर दे, आप तीन दिन, चार दिन या पांच दिन के बाद सभा लिजीयें, और आप फिरसे उस विषय पर चर्चा किजीये, उसके साथ आप लेखी अकाउंट का विषय भी लिजीयें,और आश्चर्यचकित हु की अकाऊंट के आकडे सुपरीटेन्डंट इंजिनिअर से मांग रहे है। हमारा अकाऊंट डिपार्टमेंट क्या कर रहा है मा.महापौरजी, सुपरीटेन्डंट इंजिनिअर को शो कॉज की आकडे दे, आकडे दे, टेक्नीकल सॅग्शन के आकडे उसको मांगे तो समझ मे आता है, अकाउंट के आकडे सुपरीटेन्डंट इंजिनिअर को मांगने के लिये सात-सात शो कॉज जो अकाऊंट मे बैठे है उनको कुछ नही, मा.महापौरजी यह बडा विचित्र सा है समझ मे नही आ रहा। याने की २३ साल से कारपोरेशन समझ ही नही सका ऐंसा लग रहा है।

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, या ठिकाणी मा.सदस्य श्री.दयाशंकर तिवारी यांनी जो विषय ठेवला तो बरोबर आहे. फायननशियल स्टेटसच्या संदर्भामध्ये प्रशासनाला निर्देश दिले होते. त्या अनुषंगाने प्रशासनाकडुन आकडे आले आहे काय किंवा टेबल झाले असे समजुन सर्व सदस्यांना आपण वितरीत करावे. आणि पुढच्या सभेमध्ये आपण आर्थिक स्थितीच्या संदर्भात चर्चा आपण निश्चितपणाने घेऊ यामध्ये जे जे कंन्फुजन आहे. प्रशासनाच्या ज्या काही अडचणी आहे त्या समजुन घेऊ, आपल्या ज्या काही अडचणी आहे त्या आपण समजुन घेऊ, आर्थिक स्थितीच्या संदर्भात आपण स्वतंत्र चर्चा घेतली पाहिजे.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, मा.सदस्य श्री प्रफुल्ल गुडधे यांच्या मताशी मी सहमत आहे पण मा.आयुक्तांनी येथे सांगितलेल्या गाईडलाईन आहे त्या सर्व लेखी पाहिजे. पाचपावली क्वॉरंटाईन सेंटर भर वस्तीच्या मध्ये आहे ते निर्माण करण्याकरीता आय.सी.एम.आर. केंद्र सरकार, राज्य सरकार सर्वाचे जे काही लेखी आदेश आहे. किंवा सरकारच्या लेखी गाईडलाईन, ४७ डिगरी तापमानामध्ये क्वॉरंटाईन केंद्र उभे करता येते काय ? या संदर्भातील सर्व गाईडलाईन्स आम्हाला लेखी पाहिजे. आम्ही आयुक्तांचे आणखी ५ दिवस ऐकायला तयार आहे परंतु मा.महापौरजी, आम्हाला या गाइडलाईन पाहिजे आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- या सभागृहामध्ये स्थगन प्रस्तावाच्या निमित्ताने जी चर्चा उपस्थित झाली. जे आक्षेप आपण घेतले प्रशासनावर त्या आक्षेपाच्या संदर्भात मा.आयुक्त उत्तर देत आहे.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, पाचपावली क्वॉरंटाईन सेंटरचे मला हाल माहिती आहे. भर वस्तीच्या मध्ये आहे. तेथील नगरसेवकांना विचारा,

श्री.तानाजी वनवे :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ ऑर्डर, विषय असा आहे की आता लेटस्ट सेंट्रल गव्हर्नमेंटच्या गाईडलाईन्स आलेल्या आहेत की भर वस्तीमध्ये क्वॉरंटाईन सेंटर ठेवण्यात येऊ नये. तसे सेंट्रल गर्व्हनमेंटने टी.व्ही. वर जाहीर केले आहे की ज्या ठिकाणी दाटीवाटीची वस्ती आहे त्याला क्वॉरंटाईन सेंटर ठेवण्यात येऊ नये. त्या संदर्भात आपण माहिती विचारा.

(बेल)

श्री.दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी, आयुक्त महोदय का जो निवेदन है वह निवेदन अपने

आप प्रश्नार्थक चिन्ह लेकर के आया है। मै बिचमे उठकर अंदर गया था, अंदर स्पीकर चालु था, मैने सुना, मैने सतरंजीपूरा झोन मे मुश्ताक के बारे मे जानकारी मांगी थी उन्होने अपने निवेदन मे तौसिफ के बारे मे जानकारी दी। मा.महापौरजी, मेरा कृपापुर्ण निवेदन है। बार बार आयुक्त महोदय बोलेंगे।

श्री.तानाजी वनवे :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ ऑर्डर मी जो प्रश्न विचारला आहे. दटकेजींने जे सांगितले की सेंट्रल गव्हर्नमेंटची लेटेस्ट गाईडलाईन आहे की दाटीवाटीच्या वस्तीमध्ये क्वॉरंटाईन सेंटर ठेवण्यात येऊ नये या संदर्भात खुलासा पाहिजे. मी सुरुवातीलाच पॉइंट ऑफ ऑर्डर घेतला होता त्या संदर्भात माहिती दयावी.

(बेल)

महापौर :- माझे असे म्हणणे आहे की ६.१५ मिनीटे झालेले आहे. सन्माननिय आयुक्तांनी ६.३० पर्यत निवेदन करावे त्यानंतर आपले जे काही प्रश्न असतील जे आपण विचारले त्याचे उत्तर आपल्याला मिळाले नाही असे आपल्याला वाटत असेल तर ते सोमवारी सायंकाळी ६.०० पर्यत

श्री.दयाशंकर तिवारी :- पॉइंट ऑफ ऑर्डर मा.महापोरजी, आयुक्तांनी जे काही उत्तर दिले त्यामध्ये आमच्या प्रश्नाचे उत्तर मिळाले की नाही. त्याचे पुन्हा प्रश्न विचारण्यासाठी सभागृह नाही. आम्ही जे जे प्रश्न सभागृहात विचारले त्याची नोंद करणे आयुक्तांना अति आवश्यक होते ते आयुक्तांनी केलेले आहे अशी माझी समज आहे. आयुक्त येथे उभे राहते ते उत्तर देते. दटके साहेबांना नाही पटले तर ते पॉइंट ऑफ ऑर्डर घेते, मला नाही पटले तर मी पॉइंट ऑफ आर्डर घेतो, तानाजी साहेबांना नाही पटले तर ते घेते, या खेरीज आपण आयुक्तांना प्रत्येक प्रश्नाचे लेखी उत्तर दयायला सांगा त्यामध्ये जर काही चुक असेल, त्यावर सभागृहात चर्चा करु, ते निवेदन जसे आपल्याला अपेक्षित आहे तसे आले तर चर्चा होण्याचे कोणतेही कारण नाही. आयुक्तांना डिस्टर्ब होणार नाही. कोणाचीही मानमर्यादा जाणार नाही. कारण आयुक्त साहेबांचा स्वभाव आहे की त्यांच्या मधात जर कोणी पॉइंट ऑफ ऑर्डर घेतला तर त्यांना दुखते.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, हे काही बरोबर नाही आमच्या सदस्यांनी जेव्हा पॉइंट ऑफ ऑर्डर घेतला तेव्हा बोलु दिले नाही.

(बेल)

महापौर :- मा.आयुक्तांनी निवेदन करावे.

निगम आयुक्त :- सन्माननिय महापौरजी, जे प्रश्न आले आहे ते पुढच्या ९ ते १० मिनीटामध्ये मी घेईल. ज्या लेटेस्ट गाईडलाईन आलेल्या आहेत ते मी लेखी देईल. यामध्ये बरेच निवेदन करतांना त्याच्यामध्ये एस.ओ.पी. पाळल्या गेले आहे काय तर त्याचे उत्तर येस असे आहे. दुसरा प्रश्न दाट वस्तीच्या भागामध्ये आयसोलेशनच्या सेंटरच्या संदर्भात प्रश्न होता. कोव्हीडची पुर्ण माहिती करुन घेतली जाते काय ? आय.सी.एम.आर. च्या गाईडलाईन प्रमाणे कारवाई करण्यात आली काय ? केंद्र शासनाने ७१ हजारापैकी किती कीट नागपूर शहरामध्ये उपलब्ध झाले आहे. यामध्ये दाट वस्तींच्या लोकांच्या बाबतीत आयोसेलेशन किंवा क्वॉरंटाईन सेंटर त्यामध्ये आय.सी.एम.आर. च्या गाईडलाईन आहे त्याचेपुर्णपणे गाईडलाईन फॉलो केल्या जातात त्याप्रमाणे क्वॉरंटाईन सेंटर किंवा आयसोलेशन सेंटर आपण तयार केलेले आहे. एस.ओ.पी. पाळल्या जातात ती माहिती शासनाच्या निर्देशनास आणुन दिल्या जाते. जे फॉरमॅट आहे ते पुर्णपणे भरुन घेतले जातात. ती ऑफीस मध्ये अव्हेलेबल आहे. आयसोलेशन क्वॉरंटाईन सेंटर उघडण्यासाठी कोणती कारवाई करणे अपेक्षित

आहे. कोव्हीड – १९ च्या अनुषंगाने क्वॉरंटाईन सेंटर सुरु करण्यात आले आहे. सिम्बॉयसिस कॉरंटाईन सेंटर सुरु करण्यात आले आहे. ७१ हजार पैकी २००० किटची मागणी केलेली आहे. ते उपलब्ध झालेले नाही. कमी लक्षणे असलेल्या रुग्ण आहे ते एका सेंटरमध्ये ठेवण्यात येते काय ? आपण सर्वच रुग्णांना शासकीय वैद्यकीय महाविद्यलाय व ऐम्स या ठिकाणी भरती करण्यात येते. हे करीत असतांना काही सन्माननिय सदस्यांनी सर्व्हेच्या बाबतीत मला खोटे बोलतात असे सांगितले, लबाड म्हणुन माझा येथे उल्लेख केला गेला. असे अनेकदा केले गेले याच्यावर एकच उत्तर आहे. मी जी माहिती दिलेली आहे त्यामध्ये एकही शब्द लबाड नाही, खोटा नाही आहे आणि हायपोथेटीकलही नाही. हायपोथेटीकल कशी आहे त्या दृष्टीकोणातुन प्रत्येक घटनेवर मी येथे बोलु शकतो परंतु ९ ते १० मिनीटामध्ये मला सविस्तर बोलता येणार नाही. काही ज्या विशेष करुन गोष्टी बोलल्या गेल्या त्याबाबत खुलासा होणे गरजेचे आहे त्या दृष्टीने मी बोलत आहे. येथे एक विषय मनोरुग्ण कैसर परवीन, सतरंजीपूरा या बाबतीत बोलला गेला होता. ३ दिवस लॉक केले होते आणि जेवन नाही असा उल्लेख त्यामध्ये केला होता. मी त्या ठिकाणी नमुद करु शकतो की ए.एन.एम. श्रीमती तेजस्विनी शेंडे यांची घरी भेट दररोज होत होती. रुग्ण हा मनोरुग्ण असल्यामुळे क्वॉरंटाईन केलेला नव्हता. स्वत: त्यांच्या कुंटुंबातील व्यक्तींनी सांगितले होते त्यांचे पुर्ण कुंटुंब ३ बहीन आणि एक भाऊ क्वॉरंटाईन सेंटरला गेले होते. घर लॉक केलेले नव्हते. एन.एम.सी कडुन रोज रुग्णांची भेट होत होती त्यांना ताप खोकला आहे काय किंवा जेवण केले काय याची विचारणा करण्यात येत होती. घरच्या बाजुला श्री.देवांगण राहतात त्यांनी सांगितले की जेवणाचा प्रॉब्लेम नाही. आणि ज्यावेळेस डॉ.सवईला फोन केला तेव्हा एम.एल.ए. होस्टेल मधुन तीन दिवसांनी बहीन आणि भाऊ परत आले आहे. दुसरा विषय डॉ.गंटावारच्या संदर्भात आहे ते प्रायव्हेट हॉस्पीटल चालवु शकतात काय ? व त्यांचे रजिस्ट्रेशन होऊ शकतात काय ? हा प्रश्न विचारला गेला. बॉम्बे नर्सिंग होम ॲक्ट सेक्शन ५ आपण जो काल वाचला त्याच्यामध्ये गव्हर्नमेंट इन्स्टीटयुशनच्या संदर्भात शब्दप्रयोग आहे की गव्हर्नमेंट इन्स्टीटयुशनला रजिस्ट्रेशनची गरज नाही. गव्हर्नमेंट इन्स्टीटयुशन मध्ये काम करीत असलेल्या डॉक्टरला रजिस्ट्रेशन करता येत नाही असा कुठेही उल्लेख नाही. त्यामुळे ती जी बाब ती चुकीची आहे असे म्हणता येणार नाही. त्यामध्ये ऑलरेडी क्लीअरिटी आहे. दुसरा एम.पी.ए. म्हणजे गर्व्हनमेंट हॉस्पीटल मध्ये काम करीत असतांना प्रायव्हेट प्रॅक्टीसचे काम करता येते काय या संदर्भात एम.पी.ए. च्या स्वयंस्पष्ट गाईडलाईन आहे. एम.पी.ए . घेत असेल तर त्याला प्रॅक्टीस करता येत नाही. एम.पी.ए. घेत नसेल तर करता येते. या केसमध्ये रिट पिटीशन झालेले आहे. ५/२०२० या रिट पिटीशनच्या ऑर्डर पण आहे. ती रिट पिटीशन जी आहे ती फाईल केलेली आहे. पिटीशनर डॉ.प्रविण गंटावार व्हर्सेस नागपूर मुनसिपल कारपोरेशन, डेपयुटी डायरेक्टर हेल्थ, स्टेट ऑफ महाराष्ट्रा, आणि त्यामध्ये प्रेअर म्हटले आहे (ऑर्डरचे वाचन करण्यात आले) ही कोर्टातील ऑर्डर आहे त्यामुळे जी कोर्टाने आपल्याला ऑर्डर दिली त्यामध्ये हायकोर्टाने स्टे दिलेला आहे त्याच्यामुळे ही बाब येत नाही. श्रीमती शिलु गंटावार (चिमुरकर) यांच्या बाबतीत जानेवारी २०१७ ते फेब्रुवारी २०१७ ऑक्टोबर २०१८ ते नोव्हेंबर २०१८ सप्टेबर २०१८ त्यांचा पुर्ण पगार कपात केलेला आहे त्याची फाईल तयार आहे. ८१ दिवसाची बिनपगारी करुन त्यांना पनिशमेंट सुध्दा दिलेली आहे. त्यामध्ये हा सुध्दा प्रश्न विचारण्यात आला होता की लॉकडाऊन केल्यामुळे खाजगी कंपनीतील लोकांना नोटीस आलेली आहे असे जर काही केसेस असतील तर आम्ही त्या कंपनीला सांगु की लॉकडाऊन असल्यामुळे जे कंटोनमेंट झोनमध्ये असेल त्यांना कोणत्याही प्रकारे नौकरीवरुन काढता येणार नाही. अशाप्रकारे

ज्या इंडीव्हीज्युअल केस कार्यालयात अप्रोच झाले तर त्या दृष्टीने करता येईल. ज्या तक्रारी डॉ.गंटावार यांच्या संबंधाने फेब्रुवारी महिन्यात आलेल्या होत्या. त्या एका व्यक्तीने किंवा संस्थेने माझ्याकडे दिलेल्या होत्या, त्यामध्ये मी काय केले याबाबत सांगत आहे. ती तक्रार आल्यानंतर कंन्सर्न विभागाचे प्रमुख एम.ओ.एच याच्याकडे दिलेले होते. त्याच्यानंतर त्यांनी डॉक्युमेंट दिले त्याच्या अगोदरही त्यांनी डॉ.गंटावार आणि तत्कालीन एम.ओ.एच. होत्या त्यांच्या विरुध्दही तक्रारी होत्या. त्यांची चौकशी करण्यासाठी त्यांना बोलविल्या देखील गेले होते. ॲडीशनल कमीश्नरने त्याप्रमाणे त्यांना बोलाविले सुध्दा होते की तक्रार कर्त्यांनी डिटेल्स दिलेले नाही म्हणुन त्या स्टेजला ते थांबलेले आहे. त्याच्यामुळे त्याच्यावर कॉग्नीजन्स घेतला काय तर त्याचे उत्तर येस असे आहे. त्यावर जी योग्य कारवाई करणे अपेक्षित आहे ती प्रोसेस चालु होती. त्याच्यानंतर त्यांना पत्र पाठविले होते २५/०२/२०२० रोजी श्री.मदन थुल यांच्या घरी पाठविले नंतर २६/०२/२०२० ला त्यांचा फोन आला सध्या ते चंद्रपूरला आहे ते येऊ शकत नाही. त्यांना सांगण्यात आले की २६.०२ ला मिटींग आहे त्यानुसार त्यांच्या कडुन कुठलिही माहिती न आल्यामुळे कार्यालयामार्फत पुढची कार्यवाही होऊ शकत नाही. त्याप्रमाणे कारवाई केली. आता राहिला प्रश्न खोटे बोलणे आणि हायपोथेटीकल सिच्युऐशन क्रीयेट करणे, हायपोथेटीकल सिच्युऐशन ना मी क्रीयेट केलेली आहे. ना खोटे मी बोललेलो आहे. त्याच्यामध्ये सुरुवात झाली मुस्तफा खानच्या बाबतीत, वसीम परवेजच्या बाबतीत ट्रेनच्या बाबतीत हे सांगण्यात आले की ट्रेनची माहिती ही आय.जी.एम.सी. ने दिली. ज्या दिवशी २५ तारखेला ही केस आली आणि कॉटॅक्ट ट्रेसिंग केले त्या दिवशी रेल्वे विभागाशी कॉटॅक्ट करुन त्यांच्या बोगीमध्ये सर्व व्यक्ती कोण होते. कोणत्या स्टेजमधले होते, किती होते, त्याचे कॉटॅक्ट नंबर काय होते, हे महानगरपालिकेने रेल्वे विभागाकडुन माहिती घेतलेली आहे. ते जवळ जवळ ४ स्टेटमधले होते. मी स्वत: पत्र लिहीले आहे की आपल्या स्टेट मधुन ऐवढया व्यक्ती होत्या त्यामधुन काही व्यक्ती पॉझिटीव्ह आहे. त्यातील काही व्यक्ती चंद्रपुर मधील ३ ते ४ होते. तेथील कलेक्टरला देखील कळविले आहे. हे करीत असतांना कॉटॅक्ट ट्रेसिंग करणे हे बोगी मधले काही निर्देश नव्हते परंतु आम्हाला जे योग्य वाटले त्यानुसार कारवाई केली. २६० च्या आसपासच्या व्यक्तींना जे शहरातील असतील किंवा इतर ठिकाणचे असतील त्यांना कळविले आहे त्यांना कॉटॅक्ट सुध्दा केला आहे. आवश्यकतेनुसार पुढची कार्यवाही केलेली आहे. ट्रेनची हायपोथेटीकल सिच्युऐशन केली हे म्हणणे चुकीचे आहे. त्याच्यामध्ये पुढचा प्रश्न असा होता की स्लॉटर हाऊस, बकरा मंडी हे हायपोथेटीकल सिच्युऐशन आहे. येथे कोण आले, कसे आले, हे कॉटॅक्ट ट्रेसिंग केले गेले ते महानगरपालिकेची हेल्थ टिम तयार करते. पोलीस विभाग नाही. पालीस विभाग ज्या वेळी क्वॉरंटाईन सेंटर एस्टॅब्लीश होते त्यावेळी तेथुन अवागमन होणार नाही हे बघतात. म्हणुन कॉटॅक्ट ट्रेसिंगमध्ये कोण कुठे गेले होते त्याची माहिती पोलीस विभागाला असु शकत नाही. त्यांचा इंडीपेंडंट काहीही असु शकते परंतु कॉटॅक्ट ट्रेसिंगमध्ये नागपूर महानगरपालिकेमध्ये पोलीस विभाग इनव्हॉल नाही. आतापर्यतही नाही. म्हणुन जेव्हा कॉटॅक्ट ट्रेसिंग होते. ज्यावेळी नाईक तलाव या ठिकाणची गोष्ट आली. त्या वेळी १६ पॉझिटीव्ह आले तेव्हा ती गल्ली पहिल्या दिवशी आपण कंटोनमेंट केली होती. तेथे पॉझिटीव्ह आले त्याच्या नंतर तिस-या दिवशी जेव्हा बाजुचा परिसर कंटोनमेंट करण्यासाठी गेले तेथील नागरिकांनी फक्त एका डॉक्टरांना नव्हे तर तेथे डॉ.गंटावार होते, झोनल मेडीकल ऑफीसर होते आणि असिस्टंट कमीश्नर होते. त्यांच्याहुन कोणताही प्रश्न न विचारता आम्हाला क्वॉरंटाईन तर कराच परंतु ज्यांनी येथे पार्टी केली आहे त्यांच्यावर काय कारवाई करणार,

हे त्यांच्यामाध्यमातुन समोर आले हे खोटे नाही. कल्पीत आणि हायपोथेटीकल किंवा लबाड याच्यामध्ये नाही. ती माहिती तीन —तीन अधिका-यासमोर तेथील नागरिकांनी स्वत:हुन दिलेली माहिती आहे. त्याच्यामुळे तेथे कोणत्याही प्रकारचा लबाडपणा झालेला नाही आणि करण्याचे काही कारणही नाही. आता एक विषय आला टोपीवालाचा, टोपीवाला ज्या वेळेस डिसचार्ज झाला त्यावेळी ॲम्ब्युलन्सने येणे अपेक्षित आहे काय ? ती जबाबदारी कोणाची आहे, ती डयुटी कोणाची आहे तर ती डयुटी हॉस्पीटल किंवा इन्स्टीटयुशनची आहे. त्यांनी ती प्रक्रीया पाडणे आवश्यक आहे. जर त्यांनी डिसचार्ज करतांना त्यांनी आम्हाला सांगितले तर आमची ॲम्ब्युलन्स जाते जर त्यांनी डिसचार्ज करतांना एन.एम.सी. ला कळविले नसेल तर कोणीही तेथे पाठवु शकणार नाही. ते गेले माहिती भेटली त्या आधारावर क्वॉरंटाईन केले आणि एफ.आय.आर. झाला हेच करीत असतांना डेथ ऑडीट कमेटीमध्ये डॉ.प्रविण गंटावार का ? हा एक प्रश्न विचारला गेला. डेथ ऑडीट कमेटीमध्ये कोण असावे त्याच्या सर्वसाधारण गाईडलाईन अशा कोणत्याही नाही. परंतु ज्याला डेथच्या बाबतीत ऑडीट करता येऊ शकते असे असणे अपेक्षित आहे. पर्टीकुलरली ज्या इन्स्टीटयुशन असतील जेथे या डेथ होतात त्याच्या व्यतिरिक्त त्रयस्थ मानुस असावा म्हणुन डॉ.गंटावार त्याचे हेड केले आहे. म्हणुन ते करण्याच्या दृष्टीकोणातुन डॉ.गंटावार यांना केले आहे. यामध्ये कोणतेही खोटे नाही, लबाडपणा नाही आणि कोणतीही हायपोथेटीकल सिच्युऐशन नाही. राहिला प्रश्न मेंटल हेल्थच्या बाबतीत आपल्याला माहिती जर पाहिजे असतील तर जेव्हा कोव्हीडच्या संदर्भात सिच्युऐशन आली त्या अनुषंगाने कंट्रोल रुममध्ये मेंटल हेल्थ करीता काही नंबर दिले. त्या बरोबर प्रत्येक झोनलार दोन कॉन्सीलर दिले आणि दोन प्रायव्हेट सायकॅट्रीस्ट नेमले आहे आणि त्यांचे नंबर दिल्यानंतर १०,००० पेक्षा जास्त व्यक्तींनी कॉटॅक्ट केलेला आहे. आपले कॉन्सीलर, सायकॅट्रीस्ट किंवा पी.एस.सी. च्या डॉक्टरांच्या मार्फत कॉन्सीलींग केल्या गेले आहे. प्रत्येक ठिकाणी त्यांच्या घरी जाऊन देतो काय तर नाही. प्रत्येक झोनला आपण दोन कॉन्सीलर नेमले आहे. त्या ठिकाणी त्यांना माहिती देतो त्यांना कॉटॅक्ट दिला जातो त्यानंतर त्यांना फोन केला जातो, फोनवर कॉन्सीलींग केल्या जाते, फोनवर झाले नाही तर घरी जाऊन कॉन्सीलींग केल्या जतात, ते जर शक्य नाही तर पी.एस.सी. असतात ते जर झाले नाही तर सायकॅट्रीस्टची जी प्रोसेस आहे त्या माध्यमातुन ६ प्रकारच्या मेंटल चॅलेंजेस असतात, मेंटल हेल्थचे प्रॉब्लेम असतात त्यावर आपण कारवाई करीत आहोत आणि त्या दृष्टीने काम करीत आहोत. याच्यामध्ये काही हायपोथेटीकल आहे काय? तर नाही. याच्यामध्ये काही लबाडपणा नाही. याच्यामध्ये काही खोटेपणा नाही. आता याचबरोबर विषय असा आला होता की एन.आय.टी. मार्फेत कशाच्या आधारावर गार्डन घेतले होते. त्याच्यामध्ये शासनाचे निर्देश आहे. जी.आर. आहे. त्याचबरोबर कोणताही डेव्हलपमेंट बोर्ड एस्टॅब्लीश होत असतांना सिटी किंवा टाऊन प्लॅनिंग करायची असते. आणि ज्या ॲमिनिटीज असतात त्या लोकल बॉडींनी त्यांचे मेटेनन्स हाताळायचे असते. हा येथेच नाही तर नवी मुंबईला सुध्दा सिडकोच्या माध्यमातुन इशु आहे. आणि ते हॅन्डओव्हर करणे हे शासनाचे दिशानिर्देश देखील आहे. त्या दृष्टीने आपण हॅन्डओव्हर करुन घेतलेले आहे. आणि हेच करीत असतांना टॅक्सच्या बाबतीत काय केले हा पण विषय आला, रिकव्हरीच्या बाबतीत काय केले हा सुध्दा विषय आला, त्याचप्रमाणे प्रेस नोट देऊन जेलमध्ये टाकेल हा सुध्दा विषय आला होता. त्याच्यामध्ये आर.आर.सी. चे प्रोव्हीजन आहे. आर.आर.सी. च्या प्रोव्हीजन नुसार जेव्हा कोणताही व्यक्तीकडुन जेव्हा शासकीय निधी येत नसेल, त्यानुसार सिव्हीज जेल, किंवा रिगरस इम्प्रीजमेंट या पध्दतीने करता येते. हे त्याचे प्रोव्हीजन आहे.

त्यानुसार दिशानिर्देश दिलेले होते.

श्री.धर्मपाल मेश्राम :- पॉइंट ऑफ ऑर्डर मा.महापौरजी, आर.आर.सी. करण्याचे अधिकार मा.आयुक्तांचे आहे काय ?

निगम आयुक्त :- सन्माननिय महापौरजी, आर.आर.सी. मी केले असे म्हटलेले नाही. आर.आर.सी. केल्यानुसार जेलमध्ये जाऊ शकतो हे म्हटले आहे. आर.आर.सी. करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी महोदयांचे आहे.

बेल

महापौर :- मी आयुक्तांना ६.३० सांगितले होते ऑलरेडी ५ ते ६ मिनीट जास्त झाले आहे.

श्री.दयाशंकर तिवारी :- मा.महापौरजी, मा.आयुक्त महोदय ने मेरे प्रश्नोंपर जो विषय कहा है उसकी भी चर्चा करनी है लेकीन उनका संबोधन चल रहा था तो मै सुन रहा था। मेरी आपसे एक ही विनंती है की आयुक्तने यहा जो कुछ भी उद्बबोधन किया है लेखी स्वरुप मे प्राप्त हो।

श्री.संदीप जाधव :- मा.महारपौरजी, प्रश्न भरपुर लोकांचे आहे आणि वेळ कमी आहे. आणि म्हणुन जेष्ठ नगरसेवक मा.दयाशंकर तिवारी यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांनी येथे लेखी निवेदन करायला पाहिजे. माझी आपणांस विनंती आहे की आयुक्तांना २ ते ३ दिवसाचा वेळ दयावा आणि प्रत्येक गोष्ट ज्या संदर्भात प्रश्न विचारले आहे त्याचे उत्तरे रायटींगमध्ये ज्या नगरसेवकांनी प्रश्न विचारले येथे रिपोर्टर बसले आहे त्यांच्याकडे सर्व माहिती आहे. तशाप्रकारचे लेखी निवेदन दयावे. वेळ पडल्यास आपण परत सभागृह घ्या. जो पर्यत लेखी निवेदन येत नाही, सगळया नगरसेवकांचे समाधान होत नाही. झाले तर ठिक आहे नाही झाले तर पुन्हा प्रश्न आपण घेऊ शकु.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, ३ दिवसांपासून स्थगन प्रस्तावावर चर्चा केली आरोप प्रत्यारोप केले प्रशासनाला आपण प्रश्न विचारले, प्रशासनाच्या वतीने आता मा.आयुक्त उत्तर देत आहे तर कोणाची तयारी दिसत नाही. यावरुन आपण असे काही ठरविले आहे काय.

श्री.दयाशंकर तिवारी :- पॉइंट ऑफ ऑर्डर मा.महारपौरजी, एक तर आयुक्तांच्या उत्तरामध्ये हस्तक्षेप करण्याची परवानगी दया, नाहीतर आयुक्तांना लेखी उत्तरे देऊन नंतर चर्चा करण्याची परवानगी दया, आयुक्त बोलतील आम्ही जसेच्या तसे शांत बसु ही सभागृहाची पंरम्परा राहिली नाही. आयुक्तांचा आम्ही मान ठेवला, आयुक्तांच्या मध्ये नाही बोलले पाहिजे. मी डस्टर्ब केला काय आयुक्तांना, मी इंटरअप केले काय आयुक्तांना, मी शांत होतो पण त्यांनी दिलेले उत्तर जर चुकीचे असेल तर त्याच्यावर मला बोलायचे असेल तर मी केव्हा बोलेल.

श्री.नितीन साठवणे :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन मनोरुग्न कैसर परवीनच्या संदर्भात देखील चुकीचे उत्तर मिळाले आहे. डॉ.सवई यांना रात्री १२ वाजुन १२ मिनीटाचे वॉटस्ॲप दिला आहे.

(बेल)

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, मा.आयुक्त जर उत्तर देत असतील तर निश्चितपणे ते पटलावर आहे. परंतु त्यांचे निवेदन पुर्ण होऊन जाऊ दया.

(बेल)

(कॉग्रेस पक्षाच्या नगरसेवकांनी सभागृहातुन सभात्याग केला)

महापौर :- या ठिकाणी मा.सदस्य, श्री नितीन साठवणे व मा.सदस्या, श्रीमती मंगला गवरे यांचा विषय होता, मला या ठिकाणी विधी अधिकारी यांनी सांगावे कि, मा.सदस्य, श्री नितीन साठवणे

यांच्यावर जो गुन्हा दाखल झाला आहे तो आपण मागे घेवु शकतो काय ? सभागृहाचे एकमत लक्षात घेता श्री नितीन साठवणे यांच्या विरोधात जी तक्रार प्रशासनानी केलेली आहे, कलम ३२१ मध्ये ते परत घेण्याचा ठराव आणि त्याचप्रमाणे निर्देश राज्य शासनाकडे पाठविण्यासाठी देत आहे. या ठिकाणी एन.आय.टी.बद्दल मा.आयुक्तांनी सांगीतले कि, एन.आय.टी.चे विलगीकरण करीत असतांना सर्व हँडओव्हर आपल्याला करावयाचे आहे हे जरी सत्य असले तरी फक्त गार्डनच करायचे आणि बाकी प्रक्रिया सोडुन दयायची, असे होता कामा नये, आणि गार्डन मध्ये महानगरपालिकेचा खर्च लागावा असे होवु नये. आणि त्यामुळे ही प्रक्रिया जेवढी फास्ट करता येईल, तेवढी फास्ट करण्यांत यावी. याठिकाणी श्री.विजय झलके, स्थायी समिती अध्यक्ष, यांची दिनांक २०/०६/२०२० रोजी एक समिती स्थापन केली होती, ज्यामध्ये मा.विरोधी पक्षनेते, बहुजन समाज पार्टी, गटनेते, बांधकाम समिती अध्यक्ष, आरोग्य समिती अध्यक्ष आणि विधी समिती अध्यक्ष आहे, त्या समितीची कार्यकक्षा मोठी करुन त्याच्यामध्ये अति.आयुक्त, श्री.संजय निपाणे यांचा देखील सहभाग करावा आणि त्यामध्ये ज्या सूचना आपण केल्या होत्या के.टी.नगरच्या दवाखान्यासोबत इतरही जे पाच दवाखाने आहे त्याची सर्वकक्ष चौकशी करुन त्याचा देखील अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवावा. त्याचप्रमाणे चेंबर दुरुस्तीबद्यल वारंवार सांगीतले जाते, त्याबाबत मुख्य अभियंता यांनी पांच वर्षामध्ये चेंबरबाबत किती खर्च झाला, काय खर्च झाला, त्याच्या मागचे काय कारण आहे आणि ते टाळावयाचे जर असतील तर पुढे कुठल्या पध्दतीची आपण प्रक्रिया केली पाहिजे. याची देखील ताबडतोब चौकशी करुन पंधरा दिवसात सभागृहाच्या पटलावर हा अहवाल ठेवावा. या ठिकाणी अनेक सदस्यांनी अनेक आक्षेप घेतले, एक व्हिडिओ सगळीकडे प्रसारीत झाला त्यामुळे महानगरपालिकेची बरीच बदनामी झाली, यामध्ये एक एन.डी.एस. चा कर्मचारी हा नागरिकांना झोपवुन सतरंजीपूरा झोनमध्ये गणवेश न घालता दंडा घेवून मारत होता त्याचे नाव श्री.संदिप उपाध्याय आहे त्याला तात्काळ महानगरपालिकेच्या एन.डी.एस. टिममधुन काढण्यांत यावे. त्याचप्रमाणे दुसरा एक कर्मचारी होता, श्री.प्रमोद हिवसे तो काही दिवसापूर्वी ड्रायव्हर होता त्याचे प्रमोशन कसे झाले, त्याच्याबद्यल ही आक्षेप आले आहे. स्थायी समिती अध्यक्ष, श्री विजय झलके यांच्या समितीनी त्याची देखील संपुर्णत: चौकशी करुन त्याचा देखील अहवाल पंधरा दिवसात सभागृहात ठेवावा. या ठिकाणी मा.सदस्य, श्री दयाशंकर तिवारी यांनी सांगीतले कि, मा.सदस्य, श्री हरीश ग्वालबंशी यांच्या फोनवर संत तुकाराम या नावानी सामाजिक व्देषाचे मॅसेज येत आहे ती अत्यंत दुर्देवी बाब आहे. तुमच्यासाठी, माझ्यासाठी आणि महानगरपालिकेसाठी शेवटी या पध्दतीने जर वातावरण खराब होत असेल तर याला सभागृह म्हणुन आपण सारे मग त्याच्यामध्ये प्रशासकीय अधिकारी पासून तर शेवटपर्यंत काम करणारे सर्व लोक आहे. आणि त्यामुळे अश्या गोष्टींना ताबडतोब पायबंद घालण्याकरिता असे जे काही मॅसेज जे कोणी करीत असतील तर त्यांच्या विरोधात नागपूर महानगरपालिकेनी तात्काळ गुन्हा दाखल करावा, त्याशिवाय जाफरी यांच्या हॉस्पिटल संदर्भात श्री. सवई, एम.ओ.एच. यांनी सात दिवसात चौकशी करुन माझ्यापुढे अहवाल ठेवावा, दर्शन कॉलोनी येथील भिंतीच्या कामाच्या संदर्भातील देखील चौकशी श्री.विजय झलके, अध्यक्ष, स्थायी समिती यांच्या समितीने करावी. त्याशिवाय याठिकाणी सात हजार पथदिव्यांचे खांब उभे आहे, त्यामुळे महानगरपालिकेची, पदाधिका-यांची, अधिका-यांची बदनामी होते, आणि सात हजार पथदिव्यांवर आपण लाईटच लावत नसतील तर तेथील स्थानिक लोक काय बोलत असतील आणि नगरसेवकाबद्यल सर्वात सोपी बाब म्हणजे नगरसेवक चोर आहे, आणि त्यामुळे या संपुर्ण

विषयाची नस्ती १३५ दिवस स्वत:च्या टेबल खाली दाबुन ठेवणा-या त्या वेळच्या तात्कालीन कॅफो, यांच्या संबंधात त्या आज असलेल्या विभागाला डिसीप्लीन कार्यवाही अत्यंत कठोर शब्दात करण्याची शिफारस मा.आयुक्तांनी त्यांच्या त्या विभागाला दयावे असे निर्देश हे सभागृह देत आहे. याशिवाय याठिकाणी मा.सदस्यांनी सभागृहात माहिती दिली कि, टाळेबंदीच्या काळामध्ये इंदिरा गांधी रुग्णालय, पांचपावली सुतिकागृह, आयसोलेशन, सुराणा हॉस्पिटल, के.टी.नगर, येथील इमारतीची सुस्थिती आणि दुरुस्तीची कामे प्रशासनाव्दारे घेण्यांत आलेली आहे, परंतु कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी जी काही कामे करणे आवश्यक आहे, त्याच्या संदर्भात जर एकाच कामाचे तुकडे करुन त्या त्या कामाचे कार्यादेश दिले गेले असतील तर महाराष्ट्र शासनाव्दारे नियुक्त नंदलाल समितीनी अश्या कामाचे तुकडे केले तर ती अनियमितता आहे, असे आपल्या अहवालात स्पष्ट केले आहे, आणि त्यामुळे एखादे काम पुर्ण करण्यासाठी वेगवेगळा निधी जरी वेगवेगळया मार्गांनी उपलब्ध होत असेल तरी यापध्दतीने एखादया अधिका-यांनी असे तुकडे करणारे प्रस्ताव आयुक्त, म.न.पा. यांच्या मंजूरीसाठी जर ठेवले असतील तर ते नाकारण्याचे कार्य आयुक्तांनी करावे, असे अपेक्षित आहे. आयुक्त, म.न.पा. यांनी असे न करता त्या कामाला मंजूरी प्रदान केली, ऐवढेच नाही तर अश्या कामांना म.न.पा. अधिनियम कलम ७३ (ड) मधील तरतुदीप्रमाणे त्या मध्ये स्पष्ट लिहिले आहे कि अश्या संविदा केल्यानंतर पंधरा दिवसाच्या कालावधीमध्ये स्थायी समितीला त्याची संपुर्ण माहिती आयुक्त यांनी दयावी, त्याचे देखील उल्लंघन आयुक्तांनी केलेले आहे, त्यामुळे एकाच कामाचे तुकडे करण्यासाठी त्यांच्या अधिपत्याखालील अधिका-यांना आदेश देणे, अश्या कामांना मंजूरी देणे, व झालेल्या संविदाची माहिती स्थायी समितीपासून लपवुन ठेवणे या सर्व बाबी गंभीर स्वरुपाच्या असल्यामुळे याबाबत आयुक्त म.न.पा. यांनी दिनांक ०६ जुलैपर्यंत आपले स्पष्टीकरण सभागृहाच्या पटलावर ठेवण्याकरिता माझ्याकडे सादर करावे. त्याचप्रमाणे आयुक्त, म.न.पा. रुजु झाल्यापासून फेब्रुवारी तसेच मार्चच्या पहिल्या पंधरवाडयात वेळोवेळी बाहेर गावी जाण्यासाठी त्यांनी सुट्टया घेतल्या आणि आतापर्यंत अति.आयुक्तांनी देखील सुट्टया घेतल्या आहेत, त्यांची मुख्यालय सोडण्याची बाब या ठिकाणी सभागृहाच्या निदर्शनास मा.सदस्यांनी आणुन दिलेली आहे. त्यामुळे म.न.पा. अधिनियमाच्या कलम ३८ पोटकलम (१) अन्वये असे कृत्य करतांना स्थायी समितीच्या अनुमतीने राज्य शासनाकडुन या सुट्टयांची मंजूरी घेणे अपेक्षित असतांना आयुक्तांनी व अति.आयुक्तांनी वरील रजांच्या बाबतीत स्थायी समितीची अनुमती घेतली नाही, असे सभागृहाच्या निदर्शनास आले, त्यामुळे आयुक्त म.न.पा. यांनी कलम ३८ पोटकलम (१) चे पालन केले नाही या बद्यल आयुक्तांनी दिनांक ०६ जुलैच्या संध्याकाळपर्यंत स्पष्टीकरण माझ्यापुढे सादर करावे. आयुक्तांनी वेळोवेळी दुरचित्रवाणी, खाजगी चॅनल, फेसबुक, वॉट्सॲप इत्यादी सोशल मिडियावर व वर्तमानपत्रात वेगवेगळया मुलाखत देवुन लोकप्रतिनिधी तसेच महानगरपालिकेच्या बाबतीत विधाने केली आहे, या ठिकाणी सभागृहात सदस्यांचे आरोप आहे, त्यासाठी त्यांनी काही पुरावे देखील सादर केलेले आहे, आणि त्या प्रक्षेपणासाठी व मुलाखतीसाठी सक्षम प्राधिकरण म्हणजे महानगरपालिकेच्या सभागृहाची मंजूरी घेतलेली नाही, अशी माहिती मा.सदस्यांनी सभागृहाला दिलेली आहे. यास्तव महाराष्ट्र नागरी सेवा वर्तणुक नियम ७९ च्या कलम ९ प्रमाणे सक्षम प्राधिकरणाची परवानगी न घेता रोजच्या रोज नियमाचा व शिस्तीचा भंग केला आहे, ते हया सभागृहाच्या निदर्शनास आलेले आहे. त्यामुळे आयुक्त म.न.पा. यांना यासंबंधी आपले काय म्हणणे आहे, त्याचे देखील स्पष्टीकरण सभागृहापुढे ठेवण्याकरिता दिनांक ०६ जुलैपर्यंत माझ्याकडे त्यांनी

द्यावे. या ठिकाणी मा.सदस्य, श्री दयाशंकर तिवारी व मा.सदस्या,श्रीमती परिणिता फुके यांनी डॉ.शीलु चिमुरकर उर्फ गंटावार तसेच डॉ.प्रविण गंटावार यांच्याबद्यल अनेक आक्षेप केले आहे. इंदिरा गांधी रुग्णालयाच्या बाबतीत असतील अथवा कंटोनमेंट झोनच्या बाबतीत त्यांची एकंदरीत संपुर्ण वर्तवणुक असेल याबाबतीत दोन्ही दामपत्यांनी शासकीय कामात कसूर केल्याचे दिसुन येत आहे, यामुळे म.न.पा.चे कलम ५६ तसेच सेवा वर्तणुक कलम १९७९ च्या अनुसार या सभेत ते दोन्ही जण प्रथमदर्शनी दोषी असल्याचे दिसते, त्यामुळे या प्रकरणाची सविस्तर चौकशी करणे आवश्यक आहे, या दोघांची ही चौकशी श्री विजय झलके, स्थायी समिती अध्यक्ष यांनी करावी व त्याचा देखील अहवाल पंधरा दिवसात सभागृहाच्या पटलावर ठेवण्याकरिता माझ्याकडे देणे अपेक्षित आहे. मात्र श्री प्रविण गंटावार व श्रीमती शालु चिमुरकर यांचा जुना एकंदरीत इतिहास बघता त्यांना आजपासून तात्काळ प्रभावानी निलंबित करण्यांत येते. या दरम्यान अहवाल पंधरा दिवसात सभागृहात आला तर ज्याप्रमाणे अहवाल असेल त्याप्रमाणे आपण निर्णय घेवु. मला एक फोन मी आंतमध्ये असतांना आलेला आहे, माझी प्रशासनाला व आयुक्तांना विनंती आहे कि, निगम सचिवांना पाठवुन इंदिरा गांधी रुग्णालयातील मस्टर ताबडतोब ताब्यात घ्यावा, त्या ठिकाणी दुसरे लोक जावुन ते मस्टर ताब्यात घेण्याचा प्रयत्न करीत आहे, त्यामुळे निगम सचिवांना आपल्या ताब्यात हे सभागृह संपल्यानंतर वेळ जरी झाला असेल तरी महानगरपालिकेच्या सचिवांनी ते मस्टर घ्यावे, ते मस्टर त्या ठिकाणावरुन जर गायब झाले असेल तर डॉ गंटावर पतीपत्नीवर त्याची जबाबदारी निश्चित करावी, आणि क्रिमनल अफेंस दर्ज करावा. त्याचप्रमाणे मा.सदस्यांनी सभागृहात उपस्थित केलेल्या चर्चेत असे लक्षात आले कि, आयुक्त. म.न.पा. यांनी वेगवेगळया पदावर उपायुक्त, कार्यकारी अभियंता तसेच अधिक्षक अभियंता व इतर पदावर सक्षम प्राधिकरणाची परवानगी न घेता नियुक्ती केलेली आहे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (१) अन्वये अश्या नियुक्त्या करतांना त्या तात्पूरत्या असो कि परमनंट तो नियुक्त करण्याचा अधिकार म.न.पा. सभागृहाला आहे, ज्या अर्थी सक्षम प्राधिकरणाची परवानगी नाही, त्या अर्थी अश्या केलेल्या नियुक्त्या तात्काळ प्रभावानी रद्य करण्यांत येतात, अशी ही सभा एकमताने मंजूरी प्रदान करते. तसेच आयुक्त, म.न.पा. यांना देखील याबद्यल नाराजी व्यक्त करते. या शिवाय आयुक्त, म.न.पा. यांना ज्या पालिका कर्मचारी, अधिकारी यांची रजा मंजूर करण्याचा अधिकार आहे असे अधिकारी सोडुन इतर अधिका-यांची रजा मंजूर करण्याचे अधिकार देखील ५३ (१) व ५७ (३) च्या अनुषंगाने फक्त व फक्त सक्षम प्राधिकारणीनंतर स्थायी समितीला आहे, त्यामुळे या कलमाचे उल्लंघन करुन स्थायी समितीची परवानगी न घेता ज्या अधिका-यांनी रजा घेतल्या असतील त्या सर्वांची रजा नामंजूर करण्यास ही सभा एकमताने मंजूरी प्रदान करते. यावर उचित कार्यवाही करुन आयुक्तांनी हा अहवाल म.न.पा. स्थायी समितीला सादर करावा, अशी ही सभा एकमताने मंजूरी प्रदान करते. तसेच ३१९ (२) या अनुषंगाने महामारीच्या स्थितीत महानगरपालिकेला सादर करणारा अहवाल अपेक्षित असतांना आजपर्यंत का देण्यांत आला नाही, याचे देखील स्पष्टीकरण दिनांक ०६ जुलैपर्यंत सभागृहाच्या पटलावर ठेवण्याकरिता माझ्याकडे मा.आयुक्तांनी सादर करावे. खरे म्हणजे मागील १५ दिवसात महिन्याभरात जे काही झालेले आहे, ते योग्य नाही. शेवटी तुम्हाला आणि आम्हाला आपणा सर्वांना नागपूर महानगरपालिकेचे भवितव्य घडवायचे आहे. ज्या संस्थेत आपण सारे मिळुन काम करतो आहे, त्याची इज्जत, त्याची इभ्रत हे जपणे अत्यंत महत्वाचे आहे. आणि त्यामुळे येणा-या काळामध्ये आपण सारे मिळुन या पध्दतीने आजपर्यंत जे झाले ते होवु न देता एक पाउल आम्ही पुढे

येवु, एक पाउल प्रशासनाने पुढे यावे आणि नियमाच्या अंतर्गत राहुनच आपण सा-यांनी मिळून काम करावे, नियम मला वेगळे आहे आणि आपल्याला वेगळे आहे, नगरसेवकांना वेगळे आहे, असे कुठेही होवु नये, नियमाच्या चाकोरीबध्द व्यवस्थेमध्ये राहुन आपण सर्वांनी जनतेच्या प्रश्नासाठी, शहराच्या विकासासाठी झाले गेले ते बाजुला सारुन एकत्रित राहुन पुन्हा एकदा कामाला लागावे, येवढीच अपेक्षा या ठिकाणी व्यक्त करतो. १९ मार्चपर्यंत आयुक्तांचा रिव्हाईज बजेट यायच्या तारखेपर्यंत जे कार्यादेश झालेले आहे, त्याला मंजूर करावे, आणि कामाला प्रारंभ करावे, याठिकाणी मघाशी मी सांगीतले होते कि, ०३ तारखेच्या सोमवारी सायंकाळपर्यंत ज्या मा.सदस्यांच्या प्रश्नाचे उत्तर आलेले नसतील त्यांनी माझ्याकडे लेखी द्यावे आणि ०६ तारखेपर्यंत मा.आयुक्तांनी या सभेचे आणि इतर बाबीचे लेखी निवेदन ०६ जुलैपर्यंत सभागृहाच्या पटलावर ठेवण्याकरिता माझ्याकडे सादर करावे, असे आदेश हे सभागृह देते.

हस्ता /— डॉ.रंजना लाडे
**निगम सचिव**
**महानगरपालिका, नागपूर**

हस्ता /— संदीप जोशी
**महापौर**
**महानगरपालिका, नागपूर**